

# माणूस

जनता विशेषांक २६ जानेवारी १९६५ किंमत २५ पैसे





# माणूस

मराठी पाक्षिक

किंमत

?




# तिसरे पाउल

'विडीच्या बंडलाची जागा पुस्तकांनी घ्यावी,' असे विनोबांनी एके ठिकाणी म्हटले आहे.

ही उडी फारच उंच आहे, पण विडीच्या (सिगरेटच्या!) बंडलाबरोबरच चांगली पुस्तके, चांगली नियतकालिके, चांगले साहित्यही सर्वसामान्य सुशिक्षित नागरिकांपर्यंत पोहोचावे ही आकांक्षा काही फार अवास्तव नाही.

या दिशेने पंचवीस पैसे किमतीचा पहिला प्रयोग 'माणूस' ने गेल्या वर्षीच्या १५ ऑगस्टला केला व त्याला वाचकांनी भरपूर साथ दिली. हा २६ जानेवारी अंकाचा दुसरा प्रयोगही यशस्वी ठरत आहे, असे दिसते. या प्रयोगाच्या निमित्ताने अनेक थरांतील वाचक, महाराष्ट्राच्या बहुतेक विभागांतील वृत्तपत्रविक्रते, काही जाहिरातवितरक यांच्याशी विचारविनिमय करण्याचा प्रसंग आला. सर्वांनी हा प्रयोग सातत्याने चालू ठेवावा, नवीन काहीतरी यातून निष्पन्न होईल, असा सल्ला दिला.

पंचवीस पैसे किमतीचा हा प्रयोग यापुढेही दर अंकाला चालू ठेवण्याचे म्हणूनच 'माणूस'ने निश्चित केले आहे.

या किंमतीला साजेसा व व्यापक प्रसाराच्या दृष्टीने सोयीचा असा नवीन आकारही या अंकापासून 'माणूस' ने धारण केला आहे. साहित्य नेहमीइतकेच आहे. पृष्ठसंख्येत जरूर तेवढी वाढ केली आहे. तेव्हा वाचकांची याबाबत कोणतीही गैरसोय होणार नाही, हे उघड आहे.

'माणूस' ची नवीन वार्षिक वर्गणी आठ रुपये राहणार आहे. जुन्या वर्गणीदारांना जादा वर्गणीत बसतील तेवढे अंक अधिक पाठविण्याची व्यवस्था होईलच.

मासिकाचे पाक्षिकात रूपांतर करून 'माणूस' ने गेल्या वर्षी आपल्या विकासाचे पहिले पाउल उचलले. नवा सुटसुटीत आकार हे दुसरे पाऊल; आणि पंचवीस पैसे ही या व यापुढच्या दर अंकाची किंमत निश्चित करून 'माणूस' एक गतिमान मराठी नियतकालिक होण्याचा प्रयत्न करीत आहे. सर्वांचे सहकार्य लाभावे ही इच्छा.

'माणूस' चा यापुढचा अंक १५ फेब्रुवारी १९६५

*श्री. ग. माजगावकर*
संपादक.



# या अंकांत


वर्ष चौथे : अंक अकरावा - बारावा

★

२६ जानेवारी १९६५ : पंचवीस पैसे

★

संपादक : श्री. ग. माजगावकर

★

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २

★

दूरध्वनी : ५७३५९



मुखपृष्ठकथा : ● पंतप्रधान लालबहादूर शास्त्री

□ □

व्यक्ती आणि वार्ता : ● मैथिलीशरण गुप्ता

● छायाचित्रकार माधव शिंदे

□ □

लेख : ● पुरुषोत्तम लक्ष्मण

□ **वि. ग. कानिटकर**

● विनोदाची दहीहंडी

□ **चंद्रशेखर मराठे**

कथा : ● भवान वंकी

□ **ब. मो. पुरंदरे**

विनोदी लेख : ● विनोदी लेखकांचा दणदणीत पराभव

□ **बाळ गाडगीळ**

लेख : ● राशिभविष्य हे थोतांड आहे का ?

□ **श्री. के. केळकर**

पुस्तकपरिचय : ● नाझी भस्मासुराचा उदयास्त

□ **रा. म. शास्त्री**

शिवाय : ● जगाच्या पाठीवर, रंगभूमी, चित्रपट, क्रीडा, विनोद ही नेहमीची सदरे



---


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतातच असे नाही.

चक्र चिन्हांकित तिरंगी ध्वजाला— आपल्या प्रजासत्ताकाच्या उद्गात्याला—
आपल्या प्रगतीचें प्रतीक असलेल्या चक्राला —आमचे सहस्र प्रणाम !



*चक्र, हें मनुष्यानें केलेली सांस्कृतिक प्रगति दर्शविणारें प्रतीक होय. त्याच चक्राची निशाणी धारण करणाऱ्या तिरंगी ध्वजानें आमच्या प्रजासत्ताकाची मुहूर्तमेढ रोवली आहे. रुळांवरून अतिवेगानें धांवणारीं भव्य लोखंडी चाकें सुध्दां आमच्या राष्ट्राची उत्तरोत्तर होत असलेली प्रगति दाखविणारीं प्रतीकेंच होत. आज साऱ्या राष्ट्राबरोबर रेल्वे कर्मचारी देखील त्याच चिन्हाला आदरानें प्रणाम करण्यासाठीं नतमस्तक होऊन त्याच्याशीं निष्ठा ठेवण्याची पुनर्प्रतिज्ञा करीत आहेत.* **मध्य आणि पश्चिम रेल्वेकडून प्रसारित**



# जगाच्या पाठीवर

दुर्गापूर अधिवेशनात अण्वस्त्रांविषयी पंतप्रधान शास्त्री बरे बोलले. ' भारत अण्वस्त्रांचे उत्पादन कधीहि करणार नाही, ' या आंधळ्या नकाराऐवजी ' सध्या नाही; उद्याचे कोणी सांगावे ? ' अशी समंजस सावधपणाची भाषा आशादायक आहे. ' हा सदसद्विवेक बुद्धीचा प्रश्न नाही; हा नीतिअनीतीचाहि प्रश्न नाही. हा प्रश्न आहे साधनसामग्रीचा. ' ही तर सरळ एकप्रकारची शास्त्रींनी दिलेली कबुलीच आहे. म्हणजे साधनसामग्री भारताजवळ असती तर त्यानेही संरक्षणासाठी अण्वस्त्रे निर्माण करण्यास मागेपुढे पाहिले नसते, असाच शास्त्रींच्या बोलण्याचा अर्थ होतो. आता चीनचा आक्रमकपणा जर कमी होणार नसेल आणि आपल्याला अमेरिकन अण्वस्त्रप्रतिकारक छत्रीच्या आश्रयाला जायचे नसेल, तर अण्वस्त्रांचे उत्पादन करावे लागेल हे उघड आहे. संस्कृतात एक वचन आहे. दुष्टाचे ज्ञान वादविवादासाठी, धन मस्तवालपणे वागण्यासाठी आणि शक्ती दुसऱ्याला पीडा देण्यासाठीच असते. जो साधू असतो त्याचे उलट असते. ' ज्ञानाय, दानाय च रक्षणाय ' —साधुपुरुषाचे ज्ञान म्हणजे आत्मज्ञान. त्याचे धन हे दानाला कारणीभूत ठरते आणि शक्ती ही रक्षणासाठी असते. म्हणजे खलपुरुष व साधुपुरुष यांतील फरक एवढाच, की एकाचे लक्ष परपीडेवर असते; दुसरा शांततेचा भोक्ता असतो. पण दोघेही समर्थ असतात, याबाबत वाद नाही. समर्थ दुष्ट, हा असमर्थ सुष्टाचा नेहमीच पराभव करीत असतो. तेव्हा शास्त्री-मेनन-मोरारजी यांना नंदाप्रमाणेच भारत हा साधूंचा समाज बनावा अशी इच्छा असली तरी अहिंसाशांतीची जपमाळ सोडून रोकडा व्यवहार काय तो पाहिलाच पाहिजे व परिस्थितीचा अंदाज घेऊन स्वातंत्र्यरक्षणासाठी अण्वस्त्रांबाबत व्यवहार्य धोरण अंगीकारले पाहिजे. कदाचित अण्वस्त्रांचे उत्पादन करूनही भारत जागतिक तेढ कमी करू शकेल. कारण जोपर्यंत अण्वस्त्रे ही केवळ एकट्या अमेरिकेच्या किंवा अमेरिका–रशिया या दोघांच्या हातात होती, तेव्हा दोघेहि गुरगुरतच होते. पण डी गॉलच्या फ्रान्सने अण्वस्त्रांचा ध्यास घेतला, तेव्हा रशिया-अमेरिका या दोघांच्याही तोंडातून शांततेचे बोल बाहेर पडू लागले. कारण त्यांची मक्तेदारी संपत आली. चीनच्या अणुस्फोटाचा भारताला धोका आहे ही गोष्ट सोडा, पण युरोपीय राष्ट्रांच्या अण्वस्त्रांच्या मक्तेदारीला हा सुरुंग लागला हे ठीकच आहे. विषाने विष उतरवावे, तसा काहीसा हा प्रकार झाला. पण तो यशस्वी ठरतो, दुबळ्यांच्या शांतिपाठाला कोणी किंमत देत नाही, हा नेहमीचा अनुभव आहे. तेव्हा भारतानेही अण्वस्त्रांचे उत्पादन आज नाही उद्या केले आणि ती वापरण्याबाबत सूज्ञ विवेक बाळगला, तर त्यात नैतिकदृष्ट्या वाईट असे काहीच

नाही. भगवान श्रीकृष्ण शिष्टाईसाठी कौरवांकडे जातेवेळी धर्मराजाला सांगून गेले– ' मी युद्ध होऊ नये म्हणून कौरवांचे मन वळवण्याचा आटोकाट प्रयत्न करतोच आहे. पण हे कौरव ऐकणार नाहीत, हे मी तुला आताच सांगून ठेवतो. तू आपला युद्धाच्या जय्यत तयारीला लाग. ' ही श्रीकृष्णनीती म्हणजेच राजनीती. युद्धाची आसक्ती नाही तसेच शांततेचा भोळाभावही नाही. जे अपरिहार्य आहे, त्याचा स्वीकार आणि अवश्य आहे त्याचा आचार.

## अणुशक्ती आणि शेती

पण शांततेसाठी अणुशक्ती वापरणे म्हणजे तरी काय ? आज भारतात तारापूर येथे अणुशक्ती उत्पादनकेंद्र आहे, पण त्यात काय चालू आहे याचा कितीजणांना पत्ता आहे ? जर तेथे शांततेसाठी अणुउत्पादन या धोरणाने संशोधन कार्य चालू असेल तर याबाबत एवढी गुप्तता असण्याचे काहीच कारण नाही. असे ऐकिवात आहे, की फळे ताजी ठेवण्याच्या दृष्टीने तेथे काही प्रयोग वगैरे चालू आहेत. पण ही काय या केंद्राची माहिती झाली ? याबाबत लोकांच्या ज्ञानात थोडी भर पडली, तर हवीच आहे. आज देशात अन्नधान्य उत्पादनाचा प्रश्न उभा आहे–चीनच्या अणुबाँबइतकाच हा मूकबाँब धोकादायक आहे. आमच्या अणुशक्ती संशोधन केंद्रातून याबाबत–शेतीउत्पादनाबाबत–काय संशोधन चालू आहे, याची माहिती प्रसृत करण्यास काय हरकत आहे ? नाहीतर हे केवळ सरकारी पांढरे हत्ती पोसले जात आहेत, अशी लोकांची विनाकारण भावना व्हायची.

वाचकांच्या माहितीसाठी भारतातल्या तारापूर केंद्राची नाही, पण दुसऱ्याच एका जागतिक केंद्राची माहिती येथे देऊन दुधाची तहान ताकाने भागवण्याचा प्रयत्न करतो. त्यावरून ' शांततेसाठी अणू ' हे काय गौडबंगाल आहे, यावर थोडातरी प्रकाश पडेल.

आपल्याला महत्त्वाचा विषय अर्थातच शेतीचा. शेतीच्या उत्पादनात अणूचा कसा व कोणता उपयोग करून घेता येईल, याचे संशोधन करणारी युरोपातली एकमेव संस्था नेदरलँडमध्ये वॉजिनिजेन शेती विद्यापीठात असून तिचे नाव ' इन्स्टिट्यूट फॉर दी ॲप्लिकेशन ऑफ ॲटोमिक एनर्जी इन ॲग्रिकल्चर ' असे आहे. युरोपमधील सामाईक बाजारपेठेतील सहा राष्ट्रे या प्रयत्नात सहभागी असून त्यांनी वॉजिनिजेन येथील शेतकी विद्यापीठात चालू असलेले प्रगत शेती संशोधन लक्षात घेऊन या संस्थेसाठी वॉजिनिजेनचीच निवड केली.

वाजिनिजेन विद्यापीठात नुकताच जो शोध लावण्यात आला, तो म्हणजे शेतीच्या क्षेत्रात रेडिओ इसोटोप्सचा उपयोग हा होय. यापुढील संशोधनासाठी अनेक देशांतील शास्त्रज्ञ या विद्यापीठात जमले असून डॉ. डी. डिझेवू हे डच शास्त्रज्ञ संबंधित

विभागाचे संचालक आहेत. या विभागाची व्यवस्था पाहण्यासाठीही एक आंतरराष्ट्रीय समितीची नेमणूक करण्यात आली आहे.

अणुशक्तीचा वापर शेतीकडे करण्याच्या संशोधनात तीन भाग आहेत. अधिक व अधिक चांगल्या दर्जाचे अन्नधान्य उपन्न करण्यासाठी वनस्पती आणि अन्य रोपे-झाडे उत्पतींवर वा वाढीवर अणुशक्तीचा परिणाम करण्याचे प्रयोग हा त्याचा पहिला भाग होय. धान्य, फळ, फूल यांच्या बीज-बेण्यांवर प्रकाश पाडून (इरॅडिकेशन) त्यांच्यातील व्यक्तछेदक सक्रिय, जिवंत अणूंवर असा परिणाम करिता येतो, की त्यामुळे त्यांची रचना पारंपारिक पद्धतीपेक्षा वेगळ्या धर्तीची होऊ शकेल. या प्रक्रियेमुळे त्यांच्या वाढ-विकासाच्या गतीवर व स्वरूपावरही परिणाम होतो. म्हणजेच भिन्न प्रकाराचे रचनेचे थोडे वेगळे फळ, फूल वा धान्य त्यामुळे निर्माण होऊ शकते. वाटाणा, टोमॅटो आदींवर असे प्रयोग करण्यात आले आहेत.

या संशोधनाची दुसरी अवस्था म्हणजे वनस्पतींच्या विकासाची पद्धती अवलोकन करून रेडिओ इसोटोप्सच्या साहाय्याने त्याचे गुणधर्म बदलविण्याचा प्रयत्न करणे. सामान्यत: हे गुणधर्म परिस्थितीसापेक्ष असतात. त्यामुळे अशा परिस्थितीच्या स्वरूपात बदल केल्यास त्यांच्या गुणधर्मातही बदल करता येतो. निरनिराळ्या प्रकारच्या हवामानाप्रमाणे विविध गुणधर्मांच्या रासायनिक खतांमुळेही असा बदल साधता येतो. यामुळे अधिक चांगल्या प्रकारच्या वस्तू निसर्गातून उपलब्ध करून घेता येऊ शकतील.

वनस्पतींची अंगभूत रचना, त्याचे स्वरूप, वाढ, गती, परिपक्वता यांच्याबद्दलच्या अनेक गुप्त व सुप्त समस्यांचा उलगडा आजवर या संस्थेत रेडिओ इसोटोप्सच्या साहाय्याने करण्यात आलेला आहे. या संशोधनाचा तिसरा टप्पा म्हणजे रेडिएशनच्या साहाय्याने ताज्या खाद्यवस्तू अधिक काळ त्यांच्या गुणधर्मासह टिकवता येणे हा होय. खाद्यपदार्थ वाया न जाऊ देण्याचे मोठे मौलिक कार्य त्यामुळे साध्य होणार आहे. तसेच आजच्या हवाबंद डब्यांच्या प्रक्रियेतील व पदार्थ सुकविण्या-खारविण्याच्या पद्धतीतील न्यूने व दोष नाहीसे होतील. या संशोधनाचे आजवरचे प्रयत्न फार आशादायक ठरले असून प्राण्यांचे मांस दहा दिवसपर्यंत, फळे पंधरा दिवसपर्यंत ताजी व त्यांच्या अंगभूत गुणधर्मांसह टिकविणे अगदी शक्य आहे. तसेच ज्या पदार्थांना मोड किंवा डोळे फुटतात, त्यांच्यावरही इरॅडिएशनचा परिणाम बराच घडून येत आहे. कांदे व बटाटे आठवडा आठवडा आता अगदी आहेत त्या स्थितीतच राखता येतील. धान्यांना कीड लागणार नाही. कच्चे टोमॅटो तोडल्यावर ते जर आज चार दिवसांत पिकत असतील, तर या पद्धतीमुळे ते पिकायला आठ दिवस घेतील व त्यांचा व्यापार-वाहतूक अधिक सुकर बनेल. अर्थातच या गोष्टींचा फायदा शेतकऱ्यांना मिळेल.

आपल्या तारापूर-तुर्भे केंद्रात या दृष्टीने काय प्रगती आहे तेही लोकांना समजले

तर हवे आहे. दुसऱ्या बाजूची प्रगती मात्र कानावर येत आहे. प्लुटोनियम प्लँटचे उद्घाटन करण्यासाठी शास्त्री तुर्भेला येणार अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे. प्लुटोनियमचा उपयोग अणुबाँबनिर्मितीसाठी होऊ शकतो, असे तज्ज्ञ म्हणतात. म्हणजे अंतर्गतरीत्या अणुशक्ती शांततेसाठी व युद्धासाठीही वापरण्याच्या दृष्टीने भारत सरकारचे प्रयत्न सुरू असावेत, असे दिसते. उत्तम आहे. जोपर्यंत सर्व जग बुद्धाच्या पातळीवर चढत नाही, तोपर्यंत नरसिंहावतारापाशी थांबणेच श्रेयस्कर. एक हात शांततारूपी भक्त प्रल्हादाला वाचविण्यासाठी वर उचललेला, पण दुसरा हात हिरण्यकश्यपूच्या पोटावर. हे दोन्ही जमले तर शास्त्री त्यांच्यावर काळाने टाकलेली जबाबदारी पार पाडू शकतील. माणूस म्हणून शास्त्री चांगले आहेत. त्यांचे चारित्र्य—लोककल्याणाची तळमळ-निर्विवाद आहे. पण काळ यापेक्षा अधिक मागतो आहे. अजून काही वेळ तो शास्त्रींना संधी देण्यासही तयार दिसतो. पण त्याचे चक्र फार काळ थांबून राहणार नाही, हेही तितकेच निश्चित आहे. लोकशाही मार्गाने या देशात स्वातंत्र्य आणि समता यांचे राज्य प्रस्थापित करण्याच्या शास्त्रींच्या प्रयत्नाला यश लाभो.

शास्त्रींच्या आजवरच्या कारकीर्दीचा व आयुष्याचा एक छोटासा आलेख पुढे दिलाच आहे—म्हणजे आपली ' माणूस' ची यावेळची मुखपृष्ठकथा. पुढच्या अंकाची मुखपृष्ठकथा आताच जाहीर करून टाकतो — **विन्स्टन चर्चिल.** ● ● ●


कॅल्शियमयुक्त

**बिटको**

**ग्राइप**

नेहमी दिल्याने
लहान मुले सशक्त, बांधेसूद
व गुटगुटीत होतात.

अत्यंत लोकप्रिय

**बिटको**

**काळी**
**टूथ पावडर**

नेहमी वापरल्याने
दात मोत्यासारखे स्वच्छ
व चकचकीत होतात.

**बिटको केमिकल इंडस्ट्रीज,**
**नाशिक रोड**

## आपले बचत खाते

## आपण उघडले आहे का ?

- चौदा वर्षे पुरी झालेल्या मुलास अथवा मुलीस आपले बचत खाते उघडून स्वत:च्या सहीने चालविता येईल
- वर्षामध्ये १०० चेक्स काढू शकाल.
- एका आठवड्यामध्ये एक किंवा अनेक चेक्स लिहू शकाल.
- बचत खात्यावर दरसाल ३। टक्के व्याज चक्रवाढ पद्धतीने जमा होते.

*आणखी किती तरी विविध आणि आकर्षक योजना*

आर्थिक समस्या सोडविण्यासाठी

# दि बँक ऑफ इंडिया लि.

टी. डी. कंसारा

*जनरल मॅनेजर—*

मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात बादशाही थाटात

पुण्या–मुंबईहून निघणार

## काशी–हरद्वार यात्रा

शिवाय आग्रा–फत्तेपूर–शिक्री मथुरा–वृंदावन, दिल्ली–कुतुबमिनार, हरद्वार, हृषीकेश, लखनौ, अयोध्या, अलाहबाद, काशी, सारनाथ, गया वगैरे.

चहा-भोजनाची संपूर्ण आलिशान व्यवस्था

# राजकमल यात्रा कंपनी

६०५ शनवार, पुणे २ : फोन ५४४५७

मालक : कर्वे बंधू

## शब्द-वेडा

भावनेचा गंध माझ्या
शब्दरूपा पारखा
कल्पनेचा साज नाही
पद्यरूपा ठाउका
छंद नाही बंध नाही
सूर कोठे हरवला
शब्द-वेडा मी जुळारी
ठाउके माझे मला

—मधुसूदन गोखले



## पुन्हा

सावळी सावळी
चांदण्यांची छटा
ढगांत गुंतली
वाऱ्याची बटा !
अबोल अबोल
सागराच्या लाटा
झावळ्या नाचती
खट्याळ काठा !
अंधुक अंधुक
धुक्याच्या वाटा
पानांत हिरव्या
मोत्यांचा साठा !
मधाळ मधाळ
प्रीतीच्या खुणा
डोळ्यांत रंगती
पहाटे पुन्हा !

—वन्या साठे

## अशी कशी ग तू

मी जाणार जाणार
तुजपासूनी वेगळी
सांगण्याची रीत तुझी
अशी कशी ग आगळी !
माझ्या शांत जीवनात
आलीस चोर पावलांनी
आणि जातेस तू आता
थैमान वादळी घालुनी !
चाहूल होती चाफेकळी
सोनफुली सोनकळी
कडाडणारी तू ग आता
विद्युल्लता पावसाळी !
जाणारच तू आता
जाऊ नको म्हणू कसे
ठिगाळलेल्या हृदयाचे
चोहिकडे झाले हसे !

—प्रा. यादवराव गांगुर्डे



# पंतप्रधान शास्त्री

## भाकिते खोटी ठरविली

भारतासारख्या विशाल देशापुढील विशाल प्रश्न ही छोटी मूर्ती यशस्वीपणे सोडवू शकेल काय, अशा अपेक्षेने पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींच्या कारभाराकडे गेले आठ महिने जगातील मुत्सद्दी पाहात आहेत. रुझवेल्टनंतर ट्रूमन यांना ज्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले, तशाच प्रकारच्या परिस्थितीला शास्त्रींना तोंड द्यावे लागत आहे. चिनी आक्रमणाचा धोका, सीमेवर पाकच्या कटकटी, धान्यटंचाई, भाववाढ, लाचलुचपत, काँग्रेस संघटनेतील गटबाजी, संधिसाधूपणा, नागांचा प्रश्न, काश्मीर यासारखे अनेक जटिल प्रश्न या छोट्या मूर्तीपुढे आहेत; पण मुळीच न गडबडता, न गोंधळता, शांतपणे, धीरोदात्तपणाने जास्तीतजास्त लोकांचे सहकार्य मिळवून ते सोडविण्याचा प्रयत्न शास्त्री करीत आहेत. कित्येकदा त्यांचे अंदाज चुकले असतील, उपाययोजना पुरेशी ठाम नसेल, पण त्यांची निष्ठा, कळकळ, प्रामाणिकपणा याबद्दल

कोणी शंका घेणार नाही. नेहरूंच्यानंतर भारतात अराजक माजेल, यादवी होईल असे भाकित काही पाश्चात्त्य निरीक्षकांनी केले होते. शास्त्रींनी दुसरे काही केले असो किंवा नसो, भारतात लोकशाही टिकविण्यात ते यशस्वी झाले आहेत, हे कोणालाही मान्य करावे लागेल.

## शास्त्रींचे काही ठाम निर्णय

ही काहीशी ठेंगू मूर्ती आपला निर्णय अमलात आणण्याचा ठामपणा दाखवील का, अशी शंका आपल्या मनात येते, पण लोकांच्या मनातील ही शंका ओळखून तिचे उत्तर शास्त्रींनीच एकदा दिले. अरियालूर रेल्वे अपघातानंतर १९५६ साली त्यांनी रेल्वेमंत्रिपदाचा राजीनामा दिला, त्यावेळी केलेल्या भाषणात ते म्हणाले, " माझी ठेंगू आकृती व मृदू भाषा यामुळे माझ्या अंगी ठामपणा आहे की नाही असे लोकांना वाटणे स्वाभाविक आहे, पण मी शरीराने फारसा बळकट नसलो, तरी मनाने कमकुवत नाही. " रेल्वे अपघाताची जबाबदारी स्वत:वर घेऊन रेल्वेमंत्रिपदाचा त्यांनी दिलेला राजीनामा हे मनाच्या ठामपणाचेच निदर्शक होते. " There is iron in his soul. " ( त्यांच्या आत्म्यात पोलादाचा कणखरपणा आहे ) अशा शब्दांत भारतातील माजी अमेरिकन वकील प्रो. गालब्रेथ यांनी त्यांचे वर्णन एकदा केले होते. केंद्रीय गृहमंत्री असताना तारासिंगांच्या उपोषणाचा प्रश्न त्यांनी ज्या पद्धतीने हाताळला, त्यावरून हाच ठामपणा व कणखरपणा दिसून आला. द्रवीड मुन्नेत्र कळघमच्या फुटीर चळवळीला त्यांनी याच कणखरपणाने तोंड दिले आणि हिंदी संघराज्यातून फुटून निघण्याचा प्रचार करणे, हा देशद्रोहाचा गुन्हा ठरविणारे बिल पार्लमेंटने पास केले. काश्मीरच्या राजकारणातून बक्षींना दूर करण्याचा ठाम निर्णयही शास्त्रींचाच.

## अन्नप्रश्नावर ठामपणा नाही

वर उल्लेखलेल्या घटना शास्त्रींचा ठामपणा दर्शवितात हे खरे; पण काही महत्त्वाच्या प्रश्नांच्या बाबतीत त्यांच्यातील ठामपणाचा अभावही गेल्या आठ महिन्यांत दिसून आला. अन्न या बाबतीत त्यांचे सर्वांत मोठे अपयश अन्नप्रश्नाच्या आघाडीवरचे आहे. सबंध देशासाठी एकसूत्री धोरण ते ठामपणे अंमलात आणू शकले नाहीत. आठ महिन्यांत चार वेळा मुख्यमंत्र्यांच्या परिषदा त्यांनी घेतल्या, पण पंतप्रधानांचे धोरण मुख्यमंत्र्यांनी मान्य करण्याऐवजी मुख्यमंत्र्यांच्याच तंत्रानुसार पंतप्रधानांना चालावे लागत असल्याचे दृश्य दिसत आहे. ठामपणाचा अभाव जेथे फार जाणवला असा दुसरा प्रश्न ओरिसाचा. ओरिसाचे माजी मुख्यमंत्री पटनाईक आणि सध्याचे मुख्यमंत्री बिरेनमित्र यांच्याविरुद्ध असलेल्या आरोपांच्या चौकशीचे प्रकरणी चाललेली दिरंगाई अक्षम्य आहे, असेच म्हणावे लागेल.

## शास्त्री हीच आदर्श आचारसंहिता

मंत्र्यांसाठी आचारसंहिता तयार करण्यात आली आहे, पण पंतप्रधान शास्त्रींची

वागणूक म्हणजेच एक चालतीबोलती आदर्श आचारसंहिता आहे. आपली कामे करून घेण्यासाठी आपल्या अधिकारपदाचा व वजनाचा उपयोग ते कधीच करीत नाहीत. लखनौस उत्तर प्रदेशचे गृहमंत्री म्हणून नेमणूक झाल्यावर अलाहाबादमधील घर त्यांना सोडावे लागले, पण आपल्या कुटुंबाला दुसरी जागा मिळावी, म्हणून त्यांनी कधीही आपल्या वजनाचा उपयोग केला नाही. अनेक दिवस त्यांना घर नव्हते व ‘ गृह नसलेला गृहमंत्री ’ अशा शब्दांत त्यांचा उल्लेख केला जात होता.

शास्त्री परिश्रमपूर्वक आपली भाषणे लिहितात. मोजकेपणा व स्पष्टपणा त्यांच्या भाषणात यामुळेच आढळतो.

अरियालूर रेल्वे अपघाताची ( या अपघातात ११४ लोक ठार झाले होते. ) जबाबदारी रेल्वेमंत्री या नात्याने स्वत:कडे घेऊन त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला व योग्य पायंडा पाडला.

शास्त्रींनी एखादे खाते हाती घेतले की प्रथम त्या खात्याच्या सर्व फायली ते काळजीपूर्वक पाहतात व त्या खात्याशी संबंधित असलेल्या प्रश्नांची पूर्ण माहिती करून घेतात. त्यामुळे पार्लमेंटात प्रश्नोत्तराचे वेळी, अधिकाऱ्यांना सूचना देताना आणि लोकांची गाऱ्हाणी ऐकताना विषय त्यांच्या डोक्यात नेहमी तयार असतो. एखाद्या प्रश्नावर निर्णय घेताना किंवा धोरण ठरविताना शास्त्री आपल्या खात्याच्या सेक्रेटरीचीही मते व सल्ला शांतपणे ऐकतात व तो विचारात घेऊन निर्णय घेतात.

## शास्त्रींचे कार्यालय

सचिवालयाच्या परराष्ट्रखात्याचे विभागात पूर्वी नेहरूंचे कार्यालय होते, तेथेच आज शास्त्रींचे कार्यालय आहे. पाहुण्यांच्या स्वागतासाठी बहुतेक मंत्र्यांच्या व सेक्रटरींच्या कार्यालयात सोफासेट आढळतील, पण येथे ताठ पाठीच्या खुर्च्या असलेले मोजकेच फर्निचर दिसेल. भिंतीवर कलापूर्ण चित्रे नाहीत, एवढेच नव्हे तर महात्मा गांधी व पंडित नेहरूंचे फोटोही नाहीत. एका कोपऱ्यात पुस्तकांचे मोठे सेल्फ आहे. त्यातील बहुतेक पुस्तके राजकीय आहेत. कदाचित नेहरूंच्या वेळचीही ती असतील. नेहरूंच्या वेळी तेथे असलेला बुद्धाचा सुंदर पुतळा व बूमरँग आकाराचे टेबल आता तेथ नाही. या व नेहरूंच्या इतर वस्तू तीनमूर्ती निवासातील नेहरू संग्रहालयात हलविण्यात आल्या आहेत.

शास्त्रींचे टेबल स्वच्छ व व्यवस्थित असते. त्यावर फक्त नुकतीच आलेली एक-दोन कागदपत्रे दिसतील. बाहेर पाठवायच्या ट्रेमध्ये एकदोन फायली असतील. शास्त्री खुर्चीत नेहमीच ताठ बसून काम करतात. मृदू पण स्पष्ट आवाजात ते बोलत असतात आणि त्याचवेळी त्यांचे विशाल नेत्र तुमचा वेध घेतात.

## कामापुढे जेवणाचा विसर

मंत्रिपदावर असोत किंवा नसोत, शास्त्री सतत कामात गढलेले असतात. निवडणूक मोहिमेच्या काळात ते अठरा तास काम करीत. नेहरूंच्या तीनमूर्ती निवासा-

तच त्यांचा मुक्काम असे. निवडणुकीच्या कामात ते एवढे गढलेले असत की त्यांना जेवायलाही सवड नसे. त्यांनी आपल्या सवडीप्रमाणे खावे, म्हणून नोकर त्यांच्या खोलीत थाळी आणून ठेवी, पण अनेकदा दुसऱ्या दिवशी सकाळी त्याला आढळून येई की थाळीला शास्त्रींनी हातही लावलेला नाही.

पंतप्रधानपद स्वीकारल्यावर २७ जूनला आजारी पडेपर्यंत अठरा अठरा तास काम करीत. पहाटे पाचला उठायचे आणि शेवटची फाईल निकालात काढीपर्यंत झोपायचे नाही असा त्यांचा क्रम होता. अलीकडे काही महिने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार चार तास काम त्यांनी कमी केले आहे.

## दारिद्र्याचे चटके

नेहरूंना गरिबांबद्दल सहानुभूती होती. शास्त्रींना नुसती सहानुभूतीच नव्हे, तर दारिद्र्याचा अनुभव आहे. दारिद्र्याचे चटके त्यांनी सहन केले आहेत. त्यांचे वडील शारदाप्रसाद शिक्षक होते. आपल्या मुलाची जन्मपत्रिका तयार करण्यासाठी-सुद्धा त्यांच्याजवळ पैसा नव्हता. त्यामुळे शास्त्रींची पत्रिकाच तयार केलेली नाही. उपचार करायला पुरेसा पैसा जवळ नव्हता, म्हणून शास्त्रींची एक मुलगी टायफॉइडने वारली. सायकलला पैसे नाहीत म्हणून रोज सहा सात मैलांची पायी रपेट करीत ते कॉलेजला येत.

दारिद्र्यातही शास्त्रींनी स्वाभिमान सोडला नाही. नावेचे भाडे द्यायला पैसे नाहीत म्हणून ते नदी पोहून शाळेला जात, असे सांगितले जाते, पण ते खरे नाही. एकदा ते नदी पोहून गेले होते, पण तो प्रसंग निराळ्या संदर्भातला आहे. विद्यार्थी लालबहादूर मित्रांबरोबर एकदा एका जत्रेला गेले होते. जत्रा पाहून मुले परतली व नावेत जाऊन बसली, पण लालबहादूर मागेच रेंगाळलेले दिसले. नाव सुटली आणि अंधार झाल्यावर लालबहादूरनी नदीत उडी टाकली व अर्धा मैल पोहून ते दुसऱ्या काठास लागले. नावाड्याला द्यायला लालबहादुरांजवळ पैसे नव्हते, पण ही गोष्ट त्यांना मित्रांना कळू द्यावयाची नव्हती, म्हणून ते मागे रेंगाळले व नंतर नदी पोहून गेले.

हा स्वाभिमानी मुलगा नेहरूंच्या सहवासात येऊन राष्ट्रकार्यात ओढला गेला. त्याने अनेकदा कारावास भोगला. काँग्रेस संघटनेत तसेच मंत्रिमंडळात अनेक जबाबदारीची कामे निष्ठेने पार पाडली. पंडित नेहरूंच्यानंतर नेतेपदी त्यांची निवड झाली आणि अनेक अडचणींना तोंड देत, ही मोठी जबाबदारी शास्त्री आज पार पाडीत आहेत. त्यांच्या मर्यादा या केवळ व्यक्तीच्या मर्यादा नसून भारतीय जनतेच्या मर्यादा आहेत.

## एवढी चांगली व्यक्ती मिळणार नाही

शास्त्रींचा रेल्वेमंत्रिपदाचा राजीनामा स्वीकारताना नेहरू म्हणाले होते, "केवळ सरकारमध्येच नव्हे तर काँग्रेसमध्ये सहकारी व मित्र म्हणून त्यांच्याबरोबर

काम करण्याचे भाग्य मला लाभले. कोणत्याही कामात यापेक्षा चांगला सहकारी व मित्र मिळावयाचा नाही. अत्यंत उच्च प्रतीचे चारित्र्य, निष्ठा, ध्येयासाठी सर्वस्व समर्पण करण्याची वृत्ती, सदसदैविवेकबुद्धी आणि परिश्रमशीलता याबाबतीत त्यांच्याहून अधिक चांगली व्यक्ती भेटावयाची नाही." शास्त्रींचा यापेक्षा चांगला गौरव आणखी कोणी करू शकणार नाही.

## अणुबाँबचा निर्णय चुकीचा

पंतप्रधान शास्त्रींचे सरकारपुढे संरक्षण आणि अन्न हे देशापुढील अत्यंत महत्त्वाचे प्रश्न आहेत. त्यांतही संरक्षणाचा प्रश्न सर्वांत महत्त्वाचा; कारण तो देशाच्या स्वातंत्र्याशी निगडित आहे. आपले स्वातंत्र्य सुरक्षित राहिले, तरच बाकीचे प्रश्न आपण सोडवू शकू. चीनचे आक्रमण पुन्हा होवो न होवो, आपणास नेहमीच जागरूक राहिले पाहिजे, सुसज्ज राहिले पाहिजे. चीनने अणुबाँबचा स्फोट केल्यानंतर तर आपल्या संरक्षणव्यवस्थेचा विचार त्या पातळीवर आपणास करावा लागणार आहे. यातूनच उपस्थित होणारा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे भारताने अणुबाँब तयार करावा की नाही ?

लोकसभेत झालेल्या चर्चेत, तसेच आपल्या अनेक जाहीर भाषणांत भारत अणुबाँब तयार करणार नाही, हे पंतप्रधान शास्त्रींनी स्पष्ट केले आहे. आपल्या आतापर्यंतच्या शांततेच्या धोरणाशी सुसंगत अशीच ही भूमिका आहे, हे खरे, पण शांततेच्या उदात्त धोरणाची सांगड आपल्या संरक्षणाशी घातली पाहिजे. शांततेचा पुरस्कार करताना संरक्षणाकडे आपण दुर्लक्ष केले आणि चिनी आक्रमणाच्या वेळी त्याची जबर किंमत आपणास द्यावी लागली. त्यानंतर आपण जागे झालो आणि इंग्लंड-अमेरिका व रशियाची मदत मिळवून आधुनिक शस्त्रांनी आपले लष्कर सुसज्ज ठेवण्याच्या योजना आखल्या, पण अणुबाँब आपल्याजवळ नसेल तर इतर कितीही तयारी केली, तरी चीनच्या मानाने आपले संरक्षण-सामर्थ्य तोकडेच राहणार, हे उघड आहे. आपल्याजवळ अणुबाँब असेल, तरच चीनला जरब बसेल व आपणावर हल्ला करण्यापूर्वी विचार करावा लागेल.

## इतर राष्ट्रांचे नियंत्रण नको

अणुबाँब आपण तयार करावयाचा की इतर राष्ट्रांकडून मिळवावयाचा ? इतर राष्ट्रांकडून मिळवावयाचा याचा अर्थ इतर राष्ट्रांनी आपल्या भूमीवर आणि हिंदी महासागरात अण्वस्त्रांचे तळ स्थापन करावयाचे व चीनने अनुबाँबचा हल्ला केल्यास या राष्ट्रांनी आपले संरक्षण करायचे, म्हणजेच त्यांचे अणुछत्र आपण स्वीकारावयाचे. तसे झाल्यास संरक्षणाच्या बाबतीत आपण स्वतंत्र न राहता त्यांच्या नियंत्रणाखाली जाणार. बड्या राष्ट्रांच्या लष्करी गटात सामील होणारी राष्ट्रे आणि बड्या राष्ट्रांचे अणुछत्र स्वीकारणारा भारत यांच्यात मग काय फरक राहिला ? अणुबाँब तयार न करण्याच्या भारताच्या निर्णयाचे स्वागत अमेरिकेने केले. भारताने अणुबाँब

तयार करण्यापेक्षा पाश्चात्त्य गटात सामील होऊन, त्यांच्याकडून अण्वस्त्रे मिळवावी, अशी स्पष्ट सूचना पार्लमेंटातील चर्चेत स्वतंत्र पक्षाचे एक प्रमुख नेते मिनू मसानी यांनी केली. स्वतःचा अणुबॉंब आपण तयार केला नाही, तर अणुयुद्धात आपल्या संरक्षणासाठी अण्वस्त्रधारी बड्या राष्ट्रांवरच आपणास अवलंबून राहावे लागणार व त्यांच्या नियंत्रणाखाली आपण जाणार हे उघड आहे.

### शस्त्रकपातीच्या वाटाघाटी

पंतप्रधान शास्त्रींनी अणुछत्राची मागणी कोणत्याही राष्ट्राकडे केलेली नाही, असे लोकसभेतील चर्चेत परराष्ट्रमंत्री स्वर्णसिंग यांनी सांगितले. चीनच्या अणुस्फोटाविरुद्ध जागतिक लोकमत संघटित करावे; ज्यांच्याजवळ अण्वस्त्रे नाहीत, अशा राष्ट्रांना अणुहल्ल्यापासून संरक्षणाची हमी बड्या राष्ट्रांनी घ्यावी, अण्वस्त्रबंदी व शस्त्र-

**'हा गृहमंत्री असणे शक्य नाही'**

उत्तर प्रदेशचे गृहमंत्री म्हणून नेमणूक झाल्यावर लालबहादूर शास्त्री आग्रा येथे प्रथमच भेट देत होते. स्टेशनवर त्यांच्या स्वागतासाठी स्थानिक नागरिक व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, पण शास्त्रींचा डबा ही मंडळी हार घेऊन उभी होती, तेथे न थांबता पुढे थांबला. शास्त्री शांतपणे उतरले व तिसऱ्या वर्गाच्या फाटकाशी गेले. "मंत्री स्टेशनबाहेर गेल्याशिवाय मी तुम्हांला बाहेर जाऊ देणार नाही,' असे म्हणून एका पोलिसाने त्यांना अडविले. 'तू ज्यांना अडविले आहेस, तेच गृहमंत्री आहेत,' असे कोणी तरी त्याच्या कानात कुजबुजले, पण ते हसण्यावारी नेऊन तो पोलीस म्हणाला, "हा ठेंगू माणूस गृहमंत्री असणे शक्य नाही." गृहमंत्र्याबद्दल असे उद्गार काढल्याबद्दल त्या पोलिसाला काही झळ लागू नये, याकडे अर्थातच शास्त्रींनी लक्ष दिले.

शास्त्री क्वचितच संतापतात. मुलांना त्यांनी कधी मारहाण केली नाही किंवा रागावून बोलले नाहीत. फार वर्षांपूर्वीची गोष्ट. त्यांचा मोठा मुलगा हरी त्यावेळी दहा वर्षांचा होता. त्याच्या खोड्यांचा राग येऊन ते हातात काठी घेऊन त्याच्यामागे धावले, पण त्याचवेळी 'पळ, बाथरूममध्ये लप,' असे ते ओरडून मुलाला सांगत होते.

दुसरा प्रसंग एका टांगेवाल्याचा. शास्त्री त्यावेळी उत्तर प्रदेश मंत्रिमंडळात पार्लमेंटरी सेक्रेटरी होते. टांगेवाल्याने आपणास लांबच्या मार्गाने नेऊन उशीर केला व फसविले, म्हणून ते त्याला फार कडक बोलले, पण नंतर त्यांचे त्यांनाच वाईट वाटले व जणू आपल्या कटू शब्दांची भरपाई म्हणून त्याला आठ आण्याऐवजी दोन रुपये भाडे त्यांनी दिले.

कपात करार लौकर व्हावे, असा पंतप्रधान शास्त्रींचा प्रयत्न आहे. या गोष्टी होणार नसतील, तर अण्वस्त्रस्पर्धा वाढत जाईल व त्याबरोबर युद्धाचा धोकाही वाढेल असे शास्त्रींना वाटते. या प्रश्नाकडे ते केवळ भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने नव्हे तर जागतिक शांततेच्या व्यापक दृष्टीने पाहतात, पण या प्रयत्नांना यश येण्याची शक्यता नजीकच्या कालात तरी फारशी दिसत नाही. अण्वस्त्रबंदी व शस्त्रकपातीसंबंधी वाटाघाटी करण्यास रशिया व अमेरिका आज अनुकूल आहेत, याचे कारण अण्वस्त्रांच्या बाबतीत दोघेही जवळजवळ तुल्यबळ आहेत. अण्वस्त्रचाचण्यांना अंशत: बंदी करणारा करार या राष्ट्रांनी केला, पण फ्रान्सने त्यावर सही केली नाही. अण्वस्त्रस्पर्धेत फ्रान्स–रशिया अमेरिकेच्या मागे आहे. या राष्ट्रांच्या बरोबरीला यावयाचे, तर त्याला आणखी अण्वस्त्रचाचण्या केल्या पाहिजेत. तेव्हा चाचणीबंदीचा करार त्याला कसा मान्य होईल ? फ्रान्सची जी भूमिका तीच चीनची भूमिका आहे आणि अण्वस्त्रबंदी कराराला ही दोन राष्ट्रे तयार होत नाहीत, तोपर्यंत त्यासंबंधीच्या वाटाघाटींना काही अर्थ नाही.

जागतिक युद्धातूनच जागतिक क्रांती होईल. युद्धाशिवाय साम्राज्यशाही नष्ट होणार नाही. अणुयुद्ध झाले तरी हरकत नाही. त्यात चीनची अर्धी लोकसंख्या नष्ट होईल, पण जे वाचतील, ते साम्यवादी जगाची निर्मिती करतील, अशा चिनी नेत्यांच्या कल्पना आहेत. अणुयुद्धाची भीती त्यांना वाटत नाही. उलट असे युद्ध म्हणजे जागतिक क्रांतीची मोठी संधी आहे, अशी त्यांची धारणा असल्याने आपल्या हाती लागलेल्या अणुबाँबचा आततायीपणाने व अविचारीपणाने स्फोट करून चीन जगाला युद्धाच्या खाईत लोटण्याची शक्यता वाढली आहे.

अशा परिस्थितीत आपल्याजवळ स्वत:चा अणुबाँब असणे हीच स्वाभिमानी भूमिका आहे. अणुशक्तीचा आपल्या देशात आतापर्यंत झालेला विकास लक्षात घेता अठरा महिन्यांत आपणास अणुबाँब तयार करणे शक्य होईल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. आपल्या अर्थव्यवस्थेवर यामुळे ताण पडेल, हे खरे; पण देशाच्या संरक्षणासाठी एवढा ताण सहन करण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे. आमच्या नेत्यांनी या प्रश्नाचा सर्व बाजूंनी विचार करून आपल्या सध्याच्या धोरणाचा फेरविचार करावा, निदान आम्ही कधीच अणुबाँब तयार करणार नाही, अशा प्रकारच्या घोषणा करून स्वत:चे हात बांधून घेऊ नयेत. पंडित नेहरूंपेक्षा शास्त्री अधिक वास्तववादी व व्यवहारवादी आहेत. त्यांच्याकडून जनतेची ही अपेक्षा आहे.

## धान्य आघाडीवर अपयश

पंतप्रधान शास्त्रींपुढील दुसरा महत्त्वाचा प्रश्न अन्नधान्य टंचाई व भाववाढीचा. हा प्रश्न काही नव्यानेच उपस्थित झाला आहे, असे नाही; पण स्वातंत्र्याच्या सतरा वर्षांत यंदाइतके तीव्र स्वरूप त्याला कधी आले नव्हते. धान्यभावात दीड वर्षात बावीस टक्के वाढ झाली. गेल्या दहा वर्षांत ज्या प्रमाणात भाववाढ झाली,

तेवढी वाढ गेल्या दीड वर्षात झाली. ' भाववाढ हा देशापुढील सर्वांत निकडीचा प्रश्न आहे ', असे पंतप्रधानपदी निवड झाल्यावर पत्रकारांना दिलेल्या पहिल्याच मुलाखतीत शास्त्रींनी सांगितले, पण गेल्या आठ महिन्यांत या बाबतीत परिणामकारक उपाय योजण्यात सरकारला यश आलेले नाही. दोन महिने कळ काढा, नवे पीक हाती आले की परिस्थिती सुधारेल अशी आश्वासने मंत्र्यांनी दिली, पण परिस्थितीत फरक पडलेला नाही. धान्य प्रश्नावर ठाम निर्णय आणि त्याची कसोशीने अंमलबजावणी होण्याऐवजी विचारविनिमयाचा घोळच चालू आहे. आठ महिन्यांत मुख्यमंत्र्यांच्या परिषदा चार वेळा झाल्या, पण त्यांतून सर्व देशासाठी एकसूत्री धोरण काही निष्पन्न होऊ शकले नाही. मध्यवर्ती सरकार आणि राज्यसरकार यांच्या धोरणात एक-वाक्यता नाही. मोठ्या शहरांतून कायद्याने रेशनिंग सुरू करावे, अशी केंद्र-सरकारची सूचना, पण ती मुख्यमंत्र्यांना मान्य झाली नाही. अखेर या बाबतचे धोरण ऐच्छिक ठेवण्यात आले. त्यामुळे एकट्या कलकत्त्याशिवाय कोठेही कायद्याने रेशनिंग अस्तित्वात आले नाही.

व्यापाऱ्यांना साठे जाहीर करण्यासाठी पंतप्रधानांनी प्रथम पंधरा दिवस मुदत दिली. ती दोन महिने वाढविण्यात आली. यानंतर व्यापाऱ्यांना इशारे दिले, गुदामां-वर छापे घातले, वटहुकूम काढला, पण साठेबाजी कमी झालेली नाही आणि भाव कमी न होता वाढतच आहेत.

## प्रवास संपला पण शायरी संपेनात

शास्त्रींना उर्दू काव्याची फार आवड आहे. मुशायऱ्याचे निमंत्रण ते कधी चुकवीत नाहीत. एकदा पुणे–मुंबई प्रवासात एका मित्राशी त्यांची उर्दू शायिरे म्हणण्याची स्पर्धा झाली. बोरीबंदर आले, तरी शास्त्रींजवळचा शायिऱ्यांचा साठा संपला नाही. त्यांच्या मित्राने आपला पराभव आधीच कबूल केला होता.

## गुराख्याचा पोर

लालबहादूर लहानपणी गुराख्याचा पोर म्हणूनच वाढले असते, पण तो प्रसंग नियतीने टाळला. त्यांची आई रामदुलारीदेवी एकदा यात्रेस गेली असता, गंगेवर स्नानास गेली. कडेवर तीन महिन्यांचा लालबहादूर होता. गर्दीत आई चेंगरली गेली. मूल कडेवरून निसटले व बेपत्ता झाले. सुदैवाने ते एका गुराख्याच्या टोपलीत अलगद पडले होते. गुराख्याला मूल नव्हते. गंगामातेने प्रार्थना ऐकली, म्हणून त्याच्या झोपडीत आनंदीआनंद झाला. इकडे आईने मुलाचा खूप शोध करून अखेर पोलिसांकडे वर्दी दिली. पोलि-सांनी तपास लावला आणि त्या गुराखी पतिपत्नीने ते मूल अश्रुपूर्ण नेत्रांनी रामदुलारीदेवींच्या स्वाधीन केले.

## अपयश अंमलबजावणीत

व्यापारी सरकारला कसे वनवितात आणि सरकार कसे बनते, हे आंध्र, मद्रास व केरळ या राज्यांत दिसून आले. केंद्र सरकारने आंध्र व मद्रासमध्ये धान्य खरेदी केल्याने बाजारात कमी धान्य येते व त्यामुळे भाव वाढले आहेत, असा निर्णय आंध्र, मद्रास व केरळच्या मुख्यमंत्र्यांचे बैठकीत जून १९६४ मध्ये घेण्यात आला. त्यामुळे राखीव साठे उभारण्याचा प्रयत्न सरकारने सोडून दिला, पण याचा अपेक्षित परिणाम दिसला नाही. भाव सुरवातीला थोडे कमी झाले, पण पुन्हा वाढले. आंध्रमधून केरळ, मद्रास व म्हैसूरला धान्यपुरवठा अपेक्षेइतका झाला नाही. केंद्र सरकारला अखेर आपल्या आधीच कमी झालेल्या राखीव साठ्यातून धान्य पाठविणे भाग पडले. जादा धान्य पिकविणारी राज्ये आपली जबाबदारी पार पाडीत नाहीत. ठरलेले निर्णय अंमलात आणीत नाहीत. धान्याबाबतचा बराचसा गोंधळ ठरलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यात आलेल्या अपयशातून निर्माण झाला आहे, अशी टीका कॉंग्रेस पार्लमेंटरी पक्षाच्या कार्यकारिणीचे बैठकीत करण्यात आली, पण परिस्थितीत सुधारणा झाली नाही.

## डॉ. गाडगीळ यांचा इशारा

धान्यटंचाई व भाववाढीच्या बाबतीत महाराष्ट्राचे चित्र काही निराळे नाही. "धान्यपुरवठ्याची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. येत्या चार महिन्यांत ती आटोक्यात आणली नाही, तर आणखी झपाट्याने बिघडण्याचा संभव आहे", असा इशारा विख्यात अर्थशास्त्रज्ञ धनंजयराव गाडगीळ यांनी नुकताच एका निवेदनात दिला. सरकारचे तांदळाबाबचे व ज्वारी-खरेदीबाबतचे धोरण कसे अयशस्वी होत आहे, यावर त्यांनी विदारक प्रकाश टाकला आहे. सरकारने तांदळाच्या ज्या किंमती ठर-

### १९४२ मधील भूमिगत शास्त्री

१९४२ च्या लढ्यात शास्त्रींनी काही काळ भूमिगत राहून कार्य केले. अलाहाबादेत आनंदभवनाच्या दुसऱ्या मजल्यावर ते एक आठवडा होते. खाली विजयालक्ष्मी राहात. त्यांच्या अटकेचे व घराच्या झडतीचे वॉरंट घेऊन एकदा पोलीस आले. विजयालक्ष्मींनी वर सांकेतिक सूचना पाठविली. पोलिसांना गप्पात गुंतवून ठेवले. त्यांच्याबरोबर जायला त्या तयार झाल्या. पोलिसांनी खालचा मजला तपासल्यावर वरचा मजला तपासण्याची त्यांना जरूरी वाटली नाही. वरच्या मजल्यावर शास्त्री गुप्त सायक्लोस्टाईल पत्रके काढण्याचे काम करीत असत. त्यात भूमिगत कार्यकर्त्यांना सूचना होत्या. पोलिसांचे हाती ही पत्रके लागू नयेत, म्हणून शास्त्रींनी त्यांचे बारीक तुकडे केले व ते संडासाच्या कमोडमध्ये टाकले.

विल्या, त्यापेक्षा जास्त किंमत देऊन व्यापारी शेतकऱ्यांकडून तांदूळ खरेदी करतात, पण आपल्या हुकमाचा भंग केल्याबद्दल सरकारने या व्यापाऱ्यांविरुद्ध काही कारवाई केली नाही. सर्व भात अखेर सडण्यासाठी गिरणीत येत असल्याने भातगिरण्यांमध्ये तांदळाची सक्तीची खरेदी सरकारला करता येईल, पण सरकार तसे करीत नाही. सरकारी ज्वारीखरेदीचे बाबतीतील अनुभवही फारसा उत्साहजनक नाही, अशी गाडगिळांची टीका आहे.

धान्य प्रश्न हा अपक्षीय प्रश्न मानून त्या दृष्टिकोनातून त्याकडे पाहिले पाहिजे, अशी सूचना गाडगिळांनी केली आहे. अन्नप्रश्न सोडविण्यासाठी सर्वांनी सहकार्य द्यावे, अशी विनंती आमचे मंत्री नेहमीच करीत असतात, पण त्यांना सहकार्य हवे असते, ते केवळ त्यांनी ठरविलेले धोरण अमलात आणण्याच्या बाबतीत. विरोधी पक्षातील कार्यकर्त्यांच्या रास्त सूचना विचारात घेऊन या धोरणात बदल केल्याचे क्वचितच आढळते. सहकार्य म्हणजे आपल्या धोरणापुढे विरोधी पक्षांनी मान तुकविणे, असाच सरकारचा सहकार्याचा अर्थ असेल, तर सहकार्य कसे मिळेल ?

धान्यप्रश्नावर निदर्शने, सत्याग्रह, महाराष्ट्र बंद, भारत बंद यासारख्या चळवळी विरोधी पक्ष करीत आहेत. काँग्रेसला बदनाम करून जनतेत आपले वजन वाढविण्याचा हेतू यामागे नसेलच, असे नाही, पण प्रत्यक्षात धान्यप्रश्न सुटण्यास यामुळे काय मदत होणार आहे ?

परदेशी धान्य आयात दुप्पट करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत घेण्यात आला. परदेशी धान्य आयात कमी होऊन देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याऐवजी हे आयातीचे प्रमाण वाढवीत आहे, यासारखा अन्नआघाडीवरील आपल्या अपयशाचा दुसरा बोलका पुरावा कोणता ?

● ● ●

## इतरांपेक्षा चांगला वागेन

सहा वर्षांचा लालबहादूर सवंगड्याबरोबर एका सार्वजनिक बागेत गेला. मित्रांनी झाडावर चढून फळे काढली. लालबहादूर कावऱ्याबावऱ्या नजरेने आजूबाजूस पाहात होता. त्याने जवळच्या एका झुडपाचे फूल तोडले. एवढ्यात माळी आल्याचा इशारा एका मुलाने दिला. सर्व मुले पळून गेली. लालबहादूर तेवढा राहिला. माळ्याने त्याला चांगला मार दिला.

लालबहादूर म्हणाला, "मी गरीब आहे. मला वडील नाहीत. मला का मारता ?"

माळी हसत म्हणाला, "म्हणूनच तर तू अधिक चांगले वागले पाहिजेस."

लालबहादूरच्या संस्कारक्षम मनावर त्या शब्दांचा फार परिणाम झाला. ते शब्द पुटपुटतच तो घरी आला. मला वडील नाहीत म्हणून मला इतरांपेक्षा चांगले वागले पाहिजे आणि इतरांपेक्षा चांगले वागण्याची शपथ त्याने घेतली.

# व्यक्ती आणि वार्ता

## □ कै. मैथिलीशरण गुप्त

कै. मैथिलीशरण गुप्त हे खऱ्या अर्थाने भारतीय कवी होते. त्यांच्यावर कोणत्याही विदेशी अथवा पाश्चात्त्य गोष्टीची मात्रा चालली नाही किंवा पाश्चात्त्यांच्या प्रभावामुळे ते कधीही भारावून गेले नाहीत. ते एक वैष्णव कवी होते. सर्व धर्मांबद्दल उच्च व उदार दृष्टिकोन असणारा तो वैष्णव असा अर्थ यथे अभिप्रेत आहे. मैथिलीबाबूंनी स्वत: हिंदू असूनही मुसलमान, ख्रिश्चन, शीख व बौद्ध या धर्मांबद्दल व त्यांच्या धार्मिक संस्कृतीबद्दल आपल्या काव्यांत खूप लिहिले आहे आणि या सर्व धर्मांत असलेल्या थोर तत्त्वांचा गौरवाने उल्लेख केला आहे. त्यांच्या 'यशोधरा' या काव्यात ठिकठिकाणी बौद्ध धर्माचा आपुलकीने उल्लेख केलेला आढळतो. त्यांच्या काव्यात कौटुंबिक व्यवहाराचे व जीवनाचे फारच सुंदर चित्रण केलेले आहे. कुटुंबसंस्था ही सामाजिक संस्कृतीचा मूळ आधार आहे, असे ते मानीत. त्यामुळे त्यांनी आपल्या काव्यांत अनेक ठिकाणी या कल्पनेची जोपासना केली आहे. अशाप्रकारचे वर्णन वा चित्रण आधुनिक हिंदी कवींच्या काव्यांत क्वचितच आढळते. त्यांना लोक 'दद्दा' म्हणजे आजोबा असे म्हणत. त्यांनी आपला काव्य-संभार 'दद्दा'च्या दृष्टिकोनातूनच सादर केला आहे. त्यांच्या काव्यांत भारतीय परंपरा व सोपेपणा यांचा अद्भुत मिलाफ दिसून येतो. शिवाय स्पष्टता तर आहेच. त्यांचे कोणतेही काव्य घ्या, त्याचे कथानक पौराणिक वा ऐतिहासिक असले, तरी आधुनिक प्रश्नांची गुंफण त्यात इतक्या कौशल्याने केलेली असते की या दोन गोष्टी वेगवेगळ्या करणेच शक्य होत नाही. थोड्या वेगळ्या शब्दांत असे म्हणता येईल, की त्यांनी नेहमी प्राचीन व नवीन गोष्टींचा समन्वय केला. आधुनिक काळातील अनेक कवींनी अशी समन्वयी काव्ये लिहिली, परंतु त्यांपैकी फक्त गुप्त यांच्याच काव्यांना लोकप्रियता लाभली. त्यांच्या 'साकेत' या महाकाव्यात व इतरत्रही सुरवातीस जी मंगलाचरणे लिहिलेली आहेत, ती सर्व मंगलाचरणे आधुनिक आहेत. त्यांच्या काव्यांचे मुख्य वैशिष्टय म्हणजे आदर्श स्त्रीचे चित्रण आणि ती स्त्रीपात्रे पौराणिक वा ऐतिहासिक असली तरी लौकिक वाटतात. अलौकिकत्व त्यांच्यात चुकूनही आढळत नाही. भारतीय तत्त्वज्ञान व भक्ती यांवर त्यांचा अढळ विश्वास होता. त्यांचा हा विश्वास त्यांच्या काव्यांत





सर्वत्र प्रकर्षाने दिसून येतो. त्यांच्या गांधीवादी दृष्टिकोनामुळे त्यांना राष्ट्रकवी म्हटले जाऊ लागले. छंद आणि यमक-अनुप्रास यांचे तर त्यांना वरदानच मिळाले होते. त्यांनी संस्कृतनिष्ठ भाषेत काव्ये लिहिली असली तरी त्यांची संस्कृत भाषा इतकी रूढीमुक्त आहे की ती सहज अर्थसुलभ वाटते.

हिंदीतील थोर कवी अशी प्रसिद्धी मिळाली, तरीही त्यांना कधी गर्वाने स्पर्श केला नाही. ते आरंभापासून अखेरपर्यंत नम्र होते. त्यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त एकदा त्यांचा सत्कार करण्यात आला, तेव्हा उत्तरादाखल भाषण करताना ते म्हणाले, "कवी या दृष्टीने मला काहीही महत्त्व नाही. एखादा थोर पुरुष येत असला म्हणजे त्याचा जयजयकार करीत काही मंडळी पुढे येतात व नंतर

तो थोर पुरुष येतो. त्याप्रमाणे मी माझ्यानंतर येणाऱ्या कविवृंदांचा फक्त प्रतिध्वनी आहे."

कै. मैथिलीशरण गुप्त यांच्या काव्यांत भाषणाची प्रवृत्ती आढळत नाही. सर्व पात्रे घरगुती भाषा बोलतात. लांबलचक वाक्ये व पाल्हाळिक बोलणे यांचा मागमूसही दिसत नाही. त्यांची भाषा प्रौढ असून वैशिष्टयपूर्ण अभिव्यक्ती व विपुल शब्दभांडारातून अचूक शब्द शोधून काढून त्याचा प्रयोग करण्याची हातोटी या दोन गुणांचा सुरेख संगम त्यांच्या काव्यांत आढळून येतो.

ते स्वतः खूप मितभाषी होते. भाषण करणे त्यांच्या स्वभावात नव्हते, मात्र खासगी चर्चेत ते अहमहमिकेने भाग घेत. साहित्य हा कलाप्रकार फक्त कलेसाठीच असू नये, तो जीवनोपयोगी असावा, असे त्यांचे मत होते. त्यांनी ५० वर्षांहून अधिक काळ साहित्यसेवा केली. पन्नास वर्षांच्या या दीर्घकाळात त्यांनी फक्त काव्यच लिहिले. इतरांप्रमाणे कथा, कादंबरी किंवा निबंध यांपैकी काहीही लिहिले नाही. आरंभापासून शेवटपर्यंत ते कवीच राहिले. राम हे त्यांचे दैवत होते. वडील, एक हास्यकवी मुनशी अजमेरी व महावीरप्रसाद द्विवेदी या त्रयींमुळे काव्य लिहिण्याची प्रेरणा मिळाली, असे ते सांगत.


* * *

## □ छायाचित्रकार शिंदे

पुणे हे औद्योगिकीकरणामुळे झपाटयाने बदलत आहे. त्यातील सांस्कृतिक चळवळींच्या क्षेत्राचा सतत विस्तार होत आहे. बहुजनसमाजातील, जीवनाच्या विविध थरातील स्त्री-पुरुषही या सांस्कृतिक व सामाजिक विकासात अहमहमिकेने पुढे ेत आहेत. याचे प्रत्यंतर म्हणजे पुण्यात नव्यानेच सुरू होऊन यशस्वी होत चाललेली कला-कौशल्यांची प्रदर्शने. फुलांची किंवा चित्रकलेची किंवा छायाचित्रांची हौस असणे व ती परवडणे याला एक किमान आर्थिक व सांस्कृतिक पातळी गृहीत आहे. एकेकाळी फक्त मुंबईतच हे घडू शकत होते. आता पुण्यालाही ही बहुजिनसी व बहुढंगी कळा हळूहळू चढत चालली आहे. जुने सदाशिवपेठी, एकजिनसी व एकमार्गी पुणे लयास चालले. त्याचबरोबर तो सुविख्यात पुणेरी स्वभाव, पुणेरी तत्त्वनिष्ठा आणि पुणेरी बाणाही. आता नवे ' महानगर पुणे ' उदयास येत आहे.

' माणूस'चे एक छायाचित्रकार श्री. मारुती दत्तात्रय शिंदे हे पुण्यातील अशा विविध कलाक्षेत्रांत धडपडणाऱ्या तरुण कलावंतांचे प्रतिनिधीच आहेत. १९६१ च्या जुलै अंकात ' माणूस 'ने सादर केलेला कोकणच्या वादळग्रस्तांचा छायाचित्र–आलेख शिंदे यांचा होता. ' माणूस 'तर्फे १९६३ जुलैमध्ये शिंदे यांना पुन्हा पंढरपूरची छायाचित्रे घेण्यासही पाठविण्यात आले होते. सध्या ते बॉम्बे इंजिनीअरिंग ग्रुपमध्य फोटोग्राफर म्हणून नोकरीस आहेत. यापूर्वी ते भिलाई पोलाद कारखान्यात बिल्डिंग कन्स्ट्रक्शन विभागात मिस्त्री म्हणून काम करीत होते. काही दिवस पुण्यात टिळकरोडवर त्यांचे फ्रेममेकिंगचेही दुकान होते.

-सदाशिव पेठेत राहतात,
पण सदाशिवपेठी नाहीत.



आज शिंदे यांचे वय ३३ वर्षांचे आहे. वयाच्या १२ वर्षांपासूनच त्यांना फोटोग्राफीचा हा छंद जडला. रोली कॉर्ड या भारी कॅमेऱ्याने त्यांनी फोटोग्राफीला सुरवात केली व आजही ते तोच कॅमेरा वापरीत आहेत. 'फोटोग्राफिक सोसायटी ऑफ महाराष्ट्र'चे ते प्रथमपासून सभासद आहेत व ह्या सोसायटीच्या पहिल्याच वर्षीच्या 'बेस्ट वर्क ऑफ दि इअर'बद्दल त्यांना कप मिळाला होता. श्री. अप्पासाहेब भट, श्री. आर. के. शिंदे, श्री. ए. एन. राव, डॉ. कानिटकर यांचे त्यांना प्रथमपासून मार्गदर्शन होते.

१९५८ साली वॉशिंग्टन येथे भरलेल्या 'नॉर्थ वेस्ट इंटरनॅशनल फोटो सलून'-मध्ये पुण्याच्या फोटोग्राफिक सोसायटीने पाठविलेल्या पाच छायाचित्रांपैकी दोन श्री. शिंदे यांची होती. १९५९ साली बेल्जम येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शनासाठी हिंदुस्थानातून दोन चित्रे पाठविण्यात आली, त्यांतील एक चित्र शिंदे यांचे होते. ॲमॅच्युअर फोटोग्राफर, लंडन या संस्थेचे १९६० सालातील पहिले बक्षीस शिंदे यांनी मिळविले व ६२ साली याच संस्थेचे सर्टिफिकेटही त्यांना मिळालेले आहे.

'इंटर नॅशनल फेडरेशन ऑफ फोटोग्राफी' या संस्थेतर्फे नुकतीच शिंदे यांना पदवीही मिळाली आहे. या पदवीसाठी १२ फोटो पाठवावे लागतात. ते सर्व निवडले गेले तरच या संस्थेची पदवी मिळते. या बारा फोटोंपैकी एक फोटो 'माणूस', मे १९६२ च्या अंकावरील मुखपृष्ठाचा होता व तो महाराष्ट्र दिनानिमित्त 'माणूस'च्या खास सांगण्यावरून शिंदे यांनी काढला होता हे विशेष.

येत्या २६ जानेवारीला, पुणे येथील अभिनव कला विद्यालयात शिंदे त्यांच्या निवडक छायाचित्रांचे प्रदर्शन भरत आहे. पुण्यात छायाचित्र प्रदर्शनाचा एकपात्री प्रयोग (One Man Show) हे एक धाडसच आहे. पण श्री. हरिश्चंद्र चव्हाण, श्री. प्रताप मुळीक इत्यादि मित्रांच्या सहकार्याने शिंदे यांनी हा नवा उपक्रम हाती घेतला आहे. ●

# संस्कार आणि परंपरेची लक्ष्मणरेषा मानणारे— पुरुषोत्तम लक्ष्मण

—वि. ग. कानिटकर



यंदाच्या दिवाळी-अंकांचे ठळक वैशिष्टय कुणी विचारले, तर पु. ल. देशपांडे यांनी कुठेच लिहिले नाही ! ते यंदा कुठेच लिहिणार नाहीत, असे आधीच त्यांनी जाहीर केले असते, तरी लोकांना क़मी चुकल्यासारखे झाले असते. ऐन दिवाळीत फटाक्यांवर बंदी यावी किंवा दसऱ्याला दही मिळू नये, अशी ही वाचकांवर मोठी आफतच आली. 'आणखी एक रस', 'सहानुभाव संप्रदाय' यांसारखे एखादे दीर्घकाल वाचकांच्या स्मरणात राहणारे गद्यविडंबन किंवा किमानपक्षी—'संगीत चिवडामणी', 'बोलट', 'लखू रिसबूड' असा एखादा नवा चेहेराही पु. लं. नी यंदा दाखवू नये, यामुळे असंख्यांची निराशा झाली. विनोदाचे हे 'कुलीन विद्यापीठ' रसिकांच्या 'एकपात्री' अनुदानाने हतप्रभ झाले काय, अशी शंका त्यांच्या चाहत्यांना येऊ लागली. गुळगुळीत करून घेण्यासाठी एकही गिऱ्हाईक या कारागीराला मिळू नये, हे पाहून

[पृष्ठ ३४ वर चालू]



# विनोदाची दहीहंडी

## एक चिंतन

चंद्रशेखर मराठे

मुंबई-पुणे रस्ता. संध्याकाळची वेळ. पुण्याच्या रोखाने चाललेल्या तीन स्कूटर्स- क्षितिजापार ओसंडलेली नीरव धूसरता. तळेगावजवळच्या एका चढाच्या माथ्यावर कोठून तरी एकदम सूर उधळतात – गोविंदा आला रे –

उताराच्या शेवटी रस्त्याच्या कडेला एक सिनेमाचा तंबू आहे. पोरेठोरे गाण्याच्या तालावर नाचताहेत-गाताहेत. स्कूटर्स थांबतात. गाणे चालू आहे. ते सरळ-थेट सूर आसमंतात तुडुंब भरत आहेत. अवघ्या वातावरणाने-डोंगराच्या धूसरतेने–आभा-

ळाच्या नसलेपणाने नाचरा फेर धरला आहे. गोविंदा आला आहे–

आणि एकटाच नाही, बरोबर पाचसहा-सातआठ सवंगडी आहेत. ही लोणी चोरणारांची सेना येते आहे. ब्रिजबाले-सांभाळ तुझा हंडा–पण यांच्या तडाख्यातून सुटण्याचा काही मार्ग नाही. पाहा, कशी नाचतकुदत टोळी येते आहे. आज हे दुधाची होळी खेळल्याशिवाय जाणार नाहीत.

गाणे पुन्हा लागते. पोरांच्या नाचाची लय वाढली आहे. सिगारेटचा धूर हरवलेल्या वातावरणात भोवंडत आहे. समोर ते अनामिक गाव नाही. मुंबईच्या चाळीच्या गॅलऱ्यांना बांधलेली दहीहंडी आहे. –आज कोणी रामा नाही– सारे गोविंदा ! आज हाताला भांडयांचा-मातीचा वास नाही-चंदनाची उटी आहे. साऱ्यांनी फेर धरला आहे. नाचताहेत–गाताहेत. एकमेकांच्या खांद्यावर चढताहेत-पडताहेत-हसताहेत. दहीहंडीकडे लक्ष लागले आहे.

वरून पाऊस पडतो आहे. तो कमी असला तर गॅलऱ्यांतून पाण्याच्या बादल्या रिकाम्या होत आहेत, पण आज कितीही पाणी पडले तरी उत्साह कमी होणार नाही–या तर आभाळाच्या प्रेमधारा–आयाबायांच्या वात्सल्याचा वर्षाव–आज हा मुंबईतला रस्ता नाही. ही तर मथुरेची वाट. हा गोविंदा आज दहीदुधाची लयलूट करणार. ब्रिजवाले-आता सांभाळ ! गोविंदा आला रे—

हे सारे तीन मिनिटांत पकडले आहे. गोकुळातल्या गोपींना हुलकावण्या देणारे बालब्रह्म येथे नादब्रह्माच्या आधीन झाले आहे.

फेर धरणाऱ्या स्वरातून वाट काढीत स्कूटर्स निघतात. सूर अस्पष्ट होत जातात. अनिवर्चनीय असा मूड आला आहे. नाचरा-हसरा-उत्स्फूर्त-थोडासा ओबडधोबड, पण नखशिखांत चिंब भिजलेला !

अरे, हा मूड तर ओळखीचा आहे. आपण कैकदा असे हसलो आहोत-नाचलो आहोत-भिजलो आहोत. भांडयांच्या अस्पष्ट वासानेही आपला पाठलाग कोठेतरी केला आहे. कोठे बरे ?

## मराठी साहित्यातील ' मुड्स '

आठवायला फार प्रयास नकोत. हा ' गोविंदा मूड ' आहे श्री. पु. ल. देशपांडे यांच्या साहित्यविश्वाचा. मराठी साहित्यात असे अनेक मूड आहेत. फडके संप्रदायाचा झगमगता दिवाळीचा मूड, य. गो. जोशी परंपरेचा आषाढी एकादशीचा मूड, मिरासदारांचा सार्वजनिक गणेशोत्सवाचा मूड, किर्लोस्कर-स्त्रीमधील साहित्याचा संक्रांतीचा मूड आणि सध्या ऐन जोमात असलेला शिमगा मूड. तथाकथित नवसाहित्याच्या सर्वपित्री अमावास्येचा मूडही आपल्या ओळखीचा आहे. सगळयात नवीन असा नेमाडेप्रभृतींचा श्रावणीचा थोर मूड आपण चाखला आहे.

परंतु गेली कित्येक वर्षे आपणाला मारून टाकलेले आहे, असा देशपाडयांचा ' गोविंदा मूड ' विलक्षण आहे. येथे ताल आहे, सूर आहे. गडबड आहे, गोंधळ

आहे. दुसरा माझ्या खांद्यावर उभा राहिला म्हणून कुरकुर नाही. मी दुसऱ्याच्या खांद्यावर उभा राहिलो म्हणून गर्व नाही. कोणी अनवधानाने पडले तर येथे दिलखुलास हास्य आहे—मस्करी आहे. दहीहंडीची लज्जत येथे चढतपडत मिळविण्याची हौस आहे, ती माझ्या तब्येतीने टेबलावर सर्व्ह केली नाही, अशी तक्रार नाही—वेग वेगळे वाटप करून घेण्याचा तुटकपणा नाही. काय त्या दहीहंडीसाठी तडफडायचे, अशी विरक्ती नाही. येथे साऱ्यांबरोबर हसत-खेळत जी काही हाती येईल, ती गोड करून घेण्याची चाल आहे. हाती खापर आले तरी त्याची पूजा करण्याची श्रद्धा आहे

येथे रचण्याचा अट्टाहास नाही-वेचण्याची धांदल आहे. हास्याचा कवडसा येथे अश्रुबिंदूला इंद्रधनुष्याच्या सप्तरंगांचे देणे देऊन जात आहे. आनंदाचे-कैवल्याचे-कोडकौतुक करणारी ही आजन्माष्टमी आहे.

आजमितीला तरी देशपांड्यांचे साहित्य ' यासम हेच ' असे आहे. भाषाशैलीबाबत विचार करता त्यांचे साहित्य गडकरी संप्रदायामध्ये पडते. कोटी व शाब्दिक विनोद हे गडकरी ' घराण्याचे ' वैशिष्ट्य देशपांड्यांनी आता जवळजवळ पूर्णत्वास नेले आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. 'ओवी ज्ञानेशांची ' या चालीवर हल्ली साहित्यात ' कोटी देशपांड्यांची,' असा उल्लेख होऊ लागलेला आहे. परंतु भाषाशैलीचा हा एक मुद्दा वगळता देशपांड्यांचे साहित्य पूर्वीच्या व आताच्या सर्व साहित्याहून संपूर्णपणे निराळे आहे. मराठी साहित्याच्या संदर्भात देशपांड्यांचे साहित्य थोडेसे अ-साहित्यिक आहे, असे म्हटले तरी चालण्यासारखे आहे. याचे कारण देशपांड्यांच्या पैलुदार व्यक्तिमत्त्वातच प्रामुख्याने शोधावे लागेल.

## खडूचा संप्रदाय

आजवर मराठी साहित्य हे प्राध्यापक व शिक्षक—त्यातही मराठीचे—यांचेच प्रामुख्याने क्षेत्र राहिले आहे. आपल्या सर्वच साहित्याला खडूचा वास आल्यासारखा वाटतो, तो यामुळेच. रूढार्थाने साहित्यिक नसलेल्या लोकांनी—जीवनाच्या इतर अनेक क्षेत्रांतील लोकांनी मराठी साहित्यात फारशी 'भर घातलेली नाही. त्यामुळे काही फायदे तसे तोटेही झालेले आहेत. प्राध्यापक, शिक्षक-ब्रँड साहित्य जरा सफाईदार, पांडित्यपूर्ण व एकूण स्वास्थ्यपूर्ण वाटले, तरी ते बरेचसे एकेरी (एकेरीवर येणारे) राहिले. विशिष्ट परीघाच्या बाहेर ते केव्हाच पडू शकले नाही—पडले तेव्हा सायंकाळी फिरावयास जावे, तशा आविर्भावात पडले. जॉर्ज सावाच्या ' नाईफ हिल्स् अगेन ' सारखे एकही पुस्तक मराठीत नाही. आपल्या साहित्याच्या या प्राध्यापकी वळणामुळे मानवी जीवनातील अनेक संपन्न अनुभव आपल्या साहित्यात तितक्याशा जोमदारपणे येऊ शकले नाहीत. अलीकडे ही परिस्थिती पालटत आहे.

देशपांड्यांचे साहित्य या एकेरीपणापासून मुक्त आहे. नाट्य, संगीत, अभिनय, काव्य असे अनेक रिलेटेड कंगोरे देशपांड्यांच्या व्यक्तिमत्त्वात आहेत. त्यांनी व त्यांच्याच

शब्दांत सांगावयाचे तर दत्ताच्या गुरूंपेक्षाही जास्त नोकऱ्या धरल्या व सोडल्या. त्यांच्या विलक्षण संपन्न व्यक्तिमत्त्वाचा एक भाग म्हणून त्यांचे साहित्य निर्माण झाले व होत आहे. ते पूर्णपणे साहित्यिक नाहीत. यामुळे देशपांडे अनेक अनुभवांपैकी एक गोष्ट म्हणून साहित्याकडे पाहतात. याचा परिणाम त्यांच्या साहित्याच्या एकूण स्वरूपावर फार झाला आहे. ते साहित्यासाठी अनुभव घेत नाहीत, तर अनुभव म्हणून साहित्य निर्माण करतात. आपल्या संपन्न आयुष्याच्या ओघात जे अनुभव येतात, त्यांच्या आविष्काराचा एक मार्ग म्हणून साहित्यास त्यांच्या जीवनात स्थान आहे.

देशपांड्यांच्या साहित्यात व इतर साहित्यात एवढा फार फरक असण्याचे आणखी एक कारण म्हणजे 'तर्क' या गोष्टीकडे पाहण्याच्या दृष्टीतील फरक. नवसाहित्याच्या पूर्वीच्या साहित्यात 'तर्क' होता, परंतु तो साहित्यावर स्वार झालेला नव्हता. कथानकाच्या पेचदारपणात वाढ करण्यासाठी, व्यक्तिचित्रांची रंगत वाढविण्यासाठी व साहित्यकृतीची सफाई वाढविण्यासाठी तर्काचा उपयोग जुन्या साहित्यात होत असे. तो 'तर्क' तेव्हा फक्त साहित्यापुरताच मर्यादित होता. जीवनालाच तर्काची फूटपट्टी लावण्याचे धाडस त्यावेळेस कोणी केले नाही. यामुळे जुने (नव्याच्या पूर्वीचे) साहित्य अतिशय प्रसन्न, रंजक व पुनःप्रत्ययात्मक असे झाले. परंतु त्यात खोटे-पणाचे थोडेसे एलिमेंट आले. आपण वाचतो ते चांगले असते, पण प्रत्यक्ष जीवनात याहून आणखी काहीतरी आहे, असे सारखे हे साहित्य वाचताना जाणवते. मर्यादित तर्क हे साहित्याचे वैशिष्टय होय.

त्यानंतरचे नवसाहित्य पूर्णपणे तार्किक अशा स्वरूपाचे होते व अद्यापही आहे. येथे तर्कास अनन्यसाधारण महत्त्व आहे. चाकोरी, सामान्यत्व व निरर्थकता ही नव-साहित्याची त्रिमूर्ती पूर्णपणे तार्किक आहे. जीवनातील अनुभवांकडे केवळ तार्किक दृष्टिकोनातून पाहणे, किंबहुना तर्काच्या माध्यमातूनच अनुभव घेणे हे नवसाहित्याचे वैशिष्टय होय. चाकोरी, निरर्थकता व सामान्यत्व ह्या कन्सेप्ट्स्च मुळी तर्कातून निर्माण होतात. प्रत्येक ठिकाणी तर्काची कुऱ्हाड चालवीत नवसाहित्य गेले व आयुष्य हे निरर्थक आहे, हेच वाक्य असंख्य सुरात म्हणू लागले.

सुरवातीला हे चापल्य लोकांना आवडले. आयुष्यातील निरर्थकपणाही लोकांना नवीन वाटला व एक जाणीव म्हणून आवडलाही. परंतु पुढे याही साहित्याच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. जीवन ही गोष्ट पूर्णपणे तार्किक नाही. जीवनाला तर्काच्या चौकटीत बसविणे हास्यास्पद आहे आणि तसेच पाहिले तर प्रत्येक ठिकाणी तर्क चालविण्याची हौसही निरर्थक, सामान्य आणि चाकोरीतीलच आहे. तर्क चालविणाराचा अहंकार हा त्याच्या भोवतीच्या आयुष्याहून त्याला अधिक प्रिय आहे, एवढाच नवसाहित्याच्या वैराग्याचा अर्थ आहे. या निर्बुद्ध व तर्कशून्य अहंकारामुळे जीवनाचा अर्थ काही बदलला नाही, पण नवसाहित्यात एक तार्किक खोटेपणा आला व त्यातील आकर्षण नष्ट झाले.

## तर्क–एक विदूषक

वरील दोन्ही प्रकारच्या साहित्यांपेक्षा देशपांड्यांच्या साहित्यात तर्काचे स्थान खूपच निराळे आहे. जुन्या साहित्याप्रमाणे येथील तर्क मर्यादित नाही. नवसाहित्या-प्रमाणे अमर्याद नाही. येथ तर्काशी दोस्ती जोडली आहे. तर्काचा उपयोग हास्यासाठी करून घेतला आहे. विसंगती ह्या एका गोष्टीवर देशपांड्यांचा विनोद प्रामुख्याने आधारला आहे. जीवनातील विसंगती टिपण्यासाठी तर्काचा उपयोग करून देशपांड्यांनी तर्काला एक निरुपद्रवी गमत्या विदूषक करून टाकले आहे. त्याचे काम झाले की तो देशपांड्यांच्या साहित्यातून जातो, मग देशपांड्यांचे साहित्य व्यापून राहते, ती जीवनाबद्दलची विलक्षण आसक्ती. सर्वांगाने जीवनाला मिठी घालण्याची अनिवार ओढ. जीवनही नवसाहित्याप्रमाणे देशपांड्यांना सक्ती वाटत नाही, तर आसक्ती वाटते.

आता जुने, नवे व देशपांड्यांचे साहित्य यांतील फरक उदाहरणाने स्पष्ट करण्यास हरकत नाही. जुने साहित्य राजाचे वर्णन राजाप्रमाणे करते. नवे साहित्य राजाचे वर्णन भिकाऱ्याप्रमाणे करते. देशपांड्यांची केवळ हातचलाखी नाही. हे देशपांड्यांचे साहित्य भिकाऱ्याचे वर्णन राजाप्रमाणे करून जाते, हे सत्य आहे. जीवनाचे वैभव, ओलावा आणि मौज राजाला राज्याच्या पातळीवरून चाखता येते, भिकाऱ्याला भिकाऱ्याच्या पातळीवरून चाखता येते. दोन्ही पातळ्यां-वरील जीवनाचा अनुभव तितकाच संपूर्ण, तितकाच अॅबसॉर्बिंग असतो. या दोन्ही पातळ्यामधील अंतर तोडण्याचा प्रयत्न जीवनाच्या मौजेचा एक भाग म्हणूनच केवळ महत्वाचा आहे.

मला वाटते, हे सत्य आमच्या साहित्याच्या किंबहुना आमच्या सर्व तत्त्वज्ञानाच्या कक्षेत आजवर आलेच नव्हते. देशपांड्यांनी ते प्रथमच जाणिवेच्या कक्षेत आणले, ही त्यांची माझ्यामते सर्वांत मोठी कामगिरी. पूर्वीच्या साहित्याप्रमाणे देशपांड्यांच्या साहित्यात दलितांविषयी अनुकंपा, कळकळ वगैरे आढळणार नाही. हे तथाकथित दलित जीवनातील आनंद लुटत असतात. त्या आनंदाचे मनोरम दर्शन देशपांडे घडवून जातात. जीवनातील आनंद ही रूढार्थाने लौकिक यश मिळविलेल्यांची, पैसेवाल्यांची, गुणीजनांची मक्तेदारी नाही. तो सर्वांसाठी आहे. त्यासाठी थोडीशी माणुसकी, थोडीशी रिसेप्टिव्हिटी पाहिजे. अशी जेथे आढळते, तेथे देशपांडे रंगून जातात. त्यांना ती कोठे आढळेल हे सांगता येत नाही. त्यांना ती रामा गड्याच्या नाचात आढळेल, कापाच्या मैदानावर सहकुटुंब चाललेल्या कारकुनात आढळेल, कोठल्याही लग्नकार्यात शीर गमावलेल्या मुरारबाजीप्रमाणे वावरणाऱ्या नारायणात आढळेल. शीर कधी महाराजांशी गप्पा छाटून येणाऱ्या आणि पुराव्यानिशी सिद्ध करणाऱ्या हरितात्यात आढळेल. मी वर ज्याला 'गोविंदा' मूड म्हटले तो हाच.

खानावळीतल्या दिवंगत गंधाचा शोध घेण्याची, हॉटेलातल्या भजी तळणाऱ्याच्या मुद्रेवरील भाव निरखण्याची, खोललेल्या रस्त्याच्या कडेला बसून काय न काय करणाऱ्या मजुरांच्या गप्पा ऐकण्याची ही ओढ-माणसाच्या आणि त्याच्या मुद्रेवरील समाधानाचा हा शोध मराठी साहित्यात सर्वस्वी नवीन आहे. या माणसाकडून देशपांड्यांची अपेक्षा फार नाही. त्याचे मनोविश्लेषण करण्याचा अहंकार त्यांच्याकडे संभवत नाही. त्यांच्या आनंदाने आनंदित व्हावे–दुःखाने कावरेबावरे व्हावे, एवढीच देशपांड्यांची धारणा आहे.

## प्रसन्न साहित्य

पण नेहमी आनंदाच्या राशी वा दुःखाचे डोंगर थोडेच आढळणार? कोठेतरी नुसतेच बोचत असते. ठसकत असते, हिरमुसले असते. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर सर्दीसारखे हे दुःख असते. येथे तत्त्वज्ञानाचे डोस कशाला. येथे एखादी हलकी फुलकी कोटी, एखादा मिष्किल विनोद पुरे आहे. देशपांड्यांच्या विनोदाचे स्वरूप असे आहे. तो पूर्णपणे सहानुभूतीवर अधिष्ठित आहे. तो माणसांना हसत नाही-त्यांना हसवतो. जे आपल्या मनाप्रमाणे घडले नसेल, अपेक्षेप्रमाणे जमले नसेल, ते न पाहण्याची हळवी वृत्ती येथे नाही, तर त्याकडे हसून पाहण्याची ताकद आहे. देशपांड्यांनी विनोदाला एक नवीन ताकद दिली. विनोद हा त्यांच्या साहित्यातील एक अपरिहार्य भाग आहे. कारण कोणत्याही अनुभवातील-घटनेतील सर्व मर्म-त्यातील हिणकस भागासहित त्यांच्या लक्षात येते. त्यामुळे त्यातील चांगल्या भागाबद्दल दाद देणे व हास्यापद भागाची टवाळी उडविणे हे दोन्ही त्यांच्या साहित्यात आढळून येतात. परंतु त्यामुळे त्यांचे वाङ्मय निव्वळ विनोदी आहे, असे म्हणणे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे आहे. त्यांच्या साहित्यात प्रसन्नहास्य फुलविण्याचीही शक्ती आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यास ' प्रसन्न साहित्य ' हे नाव अधिक शोभून दिसेल.

त्यांच्या साहित्याबाबत अलीकडे घेण्यात आलेला एक आक्षेप म्हणजे ते प्रतिक्रियावादी–रिॲक्शनरी आहे. जुन्या काळाबद्दल एक हळवी ओढ त्यात आढळते. मला वाटते हा आक्षेप चुकीचा आहे. प्रत्येक पिढीलाच आपल्या काळाबद्दल एक प्रकारची अनामिक आसक्ती असते. ' बटाट्याची चाळ ' किंवा ' असा मी असा मी ' या साहित्यकृती ही ओढ एका विशिष्ट पिढीच्या संदर्भात समर्थपणे चित्रित करतात एवढेच. त्यामुळेच तर बटाट्याच्या चाळीतील ' एक चिंतन ' या लेखास एक प्रकारचा टाईमलेसनेस आला आहे. त्यातील विचार हे सार्वकालिक स्वरूपाचे-माणसाची भूतकाळाकडील ओढ दाखविणारे आहेत.

## प्रसन्नतेचे मर्म

देशपांड्यांच्या साहित्यात रचना व अन्वय दोन्ही आढळत नाही. एखादे पेचदार कथानक, एखादी गुंतागुंतीची व्यक्तिरेखा असे त्यांच्याजवळ काही नाही. फार काय-

संघर्षप्रधान समजल्या जाणाऱ्या नाटय या प्रकारातदेखील त्यांचेजवळ कथानक-प्रधानता नाही. 'तुझे आहे तुजपाशी' व 'सुंदर मी होणार' यात कसलेच घटना-प्रधान परिवर्तनशील कथानक नाही. त्यात प्रामुख्याने संघर्ष आहे तो वृत्तीचा. त्यांच्या साहित्यातील व्यक्तिरेखांचे आयुष्य त्यांच्या साहित्यात घडत जात नाही. एखाद्या विशिष्ट क्षणी त्या व्यक्तिरेखांना आपण भेटतो व मग पुढील वर्णनाच्या ओघात त्या व्यक्तीची जडणघडण केवळ फोटोग्राफिक अशा कौशल्याने देशपांडे आपल्या-पुढे उभी करतात. यामुळे त्यांची कोणतीही व्यक्तिरेखा अधांतरी वाटत नाही. रचना वा अन्वय यांचा आभास हे देशपांड्यांच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टि-कोनाचे द्योतक आहे.

जीवनाच्या ओघात वाहत जाणे—जीवन जगणे हाच जीवनाचा खराखुरा अन्वय आहे. समोर उत्कृष्ट खाणे वा गाणे आले असता त्याला जस्टोस करणे, हाच त्याचा खरा अर्थ असे त्यांना वाटते. असे जीवन जगणाऱ्या काही माणसांचे शब्दचित्र —पूर्वरंग—व अपूर्वाईमध्ये स्वतःचेच—देशपांडे तुमच्यापुढे पेश करतात. ज्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणे प्रत्येकजण त्याला दाद देतो. या प्रतिक्रियेमागे प्रत्येकाचा स्वतंत्र अन्वय असतो असे मला वाटते. देशपांड्यांचे साहित्य त्यामुळे बंदिस्त होत नाही. त्यांचा स्वतःचा अन्वय ते तुमच्यावर लादीत नाहीत. त्यांचा स्वतःचा अन्वय केवळ व्यक्तिरेखांच्या निवडीपुरता मर्यादित असतो. त्यानंतर ते विशेष इंटरफियर करीत नाहीत. मला वाटते, साहित्यात ही भूमिका नवीन आहे. जीवनाचा सारा पसारा एका माणसाच्या मेंदूला—मग तो कितीही बुद्धिमान असो—आकलन होणे शक्य नाही. त्यामुळे स्वतःच्या अन्वयामध्ये जीवनाला कोंबण्याचा अट्टाहास नेहमीच हास्यास्पद ठरतो. त्यापेक्षा देशपांड्यांची भूमिका अधिक सुसंगत आहे. त्यांच्या साहित्याच्या ताजेपणाचे मर्म त्यांच्या या भूमिकेत असावे.

## हाडाचे 'अर्क'वादी

हल्ली ही त्यांची भूमिका बदलली असावी, अशी थोडीशी शंका 'असा मी असा मी' वरून येते. यातील "मी" हा गृहस्थ देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे सामान्य वाटत नाही. तो तत्त्वज्ञानी वाटतो. इतरांच्या लक्षात येणार नाहीत, अशा गोष्टी त्याला जाणवतात. नाटय, नवसाहित्य, अध्यात्म, सोशल वर्क, या व अशा अनेक क्षेत्रांतून तो फिरतो व त्यांतील लोकांची टिंगल उडवतो. हा मनुष्य सामान्य माण-साचे प्रतिनिधित्व करू शकत नाही. कारण आपणापैकी प्रत्येकजण या किंवा अशा इतर क्षेत्रांत रमलेला असतो. 'असा मी असा मी' तील हा नवा सूर—रिकामेपणाचा, वैराग्याचा, टिंगलखोरीचा आणि थोडासा बावळटपणाचा—देशपांड्यांची तात्विक भूमिका बदलल्याचा निदर्शक आहे. आता त्यांना अन्वय लावण्याची, जीवनाच्या ओघातून बाजूला राहून त्यातील निरर्थकपणा, चाकोरी व सामान्यत्व न्याहाळण्याची इच्छा झालेली दिसते. "असा मी असा मी" हा नवसाहित्याचाच थोडा विनोदी

अवतार आहे. देशपांडे सेटल् होत आहेत, हाच याचा अर्थ आहे. हे अपरिहार्य असेल कदाचित, पण देशपांडे या दिशेने जर सेटल् झाले, तर त्यांचे साहित्य आजवरच्या सर्व नवसाहित्यापेक्षा—मर्ढेकर, गाडगिळांसकट अधिक 'नव' होईल, यात शंका नाही.

पण मला वाटते, असे होणार नाही. कारण ते हाडाचे अर्कवादी आहेत—तर्कवादी नाहीत. सामान्यत्वाशी जोडलेले नाते त्यांच्या हातून तोडले जाणार नाही. सामान्यत्वहि त्यांचा सतत मागोवा घेत राहील. त्यांना असे सेटल् होऊ देणार नाही.

चौकातल्या एखाद्या आलेपाकवाल्याची मजेदार आरोळी त्यांना थबकायला लावील. 'दोन इसम दीड रुपया' अशा एखाद्या पल्लेदार आवाजाने त्यांची तंद्री मोडेल. एखाद्या खिडकीतून येणारा अभ्यासाचा—पाठांतराचा शाळकरी आवाज त्यांना हसू आणील—रस्त्यावर वाजणाऱ्या पेटीतील एखादी नाजुक जागा त्यांची दाद घेऊन जाईल. रेशनच्या बारीत मांडा ठोकून अभ्यासाचे पुस्तक वाचणारा एखादा पोऱ्या त्यांच्या काळजाचा वेध घेईल.

अशी ही जीवघेणी मजबुरी देशपांड्यांच्या वाट्याला आली आहे. ती त्यांना स्वस्थ बसू देणार नाही. त्यांना पूर्वीप्रमाणेच लिहायला लावील—आणि आपल्याला वाचायला !

○ ● ●


आपला पादस्पर्श सुखद व्हावा

आपले घर सुशोभित दिसावे यासाठी

* सर्व प्रकारचे सिमेंटचे मार्बल मोझॅक व टेराझो टाईल्स
* सिंथेटिक मोझॅक टाईल्स
* न घसरणाऱ्या पायऱ्यांसाठी आमच्या चेकर्ड


# झेनिथ टाईल्स

फोन : निवास ५४४४६ — २८ शिवाजीनगर

कार्यालय : ५७७७२ — सिंगर रोड, वाकडेवाडी, पुणे ५.

प्रगतिचे

३० वे वर्ष



हे लक्ष्मीचे नवदेवालय
इथे श्रमांचा सुफलित संचय
उद्योगाचे उगमस्थान हे
सौख्याचे संचित
इथे हो सर्वांचे स्वागत!

**बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

तुमची
जिल्हाळ्याची
बँक

आपल्या ९३ शाखांनिशीं तुमच्या सेवेस सिद्ध

## संस्कार आणि परंपरेची लक्ष्मणरेषा मानणारे

[पृष्ठ २४ वरून चालू]

# पुरुषोत्तम लक्ष्मण

महाराष्ट्रात आता सर्व 'आलबेल' तर झाले नाही, असाही भ्रम काहींना होऊ लागला. परंतु थकलेला कृष्ण किंवा म्हातारी झालेली खार, ही जशी कल्पनेत ठरत नाही, त्याचप्रमाणे लेखनाकडे पाठ फिरवून......फक्त रोज सकाळी पर्वती व आठवड्यातून दोनदा मंडई करणारे पु. ल. हे अतर्क्य वाटतात.

आपल्या लेखनाची असंख्य वाचकांनी वाट पाहावी, असे भाग्य फक्त विनोदी लेखकांच्याच वाट्याला येते. श्री. व्यंकटेश माडगूळकरांचेच पाहा ! त्यांनी रंगवलेली –'रामा मैलकुली', 'वेडा वकस', 'उफराटा घोंडिबा', 'झेल्या' यांसारखी अविस्मरणीय पात्रे आणि 'विटा काका' किंवा 'दादा' यासारखी व्यक्तिचित्रे वाचकांचे काळीजच पकडतात. असे असूनही माडगूळकरच एकदा गमतीने सांगत होते –"एक वर्षी मी दिवाळी-अंकांत कुठेही लिहिले नाही. मला वाटले, चार-दोन वाचकांची तरी विचारणा येईल ! पण छे:हो—कुणीही एवढी तसदी घेतली नाही !!" परंतु पु. ल. देशपांडे हे नाव यंदा दिवाळी अंकांत दिसले नाही, म्हणून हळहळणारे वाचक अनेकांनी अगदी डोळा पाहिले. जो संगती टिपतो, अशा कलावंता-पेक्षा जो विसंगती टिपतो, तोच कलावंत वाचकांना वेड लावतो, असे याचे सावेसोपे निराकरण कुणी करील. त्यात तथ्यही आहे. सामान्य माणूस हा विसंगतीचा दरबार असतो. त्याला मुसळे दिसत नाहीत, कुसळे मात्र अचूक दिसतात. अगदी परस्पर-विरोधी गोष्टी तो सर्रास करीत असतो. यामुळे विसंगतीच्या दर्शनात त्याला आपले प्रतिबिंब पाहता येते व तो मनमुराद हसतोही ! परंतु हे काही संपूर्ण उत्तर नाही. पु. लं.चे व्यक्तिमत्त्व हे अेकतारी नाही......व आत्मकेंद्रीही नाही. नाट्य आणि संगीताचे अनावर वेडही त्यांचेपाशी आहे. यामुळे एखाद्या उत्तम गायिकेचे गाणे ऐकतानाही तिच्या ठिकाणी मीरेइतकीच पवित्रता त्याक्षणी पाहण्याची ताकद पु. लं. पाशी आहे. पावसाळ्यात बेडूक ओरडू लागले, तर त्यांना चटकन खर्जाचे दर्शन होते आणि उत्तम काव्य-कृतीचा आस्वाद घेण्याची इंद्रिये शाबूत राखून, शिवाय—

मुक्तछंद, मालिनी स्त्रग्धरा । आर्या, दिंडी साकी श्लोक ।।
जातिल सोडून सर्व मंडळी । गृही खेळता– बावा लोक ।।

अशी टोपण-कवींची दिलखुलास संभावना करून हसण्याचे आणि अनेकांना हसव-ण्याचे कसबही त्यांनी सांभाळले आहे.

पु. लं. ची वर्षातून एकदा जरी गाठ पडली तरी......विकृतीच्या आणि आत्म-धि:काराच्या गदारोळात गुरफटलेल्या मराठी वाचकाला एकदम तजेला मिळतो. त्यांचे लेखन वाचले, की रंगपंचमी खेळून आल्यासारखे वाचकाला वाटते. जगावे, पाहावे,

सात-आठ वर्षांपूर्वी...



वाचावे, ऐकावे, नाचावे, असे वाटू लागून रडणे व कुढणे या केवळ नैमित्तिक क्रिया वाटू लागतात! म्हणून यंदाही भेट न झाल्याने त्यांनी वाचकांची फार निराशा केली.

योगायोग असा की दिवाळी अंकांची रद्दी होण्याच्या सुमारासच पु. लं. ची नांदेड येथील नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड झाल्याचे वृत्त येऊन थडकले. एका पुरुषोत्तमामागोमाग दुसरा पुरुषोत्तम अध्यक्ष झाल्याचे पाहून आश्चर्य वाटले नाही! बहुधा आता पु. लं. लिहीत नाहीत, तेव्हा त्यांना अध्यक्ष करायला हरकत नाही, असाही विचार नाट्यपरिषदेने केला असावा! पु. लं. ना त्यांच्या पुण्यातील निवासात जेव्हा मी नुकताच भेटावयास गेलो, तेव्हा हाच तर्क व्यक्त केल्यावर देशपांडे मनमोकळे हसू लागले.

पु. लं. च्या सहवासात काही तास राहण्याचे भाग्य मला बऱ्याच वर्षांनी मिळत होते. सात-आठ वर्षांपूर्वी पु. लं. नी आपल्या मुंबईच्या निवासात "तुझे आहे तुजपाशी" या त्यावेळी बारसे न झालेल्या नाटकाचे जे दिलखुलास वाचन केले, त्यावेळी योगायोगाने मी हजर होतो. पु. लं. चे एकपात्री कार्यक्रम त्यावेळी रंगभूमीवर आलेले नव्हते. परंतु त्या दिवशी मी जेव्हा पु. लं. ना काकाजी, वासूअण्णा, जगन्नाथ, श्याम, गीता-उषा-आचार्य या असंख्य भूमिकांत अगदी लीलया शिरताना आणि बाहेर येताना पाहिले — ती त्यांची जवळजवळ चार तासांची 'एकपात्री' समाधी इतकी वर्षे उलटली, तरी मी विसरू शकलेलो नाही. नाट्यवाचन चालू असताना मधेच थांबून, देशपांडे संबंधित पात्रांची जडणघडण कशी झाली, याचे खास किस्से

ऐकवीत होते. त्यांतली सगळी आर्तता......पु. लं. च्या शब्दांत गहिवरून येत होती. पु. लं. ची लेखणी आणि वाणी यांनी लोकप्रियतेचे शिखर आज गाठलेले आहे, परंतु या सर्वांबरोबर अत्यंत सुसंस्कृत, हळवे आणि उदार असे अंतःकरण या कलावंताजवळ आहे, याचाही प्रत्यय जसजसा काल जाईल, तसतसा रसिकांना अधिकाधिक येऊ लागेल. या त्यांच्या थोर मनाचे दर्शन त्या चार तासांत मी तरी फार जवळून घेतले. काही चांगले पाहिले, की हे मन वेडावून जाते. काही उदात्तता आढळली की हे मन स्वतःला हरवून बसते. अशी निरागसता फार थोडे कलावंत टिकवू शकतात.

सात–आठ वर्षांपूर्वीचे मला आठवणारे पु. ल. असे होते, पण या सात–आठ वर्षांत पु. लं. नी केवढे तरी यश मिळवलेले होते. "तुझे आहे तुजपाशी"चे अमाप यश, "सुंदर मी होणार" हे नाटक आणि "पूर्वज", "सारं कसं शांत–शांत", "सदू आणि दादू", "छोटे मासे-मोठे मासे" यासारख्या एकांकिकांचे रसिकांनी केलेले अपूर्व स्वागत, "बटाटच्याची चाळ", "वाऱ्यावरची वरात" आणि "असा मी असा मी" यांनी मिळवलेले न भूतो–असे व्यावसायिक यश, या सर्व यशाच्या झळाळीत असणाऱ्या आजच्या पु. लं. ची म्हणूनच थोडी आदरयुक्त भीती वाटत होती– मनावर काहीसे दडपण होते.

मात्र एकदा खुर्चीत आरामात बसल्यावर जेव्हा पु. ल. बोलू लागले, तेव्हा माझा संकोच पार पळाला. नाटचसंमेलनाच्या अध्यक्षपदापर्यंत आज त्यांचे कर्तृत्व बहरलेले असले, तरी त्यांच्या कर्तृत्वाची सुरवात कशी झाली, कुठे झाली, कुणी त्यांच्या पाठीवर कौतुकाचे हात ठेवले, याची हकीकत समजून घेण्याच्या दृष्टीने जवळजवळ पंचवीस वर्षांपूर्वीची आठवण मी त्यांना सांगितली––

"तुम्ही आमच्या गावात गणेशोत्सवात भावगीत–गायक म्हणून आला होतात. लेंगा, शर्ट, कोट आणि डोक्यावर सभ्यतेची त्यावेळची निशाणी–टोपी. तुम्ही "नदी किनारी ग ऽऽ" हे गीत आळवून आळवून म्हणत असा. कार्यक्रम संपल्यावर चिटणीसांनी तुम्हाला नारळ आणि नारळाखाली अल्पशी एकनोटी बिदागी..." आठवण पटली आणि पु. ल. सांगू लागले––

"शाळेत असल्यापासून मी भावगीताचे कार्यक्रम करू लागलो. खरोखर मी नियतीला फार मानतो. नाहीतर जिथे वडिलांनी आपण होऊन......स्वतःला फक्त दीडशे रुपये मासिकप्राप्ती असताना मुलाला गोविंदरावांसारखी दीडशे रुपयांची बाजाची पेटी हौस म्हणून आणून द्यावी, अशा वडिलांच्या घरात मी कसा जन्माला आलो ? इतर घरांत मुलांना गाणं ऐकायला जायचे म्हणजे वडिलांची परवानगी विचारावी लागे. मला कुठे मंजिखाँसारख्यांचे गाणे असले तर वडील विचारत, "अरे, तू घरी कसा ? गाण्याला नाही गेलास !" आता ही नियती नाहीतर काय ? माझे आजोबा वामन मंगेश दुभाषी हे तर व्युत्पन्न विद्वान होते. असे सुसंस्कृत, कलासक्त घर माझ्या वाटचाला आले, हे मी माझे नशीब मानतो––"

"तुम्ही अगदी पहिले रंगभूमीवरील काम असे कधी केलेत ?"

"मी प्रथम एल्. एल्. बी. झालो. मग बी. ए.साठी पुण्याला आलो. त्यावेळी आम्ही काही मित्रांनी इथे 'भावबंधन' नाटक बसवले. मी त्यात प्रभाकराचे काम करीत असे. आम्ही फार उत्साही असल्यामुळे नाटकाचा खेळ तडक मुंबईला लावला ! मुंबईला जात असताना गाडीमध्ये—मला वाटतं कर्जतलाच—चिंतामणराव कोल्हटकर गाडीत चढले. त्या वेळी ते 'ललितकला कुंज' चालवीत होते व "एकच प्याला", "भावबंधन" ही नाटके घेऊन ते लांबलांबचे दौरे काढीत. माझी त्यांची ती पहिली भेट. गाडीतच ओळख झाली. ते मला म्हणाले, की तुम्ही आमच्या कंपनीत या ना...! चिंतामणरावांचे ते निमंत्रण मी फारसे मनावर घेतले नाही. अहो, कुठे चिंतामणराव — कुठे मी ! परंतु पुण्यातील माझ्या खोलीवर एके दिवशी चिंतामणरावांचा मनुष्य आला. जावेच लागले ! मी त्यांच्या कंपनीत कामे करू लागलो. आठवतं, मी बी. ए.चा शेवटचा पेपर दिला आणि त्याच दिवशी रात्री इचलकरंजीला प्रयोगाला गेला होतो. आता ही चिंतामणरावांची भेटदेखील नियतीच. दुसरं काय ? एकदा मी मुंबईला "एकच प्याल्या"त भगीरथाचे काम करीत असताना, बालगंधर्व त्या प्रयोगाला हजर होते. ते नाटकाचा एक अंक संपल्यावर म्हणाले —

"अरे, पेटीची प्रॅक्टिस चालू आहे ना ? तुझ्या बोटांत कसब आहे." अहो, नाही म्हटलं, तरी त्या वेळी अंगावर केवढे मास चढले. बालगंधर्वांसारखा रसिक असे म्हणतो ! आत्मविश्वास केवढा वाटला—मी दहा-अकरा वर्षांचा होतो, त्यावेळी त्यांनी माझी पेटी ऐकली होती.

नाटकाच्या संगीतावरून आठवण झाली. १९४९ च्या मे महिन्यात चर्निरोडला खुल्या प्रेक्षागारात 'झुंझारराव' नाटकाचे दोन बहारदार प्रयोग झाले. या नाटकात चिंतामणराव, बाबूराव पेंढारकर, स्नेहप्रभा प्रधान, के. नारायण काळे, राजा परांजपे यांच्या भूमिका होत्या आणि पु. लं. चे नाव प्रथम नाटकाच्या संदर्भात "पार्श्व-संगीतकार" म्हणून ऐकले. त्याची आठवण देताच पु. ल. म्हणाले —


## डबल्-लॉक गंजिफ्रॉक

अजब विणीचा गंजी बनतो । अंगी चढल्या सौख्यचि देतो ।।
खुबीच अशी जया विणीची । देशामध्ये प्रथम तऱ्हेची ।।
नाम तयाचे डबल्-लॉक । खुषच झाले घेउनि लोक ।।
मेकर एकच युनायटेड । दिल्या धनाची करतो फेड ।।
सुचवु इच्छितो घ्याच एकदा । वापराल मग हाचि सर्वदा ।।
होजियरीचे संग्रहदार । **एन्. व्हीं. गोखले, मुंबई चार ।।**

"मला वाटतं, सबंध नाटकाला पार्श्वसंगीत देण्याचा तो पहिलाच प्रयत्न असावा—"

यानंतर पु. ल. नाट्यक्षेत्रापासून लांब गेले. पुण्याला चित्रपट व्यवसायात नट म्हणून, संगीत–दिग्दर्शक म्हणून त्यांना मागणी वाढली. 'पुढचं पाऊल', 'दूधभात', 'गुळाचा गणपती' या चित्रपटांनी त्यांना पुष्कळ कीर्ती मिळाली, हे उघडच होते. परंतु प्राप्ती काय मिळाली, हे विचारताच ते सांगू लागले—

"मराठी चित्रपटसृष्टीची दैना मी फार जवळून पाहिली. मी चित्रपटांतून बाहेर पडलो, तेव्हा मला कामे कमी झाली म्हणून नाही! मला सारखी मागणी होतीच. माझे पैसेही त्यात गेले आहेत, पण माझ्या मनात तेव्हा त्याविषयी खंत नव्हती–आजही नाही. कारण तो मामलाच चमत्कारिक आहे. पैशाचे सोंग कसे आणता येईल? म्हणून मी बाहेर पडलो. एम्. ए. झालो होतोच. मी बेळगावला प्राध्यापकी पत्करली—"

"अजून पुन्हा त्या पेशात जावं असं आपल्याला वाटत नाही का?"

"खरोखरच वाटतं! माझ्या आयुष्यातला सर्वांत मानसिक आनंदाचा काळ पार्वतीदेवी कॉलेजमधील प्राध्यापकीय जीवनाचा होय! त्याचवेळी वाचन करता आलं. मुख्य म्हणजे धंदेवाईक रंगभूमीचा अनुभव मी तिथल्या वास्तव्यात घेतला. नाना जोगांनी लकडा लावला म्हणून 'अंमलदार' लिहिले. त्याचे प्रयोग अगदी धंदेवाईकदृष्ट्या कसाला लावून पाहिले. ते यश मिळालें तेव्हाच नाटककार म्हणून यश आवाक्यात आले–असे मला वाटते."

"परंतु त्यापूर्वी तुम्ही **पुरुषराज** अलूर पांडे नावाने 'मौजे पारलई' येथून 'अभिरुचीत' लिहीत होताच? श्री. अलूरकर यांनी पुढे काहीच कसे लिहिले नाही?"

"सांगतो ना! दैवाचा भाग. परिस्थिती माणसाला नेस्तनाबूद करते कशी, याचे उदाहरण म्हणजे अलूरकरांची लेखन इतिश्री! ते मागे राहिले. मी पुढे गेलो. पुन्हा योगायोग पाहा. आमच्या शेजारीच प्रा. राजाध्यक्ष राहात असत. 'अभिरुचीतून' ते सदर लिहीत असत. ते मला बोलावून सांगत—"पुरुषोत्तम, अरे या विषयावर तुला असे लिहावयाचे आहे." त्यांचा विश्वासच मुळी असा की मी लिहिणारच! आणि मी खरोखरीच लिहीत गेलो—शाळेपासून शिक्षकांची गंमत करण्याचे वळण पडले होतेच. तेच वळण पुढे आले. अर्थात माझ्या टिंगलीत व्रात्यपणा भरपूर असला, तरी अनादरवजा काही नसे......एखाद्या अशक्त मास्तराचे शक्तीचे प्रयोग मी फळ्यावर फारतर लावीत असे!"

चहाचे घुटके सुरू झाले आणि संभाषणाची गाडी थोडी रेंगाळत वाट काढू लागली. संदर्भ मागे–पुढे होऊ लागला, परंतु सौ. सुनीताबाई यावेळी तिथे असल्यामुळे त्यांनी भराभर मधले 'टाके' घातले. पु. ल. सांगत होते—

"१९५५–५६ पूर्वीच मी नाट्यनिकेतनमध्ये आलो. नाट्यनिकेतन सुटताच मी

आणि सुनीता मालेगावला गेलो. खेड्यात मौनी विद्यापीठासारखे एखादे ग्रामीण शिक्षण केंद्र काढण्याचा तो प्रयोग यशस्वी झाला असता, तर पुढचे आयुष्यच बदलले असते. फार अॅम्बिशस् असा तो प्रॉजेक्ट होता. तो यशस्वी झाला नाही. मात्र या काळात मोठ मोठी गांधीवादी माणसे मी फार जवळून पाहिली. हे सर्व मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी साठत होतेच, परंतु हा शैक्षणिक प्रयोग फसल्यामुळे मी फार उदासीन होतो. राजीनामा दिलेला होताच. ज्या दिवशी मी मालेगाव सोडणार, त्याच्या आदल्याच दिवशी मला 'रेडिओ केंद्रा'ची विचारणा आली. मी मुंबई केंद्रावर नोकरी पत्करली—"

मुंबई केंद्रावर पु. ल. असतानाच "तुझे आहे तुजपाशी" हे नाटक त्यांनी लिहिले. मालेगावी आलेल्या अपयशातही जे काही त्यांनी मनाच्या सांदीकोपऱ्यात साठवून आणले होते, त्याच्या पार्श्वभूमीवर 'आचार्य' अवतरले. मग गीता आली. काकाजी ओघाने आले. या संबंधात पु. ल. म्हणाले—

"—मला नाटक लिहून संपल्यावर सुनीताने विचारले, की पुढे तिसऱ्या अंकात 'गीता' या शब्दावर कोटी करता यावी, म्हणून तू 'गीता' हे नाव नक्की केलेस का? याचे उत्तर खरोखरच 'नाही' असेच आहे. एखादा क्रांतिकारक आपल्या मुलीचे नाव असेच काहीतरी साधं-सुधं ठेवील. फॅशनेबल ठेवणार नाही—परंपरा म्हणून काही असतेच ना? मी ती मानतो. याकरता मला कुणी सनातनी म्हटलं, तरी राग नाही. बाईने लिपस्टिक लावली—अगदी ती मॉडर्न झाली—तरी घरी आलेल्या सुवासिनीला ती परत निघाल्यावर कुंकू लावण्याचा जो संस्कार आहे, तो मला टिकवावासा वाटतो—"

"परंपरागत चांगल्या मूल्यांवर तुमची श्रद्धा आहे. अशा गोष्टींना तुम्ही टिकल् करता, यामुळे तुमची नाटके लोकप्रिय होतात—असं नाही वाटत—?"

"यात वाईट काय आहे? प्रसंग निवडताना नाटककाराने हा विवेक पाळलाच पाहिजे. "सुंदर मी होणार" या नाटकात मी दीदी प्रथमच स्वतंत्रपणे पहिली पावले टाकताना जेंव्हा दाखविली आहे, तेव्हा ती मेनकेला कुंकू लावण्यासाठी उठलेली असते! ती म्हणते—"अग, सुवासिनी तू, तुला कुंकू नको जाताना लावायला—" पांगळ्या नायिकेलाही उठावे—चालावे असे वाटायला लावणारा हा संस्कार तेवढाच प्रभावी आहे, म्हणून तो योजला आहे. फॅशन्स बदलता येतात, पण परंपरेने आलेल्या चांगल्या गोष्टी या टिकणारच आहेत. यात मुद्दाम 'टिकल्' करण्याचा प्रश्न नाही—"

"सुंदर मी होणार या नाटकाचा विषय निघाला म्हणून एक विचारतो. या नाटकात बॅरटचे आपल्या थोरल्या मुलीवरच प्रेम का, याचे उत्तर नाटककार बेसियरने दिले आहे. बॅरेट सांगतो—" यू—यू. माय अेल्डेस्ट चाईल्ड वेअर बॉर्न ऑफ लव्ह अॅन्ड ओन्ली लव्ह—" बाकीची मुले ही प्रेमाची परिणती फक्त वासनेत झाल्यानंतर झाली. प्रेमाचे हे अंतिम, भयानक रूप पाहून अशा प्रेमापासून आपल्या मुलांना दूर

ठरवण्याचा प्रयत्न बॅरेट करीत असतो–हा भाग आपल्या नाटकात आलेला नाही–"

यावर पु. लं. नी सांगितले—

"मी हा भाग अस्पष्टपणे आणला आहे. कारण बेसियरचे नाटक हे बॅरेटस् वर्गाचा जो स्नॉबिशनेस होता, तो दाखवण्याकरता मुख्यत: लिहिले. मला वाटतं, या नाटकात मी सुरेश हे जे पात्र निर्माण केले आहे, त्याला फार अर्थ आहे. या सुरेशला परमेश्वराने संगीताचे देणे देऊन पाठवला आहे. परंतु जीवनात त्याला आपल्या अस्तित्वाचा अर्थच कळलेला नाही. अशा या सुरेशला जिचे आयुष्य थवकलेले, पांगळे झालेले आहे, अशी दीदी सांगते–"फार मोठा ठेवा आहे तुमच्याजवळ !" परमेश्वराचे असे देणे घेऊन जे येतात, त्यांना स्वस्थ बसताच येत नाही बघा !"

"हे ठीक आहे, परंतु जगात शेकडा नव्वद टक्के लोक कसलेही परमेश्वरी देणं घेऊन येत नाहीत. त्यांच्या जीवनाला काही अर्थ असावा की नाही ?... त्यांना तो अर्थ कोण देणार–?"


यावर पु. ल. म्हणाले —

"परंतु हा काही नाटकाचा विषय होईलच, असे नाही. हा शोत्र घेणे कुणा नाटककाराला साधले तर साधेलही !"

पु. लं. ना भेटायला जाताना...मुलाखतीचे प्रश्न म्हणून आम्ही काहीच नेले नव्हते. त्यांच्याशी तासभर गप्पा माराव्या, या बोलण्यातून जे काही नवे–जुने हाती लागेल ते लागेल, असा विचार आम्ही केला होता. नाटचकलेविषयी कला आणि व्यवसाय या दोन्ही क्षेत्रांत पु. लं. चा अधिकार मोठा आहे. नवनाटच आज रंगभूमीवर सतत गोते खात आहे. हे पाहतानाही त्यांचे मन कष्टीच होते. कारण या मागच्या घडपडीची जाण त्यांना आहे. मर्ढेकरांनी जीवनाचा कोट उलटा करून दाखवला......तो त्यांनी जिज्ञासेने पाहून त्याचे अस्तरही अभ्यासिले, तरी त्यांचे मन त्यामुळे अश्रद्ध झालेले नाही. ज्यांची श्रद्धा हरवलेली नाही, असेच साहित्यकार नेतृत्व करू शकतात. नाटच-संमेलनाच्या अध्यक्षपदावर त्यांची निवड या दृष्टीने अत्यंत समयोचित अशी आहे. आता सर्वांचे लक्ष त्यांच्या अध्यक्षीय भाषणाकडे लागलेले आहे. ● ● ●


**सरदार गृह** क्रॉफर्ड मार्केटजवळ मुंबई २
**टेलिफोन नंबर ३८३३७**

- राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
- हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह आणि अनेक प्रकारच्या सुखसोयी.
- टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.



# राजा शिवछत्रपती

ब. मो. पुरंदरे

## तिसऱ्या सचित्र आवृत्तीचे प्रकाशन

तारीख लवकरच जाहीर होत आहे

पूर्वग्राहक व ठेवीदार यांना
ग्रंथप्रकाशनाची तारीख आगाऊ कळविली जाईल.

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

"ह्ये बामणांचं कामच न्हाई ! निस्ता दूधभात खावा" असं म्हणत भवान बंकीने माझ्या हातातली तलवार घेतली नि खाली जमिनीवर आडवी ठेवली. आणि....



ब. मो. पुरंदरे

नवरात्रातल्या अष्टमीची रात्र. सरकारवाड्यातला भवानीमहाल हंड्याझुंबरांनी झगमगत होता. धूपदाणीतून सुगंधी धूर उसळत होता. देव्हाऱ्याच्या दोही अंगांना समया तेवत होत्या. गजांतलक्ष्मीची पूजा खुलत होती. महाल गच्च भरला होता. सासवडहून 'कोर्ट' मुद्दाम कीर्तन ऐकायला आलं होतं. मामलेदारही आले होते. गडाच्या घेऱ्यातल्या दहा गावचे पाटील आणि शाळामास्तर आले होते. भास्कर-बुवांचं कीर्तन ऐन रंगात आलं होतं. बापू गुरवाचा मृदंग ठणकत होता. लखू सात-भाईची बोटं पायपेटीवर नखऱ्यात नाचत होती. हातांतले गजरे आणि अंगावरचं भरजरी उपरणं सावरीत सावरीत बुवा आख्यान रंगवीत होते. बुवांची रुक्मिणी

# भवान ऐंकी

कौंडिण्यपूरच्या देवीची जोगिया रागात विनवणी करून मंदिराबाहेर नुकती पडली होती. केवळ त्या द्वारकाधीश मुकुंदाचा धावा करीत करीत कोमलांगी विरहिणी मंदिराच्या दाराशी आली. तेवढ्यात रथचक्रांचा आणि घोड्यांच्या टापांचा खडखडाट रुक्मि-णीला ऐकू आला. तिने उत्सुकतेने मान वर केली. पाहते तो चार शुभ्र अश्वांचा रथ चौखूर उधळीत उधळीत साक्षात द्वारकाधीश श्रीरंग मेघःश्याऽऽऽम!



बुवांच्या श्रीरंगाचा रथ भरधाव येत होता. त्यांच्या सुकुमार रुक्मिणीचं मुख-कमल परमानंदाने उमललं होतं. रथ भर वेगात रुक्मिणीपाशी येऊन थडकला. त्या श्यामल नंदनंदनाने रुक्मिणीला उचलून रथात घेण्यासाठी आपले भरदार करपाश पसरले—

—आणि तेवढ्यात वाड्याबाहेर एकदम भयंकर कालवा उठला! सरकार-वाड्याच्या देवडीवरून खानबाबा घाबऱ्याघाबऱ्या ओरडत आले,

"सरकाऽऽर, शेऽऽर! शेर आयाऽ! शेर आयाऽ! ढाण्या शेऽऽर!"

कीर्तनात एकदम गडबड उडाली. डोळे विस्फारून बघत बुवा गप्प झाले. पेटी बंद झाली. वहिनीसाहेब चाफेखणात जाळीच्या पड्यात बसल्या होत्या. महालात प्रवेशताच डाव्या हाताला लोडाशी मी बसलेलो होतो. खाली पायरीवर घोंगडं टाकून भवान बंकी बसला होता. खानबाबांचा गलबला ऐकताच मी आणि भवान बंकी एकदम उठलो. दोघंही अस्वस्थ झालो होतो. आम्ही वहिनीसाहेबांकडे पाहिलं. तेवढ्यात वहिनीसाहेबांनीच एमदम पडदा बाजूला करून मोठ्याने म्हटलं,

"भवाननाईक, तुम्ही आणि भाउजी ताबडतोब जा! देवडीवरच्या बंदुका घ्या! जा ताबडतोब!"

"जी, जी! चला, चला सरकार!"

भवान बंकी तडक निघाला, पण एकदम वळून, महालातल्या श्रोत्यांना उद्देशून गरजला, "कुनीबी हलायचं न्हाई कथा संपल्याविगर!"

भवान बंकी आणि मी धावत निघालो. खानबाबांकडून देवडीवरच्या बंदुका घाईघाईने घेऊन आम्ही सरकारवाड्याबाहेर आलो. लोक आरडतओरडत धावत होते. घरांत घुसत होते. धडाधडा दारं बंद करून घेत होते. कुत्री भुंकत होती.

या वाघाची भयंकर दहशत बसली होती. गेल्या तीन महिन्यांत त्याने गडाच्या घेऱ्यातली सात आठ माणसं मारली होती. जनावर माणसाच्या रक्ताला फारच चटावलं होतं.

लोक घाबरून धावत होते, पण वाघ नेमका कुठं आलाय्, त्याने काय केलंय्, हे कुणी बोलेच ना. तेवढ्यात भाला घेऊन धावत निघालेला अन्या घायगुडा दिसला. त्याला भवान बंकीने हाकारलं, तो थांबला. त्याला बंकीने पुसलं,

"आर आन्या, ह्यो हाय काय कालवा? कुठे हाये जनवार?"

"नाईक, सत्तू कुंभाराची म्हातारी झडपलीन् त्यानं वाडग्यात! ओरडा झाला तवा निसटला! म्हतारीचा वाभाडा काढला त्येनं! कळकीच्या बेटाकडं निसटला बगा! तथंच असलं तर असंल दडी मारून?"

आणि मग आम्ही तिघेही गावाबाहेरच्या कळकीच्या बेटाकडे धावत सुटलो. शुद्ध अष्टमीचं चांदणं ढगांशी लंपडाव खेळत होतं. मला समजेना, हा वाघ असा कसा गवसायचा? तो काय आमच्यासाठी वाट बघत बसणार होता होय? पण भवान बंकीपुढं बोलायची सोय नव्हती. मी काही म्हटलं असतं, तर तो नक्की म्हणाला असता, 'नाजूक मानसाचं ह्ये कामच न्हाई! सरकार, तुम्ही जावा घरी! दूधभात खावा! जावा!' त्याच्या मागोमाग मी आणि अन्या धावत होतो; मुकाट्याने.

कळकीचं बेट आलं. घाणेरीची झुडपं जागोजाग माजलेली होती. बेडकं ओरडत होती. काजवे चमचमत होते. रातकिडे सूर धरून किरकिरत होते. आम्ही दवत दवत सभोवार पाहत चाललो होतो. दोनतीनदा दगड फेकून चाहूल घेतली, पण काही कुठं मागमूस लागेना. शेतांच्या ताली ओलांडून पुढं पुढं जात होतो. असं किती जायचं हा प्रश्नच होता. गावाबाहेर दूर असलेल्या सिद्धेश्वराचं देऊळ दिसायला लागलं. चांदण्यात देवळाची आकृती आणि वठलेल्या पिंपळाचा वेडावाकडा सांगाडा दिसत होता. करवंदीच्या जाळ्या आणि घाणेरीची झुडपं झुपक्याझुपक्यांनी विखुरलेली होती. आम्ही तिघेही दबत दबत चाललो होतो.

सिद्धेश्वराचं देऊळ जवळ आलं. सुमारे शंभर पावलांवर लहानसा नाला खळखळत होता. मी एक लहानसा दगड उचलला आणि करवंदीच्या एका जाळीवर भिरकावला अन् एकदम तिथून डरकाळी उठली!

"सरकाऽर वाघ! वाघ!"

अन्या ओरडला. डोळ्यांचं पातं लवायच्या आत त्या जाळीतून वाघ बाहेर धावला. आम्ही तिघंही एकदम ओरडलो. वाघ थेट आमच्या रोखाने झेपावत येत होता! भवान बंकीने आणि मीही ताबडतोब गोळ्या झाडल्या. धडाधडा बार उडाले, पण एकही लागला नाही! वाघ मात्र आवाजाने गोंधळून माघारा फिरला. पळत सुटला. त्याच्या मागोमाग ताडताड उड्या टाकीत भवान बंकीही! मी ओरडत होतो,

"नाईक, नाईऽऽक, थांबाऽ! मागं फिराऽ! बंदुकीत गोळी नाही! मागं फिराऽ! नाईऽऽक!"

पण भवान बंकीवर काही परिणाम झाला नाही. तो धावतच होता वाघामागं! अन् आमच्या डोळ्यादेखत तो वाघ सिद्धेश्वराच्या देवळात शिरला. त्याला देवळात शिरलेला बघताच भवान बंकी जास्तच वेगाने धावत सुटला. मी ओरडत होतो, थांबा थांबा म्हणून. माझ्या काळजात धडधड होऊ लागलं अन् बघता बघता भवान बंकीही सिद्धेश्वराच्या देवळांत शिरला! माझ्या काळजाचा ठावच सुटला. घामाने दरदरलो मी. देवळाकडे आम्ही दोघं धावू लागलो, पण जीभ कोरडी पडली होती. समजेना आता काय होणार ते. देवळात काळाकभिन्न काळोख असणार —

अन् पिसाळलेल्या त्या वाघाच्या भयंकर आरोळ्या ऐकू येऊ लागल्या! भवान बंकीच्याही आरोळ्या आणि शिव्या ऐकू येऊ लागल्या! माझ्या बंदुकीत एक गोळी होती. मी देवळाजवळ पोहोचलो. वाघाच्या आणि बंकीच्या आरडाओरडयाने देवळाचा प्रकार भयंकर घुमत होता. अंगावर काटा उभा राहिला होता माझ्या! मी देवळाच्या दाराशी गेलो. सिद्धेश्वराच्या पिंडीजवळ एक ज्योत मिणमिणत होती. भवान बंकी देवळाच्या आत दाराशी उभा होता. वाघावर ओरडत होता. शिव्या देत होता. वाघ अंगावर आला की उलट्या धरलेल्या बंदुकीच्या दस्त्याचे तडाखे

वाघाला लगावीत होता. एकच दार असलेल्या त्या देवळात वाघाची वाट अडवून बंकी त्याला हाणत होता ! वाघ चवताळून अंगावर येत होता अन् हाहा म्हणता बंकीने वाघाच्या कानशिलात तडाडकन् बंदुकीचा दस्ता हाणला ! वाघ पडलाच खाली. दुसरा लगावला. तिसरा लगावला. वाघाचा आवाज बंद झाला ! मी चित्रासारखा बघतच राहिलो.

भवान बंकी हसत हसत बाहेर आला अन् मला म्हणाला,

" सरकार, वाघ लई भाग्येवंत ! देवाच्या देवळात मरन आलं त्येला ! "

" नाईक, काय म्हणावं तुम्हाला ! लागलं का कुठं तुम्हाला ? "

" वाईचं ! आता त्येची माझी लढत लागली. लागायचंच ! "

सारा गाव लोटला. टेंभेमशाली लावून मिरवीत मिरवीत भवान बंकीला सरकारवाड्यात सर्वांनी आणलं. वाघाचं धूडहि आणलं. दुसऱ्या दिवशी गावच्या वेशीला उंचावर वाघाचं ते धूड मुद्दाम टांगून ठेवलं होतं. गडाच्या साऱ्या घेऱ्यात भवान बंकीचं कौतुक झालं. वहिनीसाहेबांनी दसऱ्याच्या दिवशी बंकीला वाड्यावर जेवायला थांबवलं आणि भवानी महालात माझ्या हातून त्याला भरजरी पटका बांधला.

भवान बंकी हा असा होता. रानदांडगा ! त्याचं बोलणं, हसणं, चालणं सारंच काही आडदांड होतं. दिसायचाही तसाच. घरघरीत सरळ नाक. स्वच्छ आणि टप्पोरे डोळे. उंचीला माल्यासारखा शिडशिडीत, पण भलताच टणक. मोठ्यामोठ्या मिशा आणि डोक्याला कोशा. आडदांड होता; पण त्याच्या चेहऱ्यावर खोडकरपणाचा भाव आणि स्मित नेहमी खेळत असायचं. त्याच्या खोडकर थट्टेतून कुणीही सुटायचं नाही. फक्त एकाच व्यक्तीचा त्याला धाक होता. ती व्यक्ती म्हणजे वहिनीसाहेब.

वास्तविक भवान बंकी आमच्या गावचा नव्हे. त्याचं गाव केतकवळं. बंकी हे त्याचं आडनाव, जात रामोशाची. भवान बंकीचं घर म्हणजे एक नमुनाच होता. घरात तीन बायका. तीनही त्याच्या स्वतःच्याच. थोरली लक्ष्मी. मधली नर्मदा आणि धाकटी चंद्रा. तिघींच्यावरही प्रेम सारखंच. थोरलीशी लग्न झालं ते आपलं व्हायचं म्हणून झालं. दुसरीशी झालं ते बंकीच्या मावळणीच्या 'विच्छेखातर' झालं ! मावळण म्हणजे आत्या. तिची फार 'विच्छा' होती की लाडक्या भाच्याला एक लेक द्यावी. दिली अन् तिसरं जे झालं, ते चंद्रावर भवानरावांचं मन बसलं म्हणून झालं ! म्हणजे आपलं 'प्रेमाचं' लगीन !

भवान बंकीचा संसार मोठा. प्रत्येकीला मुलं होती. तीन पोरी अन् चार पोरं. घरी चाल बैल आणि इतर चारदोन गुरं होती. बंकीची स्वतःची शेती अगदीच थोडी होती. फक्त अर्ध्या एकराचा तुकडा, पण त्याच तुकड्याला लागून आमचं दहा एकरांचं काळंशार वावर होतं. विहीर होती. बागायती व्हायची. अंजीर फार नंबरी व्हायचा. आमची जमीन भवान बंकीच कशीत असे. पहिल्यापासून सरकारवाड्याचा अन् बंकीच्या घराचा आठ पिढ्यांचा संबंध. भवान बंकी आपल्या बायकांपोरांसह

शतात खपायचा. दिवसभर. भवान बंकीची थोरली पोर तारा आता वयात आली होती. पदर आला असंल किंवा नसंल. भवान बंकीचा थाट पाटलाच्या वर असायचा. बंकीची उमर असंल की पस्तिशीची.

पण गडी भारी आडदांड. केव्हा काय करील आणि कुणाला काय म्हणेल त्याचा नेम नसायचा. आमचे धुंडिराजकाका इतके गंभीर आणि तिखट स्वभावाचे. त्यांच्यापुढं दोन वाक्यं सरळ बोलायची म्हणजे आम्हा घरातल्या माणसांच्या जिभेला घाम फुटायचा ! पण भवान बंकी पेन्सिल तासावी तशी थट्टा करायचा. धुंडिराजकाका कडकडीत ब्रह्मचारी होते. अबोल होते. गंभीर होते. एकदा आम्ही घरची सारी मंडळी गाड्या जोडून जेजुरीला गेलो. आमच्याबरोबर भवान बंकीही होता. गडावर गेलो. दिल्लीदरवाजातच एक मुरळी नाचत होती. गात होती. खरंच ती दिसायला मोठी छान होती. भवान बंकी धुंडिराजकाकांना खट्याळपणाने म्हणाला,

" काका, वाईचं या अंगानं या ! उगच घाव वर्मी पडंल ! "

काकांना थट्टा सोसायची नाही, पण भवान बंकीपुढं काय बोलायचं ? काका झपाझप जाऊ लागले. गर्दीच्या मागून दरवाजातून शिरू लागले अन् तेवढ्यात त्या मुरळीचं लक्ष काकांच्याकडे गेलं ! आलीच ती आडवी ! भिवया उडवीत काकांना अडवून तिनं गाण्याचं कडवं म्हणायला सुरवात केली.

" पंचप्राणाचा विडा सजविला देवा तुमच्यासाठी ! "

अन् मग भवान बंकीला उकळी फुटली. पृथ्वी पोटात घेईल तर बरं होईल, असं काकांना झालं. घाईघाईने काकांनी खिशात हात घालून जी नोट हाताला लागली, ती काढली. पाचाची होती ! काकांच्या काटेकोर दक्ष हिशेबात बसत नव्हतं, तरीही त्यांनी पटकन् ती नोट तिला देऊन आपली सुटका करून घेतली, पण मग तर भवान बंकीला जास्तच जोर आला. म्हणाला,

" काकांनी पाच रुपयं वोवाळून टाकलं ! काका भाळलं ! बरह्मचारीपन डबघाईला आलं जणू ! "

काका आणि बंकी एकाच वयाचे. एकत्र खेळले, वाढलेले. बोलायची सोयच नाही.

एकदा असाच तो स्वतःच्या घरच्या साऱ्या बायकापोरांना घेऊन जेजुरीला आला. त्याची थोरली मुलगी तारा आणि तिच्या तिघी-चौघी मैत्रिणीही आल्या होत्या. सोमवतीची जत्रा होती. गर्दी फार नव्हती. गड चढताना तारा आणि तिच्या मैत्रिणी झपाझपा पुढं गेल्या. बंकी आणि बाकीची माणसं बरीच मागं राहिली. हसत बोलत पोरी पायऱ्या चढत होत्या. अन् तेवढ्यात पोरींना मागच्या बाजूने फिदीफिदी हसण्याचा आणि वळंच खाकरण्याचा आवाज आला. पोरींनी वळून पाहिलं. बघतात तो तीन-चार पोरांच्या घोळक्यात पानवडीच्या पिऱ्या वाघाचा पोरगा गर्जा थट्टा करीत येत होता. पोरी झपाझपा पाय उचलू लागल्या. गर्जाला अवसान आलं होतं. हसत होता. चावटपणाने बोलत होता. बाकीचे त्याला साथ देत होते.

" डोंगर चढू चढू गोळं आलं पायाला !"

" आरं मंग घ्या की कुनी कडंवर !"

" व्हय व्हय ! घ्या घ्या ! कडंवर घ्या ! कुनी घ्या पांढरी, कुनी घ्या तांबडी, कुनी घ्या हिरवी. म्या घेतो डाळिंबी ! "

पोरी ज्या ज्या रंगाच्या साडया नेसल्या होत्या, त्या त्या रंगाची अशी वाटणी चालली होती ! बंकीची तारा डाळिंबी साडी नेसली होती ! गडावर पोहोचेपर्यंत ह्या पोरांनी असा त्यांचा पाठलाग चालविला होता. हे वाघाचं कोटं मोठं वाह्यात होतं. पानाचंदच्या मोटारीवर क्लिनरचं काम करायचा तो, पण आव आणायचा पोलीस इन्स्पेक्टरचा. अंगानं जरा भरलेला होता. वीरच्या जत्रेत कधी एकदा एक कुस्ती मारली होती, त्या मांडवलावर टगेगिरी करायचा. आतापर्यंत तीन-चार पोरी आणि काही लग्नाच्या बाया त्याने बिघडवल्याचा बोभाटा होता.

गडावर गेल्यावर संधी साधून तारीने हळूच आपल्या बापाला गर्जाची कागाळी सांगितली. ' हुं ' म्हणत बंकीने सारं ऐकून घेतलं. काहीही बोलला नाही.

जेजुरीची जत्रा उलगडली. गाडया परतल्या.

एका रात्री, जेवण झाल्यावर भवान बंकीने पान खाता खाता थोरलीला हाक मारली,

" लक्ष्मी ! ए लक्षुमे !"

" आल्ये जी !"

लक्ष्मी आली. तिला बंकी म्हणाला,

" लक्षुमे, मला जरा बिब्बं आनून दे !"

" बिब्बं ? त्ये वो कशाला ?"

" माझ्या कपाळावर घालायचंत ! आन म्हनलं, आनावं मानसानं ! नसती पाटीलकी करू न्हाई !"

लक्ष्मीने दोन बिब्बे आणले आणि दिले.

" दोन न्हाई पुरत ! अजून आन पसाभर ! दाभन बी आन !"

तिने आणून दिले. रात्र बरीच चढली होती. बंकी उठला. गोठ्यातला कासरा खांद्यावर टाकून आणि दाभणबिब्बे कशात घेऊन तो निघाला. कुठं जातो, केव्हा येतो, काही बोलला नाही.

पानवडीच्या वाघाचा गर्जा आपल्या खळ्यावर झोपला होता. एकटाच होता. बंकीने मुद्दाम पाळत ठेवून हेरलं होतं ते. गर्जा गाढ झोपला होता. बैलाला ढोसून उठवावं, तसं बंकीने गर्जाला उठवलं. गर्जा गोंधळलाच. उठला. बंकीने त्याला झटकन् पुठ्ठी देऊन उताणा पाडला अन् छातीवर बसून बंकीने त्याच्या तोंडात बोळा कोंबला ! त्याचे हातपाय कासऱ्याने बांधले. गर्जाला फारसं ओरडायलाही त्याने अवसर दिला नाही. तस्संच त्याचं मुटकुळं उचललं. लांब लांब आडरानात

नेलं. एका झाडाशी नेऊन त्याला सोडलं. त्याची धडपड चालू होती, पण बंकीपुढं त्याचं बळ किती ? बंकीने गर्जाच्या अंगावरचे एकूण एक कपडे काढले ! त्याला चक्क दिगंबर केला ! त्याला त्याने झाडाला बांधलं. चिंधीचा टेंमा पेटवला. दाभणाला विव्वा टोचला आणि गर्जाच्या उघड्या अंगावर विव्व्याचे चरचरीत डाग देत, प्रत्येक डागागणिक बंकी हिशेब सांगू लागला,

" कुनी घ्या पांढरी ! ही घ्या पांढरी ! कुनी घ्या हिरवी ! ही घ्या हिरवी !......"

गर्जा वाघाचा बिबटचा वाघ तयार झाला ! कपाळापासून पावलापर्यंत बंकीने गर्जाला सजवून काढलं आणि दिलं सोडून ! पुन्हा कधी गर्जाबद्दलची तक्रार कुठं उठली नाही.

भवान बंकीची ताकद दांडगी. आमच्या घराण्याला एक मोठा मान आहे. कशाचा ? दसऱ्याच्या दिवशी खंडोबाच्या माळावर तलवारीने बकरं मारण्याचा ! स्वतःच्या हातानं बकरं मारण्याचा ! शिलंगणाची मिरवणूक गावाबाहेर माळावर आली, की पाटलाने बकरं समोर आणायचं आणि आमच्या घराण्यातल्या पुरुषाने तलवारीने त्याचं मुंडकं उडवायचं ! आमच्या पणजोबांपर्यंतचे आमचे पूर्वज स्वतः तलवारीने बकऱ्याचं मुंडकं उडवीत असत, पण आमच्या आजोबांपासून आम्ही स्वतःची तलवार खांद्यावर घेऊन फक्त उभे राहतो आणि आमच्यासमोर गावचा खाटिक बकरं कापतो. नंतर पाटील आपल्या बोटाने रक्ताचा टिळा आमच्या खांद्यावरच्या तलवारीला लावतो ! मी तर खांद्यावर तलवार घेऊन आकाशाकडे बघत उभा राहतो, ते सारं होईपर्यंत !

एका दसऱ्याला भवान बंकी शिलंगणाच्या मिरवणुकीत होता. जरीचा तांबडा लाल पटका त्याने बांधला होता. मिरवणूक खंडोबाच्या माळावर आली. मी म्यानातून तलवार काढून जेजुरीकडे तोंड करून उभा राहिलो. पाटलाने बकरं आणलं. खाटिक आला अन् भवान बंकी हसायला लागला. माझी खात्रीच झाली, की आता हा साऱ्या गावादेखत माझी थट्टा करणार, पण बंकी समोर येऊन म्हणाला,

" सरकार, उडवा मुंडकं ! एका सपाटचात उडायला हवं !"

मी हसलो. त्या हसण्यातच, ' जमणार नाही, ' असा अर्थ सामावलेला होता. सगळा गाव गम्मत बघत होता.

" ह्ये बामणांचं कामच न्हाई ! निस्ता दूधभात खावा !"

असं म्हणत भवान बंकीन माझ्या हातातली तलवार घेतली. ती खाली जमिनीवर आडवी ठेवली आणि त्या बकऱ्याच्या पुढच्या तंगड्या डाव्या हातात आणि मागच्या तंगड्या उजव्या हातात धरून ते त्याने उचललं अन् तसंच जोराने उंच फेकलं ! झटकन् जमिनीवरची तलवार उचलली आणि—

" येळकोट येळकोट येळकोट......जय मल्हा ऽऽऽऽ र !"

असे गर्जत त्याने ' जय ' ह्या शब्दाच्या खटक्यावर बकऱ्याचं वरच्या वर मुंडकं उडवलं ! कमीत कमी तरी तीस पौंड वजनाचं बकरं होतं ते.

असा हा रानदांडगा !

भवान बंकीची शेतीवाडी छान चालली होती. सरकारवाड्याला मात्र उतरती कळा लागली होती. नवरात्राच्या उत्सवात कीर्तनं करवणं तर दूरच राहिलं; पण देवाच्या शेजारी चार समया लावणंसुद्धा अशक्य झालं होतं. समयाच उरल्या नव्हत्या मुळात ! त्याही मोडीत विकाव्या लागल्या होत्या. भवान बंकीच्याकडून चार पोती दाणे आले, म्हणजे सरकारवाड्याच्या ओटीला काय चार दिवस शोभा येई, तेवढीच.

अन् एक वर्ष भवान बंकीवरही कुऱ्हाड कोसळली. साथीच्या रोगाने सगळे बैल आणि इतर गुरं चार दिवसांत पटापटा मेली. त्याची लाडकी तारा अतिशय आजारी पडली. भरीला भर, शेतातली विहीर मोटेच्या भुडकीसकट कोसळली. दगडांनी आणि गाळाने विहीर भरली. बंकीला कळेना काय करावं ते. शतीची कामं डोक्यावर आलेली. शेती पडून राहिली, तर खायचं काय ? काही सुचेना. तो उठला. निदान तीन हजार रुपये तरी हवेच होते. कुठून आणायचे ? कोण देणार ?

भवान बंकीचे पाय सरकारवाड्याकडे वळले. तो केतकवळ्याहून निघाला आणि आमच्या गावी आला. सरकारवाड्यात आला. भवान बंकीला आमच्या वाड्यात कुठंही न् कधीही बंदी नसायची. मी ओसरीवर होतो. मला मुजरा करून तो थेट वहिनीसाहेबांच्या दालनात गेला अन् थबकला ! वहिनीसाहेबांनी वर पाहिलं. त्याने मुजरा केला, पण त्याचा चेहरा उतरला, खंतावला, वहिनीसाहेब माझ्या शर्टला ठिगळ लावीत होत्या. त्या चटकन् म्हणाल्या,

" या या नाईक ! बसा ! "

पण न बसताच तो मंद पावलांनी परत फिरला. ओसरीवर आला. मी विचारलं,

" का नाईक, निघालात लगेच ? "

" जी सरकार ! जातो जरा ! "

आणि बंकी झपाझपा निघून गेला. थेट परिंच्याला गेला. परिंच्याचा गणशेठ सावकार चांगलाच गबर होता. बंकी गणशेठच्या घरी गेला. बंकी कर्ज मागायला आलेला आहे, हे ध्यानी येताच, सावकाराची नजर बदलली. त्याने बंकीची जरा हेटाळणीच सुरू केली.

" काय तीन हजार रुपये ? अरे बंकी, माझ्या परसातल्या झाडाला चिंचा आणि चिंचोकेच येतात ! नोटा येत नाहीत ! कुठून देऊ तुला तीन हजार ? "

बंकीने फार फार आर्जवणी केली, पण गहाण ठेवायला सोन्याचं सुंकलंही नसलेल्या बंकीला सावकार कसा कर्ज देणार ?

" सावकार, खंडोबाच्या आन् वहिनीसाह्येबांच्या पायाची आन घेऊन सांगतो तुम्हाला, तुमचा पैका याजासकट सुगीला फेडीन !"

" पायाच्या शपथा घेऊन व्यवहार व्हायला हे रामराज्य नाही बाबा ! जा जा, एखाद्या कुबेराला भेट ! गहाणाशिवाय मी व्यवहार करीत नाही !"

जो जो बंकी आर्जव करू लागला, तो तो सावकार जास्तच थट्टा करू लागला. सावकाराचा मुनीम आणि कारकूनही त्या थट्टेत सामील झाले. बंकीच्या काळजाला विंचू डसत होते, तरीही तो आर्जव करीतच होता. थट्टाही वाढतच होती.

" सावकार, आजवर जर धर्मानं आन् खरेपणानं जगलो, वागलो आसन्, तर माझी जबान गहाण हाय असं समजा ! आजवरच्या ह्यातीत माझ्या अंगाला डाग लागलेला न्हाई. सवास्नीच्या कुंकवागत अब्रू सांभाळलीय् सावकार. माझ्यावर परसंग कठीन आलाय. समदं उभं पीक लिहून देतो तुम्हास्नी."

" पेरणीला पत्ता नाही अन् कोणतं रे उभं पीक लिहून देणार तू ? लग्नाच्या आधीच बारशाचं आवातन ?"

बंकीने अखेर सावकारापुढं डोकं टेकलं आणि म्हटलं, " सावकार, माझ्या बाची चाळीस विघं जिमीन अवघ्या पाचशे रुपये कर्जावर तुम्ही घेतलीत. आठवन करा ! ती तुम्ही कशी घेतली ह्ये मी काय बी म्हनत न्हाई. पर एवढं हात जोडून म्हनतो, की त्यो अन्याव गरिबावरचा दूर करा देवा ! येनारं पीक आठ हजाराचं हुईल. उभं पीक लिहून देतो. ही जिमीन माझी असती तर ती बी लिहून दिली असती."

" गहाणाशिवाय व्यवहार नाही !"

मुनिमाने मधेच वकिली केली,

" पण सावकार, काय गहान ठेवू ? हाये काय गहान ठिवायला ?"

" गहाण ? तुझी बायको गहाण ठेव !—चंद्री !"

सावकार बोलला ! मोठ्याने हसला. मुनीम हसला. कारकून हसला. अंगण झाडणारा गडीही हसला. हसतच राहिले सारे. बंकी मात्र एकदम गप्प झाला. उठला. पायांत वहाणा सरकवल्या अन् शेवटचे शब्द बोलला—,

" मंग येऊ देवा ?"

" केव्हाही ये ! चंद्रीला घेऊन ये !"

सावकाराचं हे उत्तर आणि वर ह्यः ह्यः ह्यः ह्यः ! भवान बंकी निघून गेला.

आठ दिवस गेले. वैशाखाची आवस उगवली. मध्यरात्र झाली. एक दीडचा सुमार झाला. परिचं गाव चिडीचिप्प झोपला होता. अंधार दाट होता अन् एकदम ढोल, ताशा आणि हलगी दणाणू लागली ! लोक दचकून उठले; पण घराबाहेर पडायला त्यांची दारेच उघडेनात ! बाहेरून कड्या घातल्या गेल्या होत्या. सावकाराच्या वाड्यापुढं आवाज कडाडत होता. मशाली पेटल्या होत्या, कुऱ्हाडी

घेतलेले सात आठ रामोशी वाड्यात उतरले होते. सावकार जागा झाला होता. घाबरला होता. बायकापोरं बोंबलत होती.

भवान बंकीने सावकाराला गाठलं. घाम फुटला होता त्याला. बंकीने हसून म्हटलं,

" रामराम सावकार ! गहाण ठेवायला जडजव्हार आनलंय् !"

असं म्हणत बंकीने सावकाराला दंडाला धरून खिडकीशी नेलं. खाली रस्त्यावर मशालीच्या उजेडात तीन बायका वाद्यं वाजवीत असलेल्या सावकाराला दिसल्या ! एक बाई ढोल वाजवीत होती ! दुसरी ताशा वाजवीत होती ! तिसरी हलगी वाजवीत होती !

" ती लक्षिमी ! ही दुसरी नर्मदा ! आन् ही आल्याडची चंद्रा !"

सावकार थरथरा कापत होता. घामाने डबडबला होता. बंकीने हाक मारली,

" चंद्रा, वरती ये !"

सावकाराने मागं वळून पाहिलं, सात आठ कुऱ्हाडी उभ्या होत्या !

" भ–भ–भवानराव, म–म–मी तुम्हाला रक्कम देतो !"

" सावकार, तुम्ही नगा शिनू ! आम्ही घेतो हिशेबानं ! तुम्ही तिजुरीच्या किल्ल्या द्या !"

बंकीने तिजोरी उघडली. बंकीने सारा ऐवज बाहेर काढला. तेवढ्यात चंद्रा वर आली.

" सावकार, ही चंद्रा !"

सावकाराने तिच्यापुढं भुईवर डोकं टेकलं !

बंकीने ऐवज मोजला. मोजून तीन हजार रुपये बाजूला काढले. शिवाय प्रत्येक रामोशाच्या हातावर दोनदोनशे रुपये ठेवले. मजुरी ! बाकीचा सारा ऐवज, सोनंनाणं जसंच्या तसंच टाकून बंकी उठला अन् सावकाराला म्हणाला,

" ही एका एकाची मजुरी दोनदोनशे रुपये पडली. ती तुमच्या खात्यावर लिव्हा! ह्ये तीन हजार रुपये म्या घेतलेत. ह्यातली कवडीबी परत मिळणार न्हाई ! माझ्या चाळीस बिघ्याची चतकोर किंमत वसूल केलिया अन् जर पोलिसाबिलिसाकडं जाल, तर मुंडकं तुटलं ! समजलं ?"

दुसऱ्या दिवशी भवान बंकी भर उन्हात शेतातल्या विहिरीवर काम करीत होता. त्याच्या कपाळावरून घाम निथळत होता.

● ● ●

# तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सिद्धीसाठीं हातभार!

धरतीमातेनें प्रसन्न होऊन अनंत हस्तांनीं दिलेलें लक्षावधि टन धान्य सांठवणीसाठीं गुदामांतून ठेवलें जात आहे...

पण पिकें अमाप यायला हवींत तर प्रथम जमिनीला पाण्याचा पुरवठा वेळच्यावेळीं नि भरपूर होणें आवश्यक आहे. **किर्लोस्कर डिझेल एंजिनें** नेमक्या याच बाबतींत महत्त्वाची कामगिरी बजावीत असतात.

वर्षानुवर्षें खूप अन्नधान्य पिकावें म्हणून नदीनाले, विहिरी, तळीं यांतून पाणी वर खेंचून काढणाऱ्या पंपांना तीं शक्तीचा हमखास पुरवठा करतात.

अनेक वर्षांच्या अनुभवानें नि संशोधनानें पूर्णत्वास पोहोंचलेलीं आणि साऱ्या जगभर उत्कृष्ट दर्जा व हमखास कामगिरीबद्दल नांवाजलेलीं हीं एंजिनें आज तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत हजारों शेतकऱ्यांना अधिक

धान्य पिकविण्याच्या कामीं मदत करून भारतीय सरकारपुढील एक महत्वाचा प्रश्न सोडविण्यास हातभार लावीत आहेत.

## किर्लोस्कर

**५ हॉर्स पॉवर डिझेल एंजिन**





**किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड,**
**खडकी, पुणें-३ (भारत)**



# विनोदी लेखकांचा दणदणीत पराभव!



बाळ गाडगीळ

आमच्या अनेक (माजी) महत्त्वाकांक्षांपैकी एक आपण समाजसुधारक व्हावे अशी होती. राजकारणी लोकांना तुरुंगवासाची जी भीती असते, ती समाजसुधारकांना नसल्यामुळे आम्ही ही महत्त्वाकांक्षा धरली असे अर्थातच आमचे काही टीकाकार म्हणतात. बाकी टीकाकार हे प्राणी दुसऱ्यांच्या दोषांवर कधीकधी अगदी अचूक बोट ठेवतात हे खोटे नाही. परंतु आगरकर, हरिभाऊ यांच्या लेखनाचा खरे म्हणजे हा आमच्यावरील परिणाम होय. आमच्या मातोश्रींच्या शिकवणीचा आमच्यावर परिणाम होण्याऐवजी वडिलांच्या मवाळ मतांचा आमच्यावरील परिणाम जास्त प्रभावी होता, असेही आमचे घरगुती टीकाकार म्हणतातच. म्हणोत बिचारे. पण ते कसेही असो, आगरकरांसारखे समाजसुधारक होण्याच्या दृष्टीने दोन सदरे वापरता येणे शक्य असूनही आम्ही कित्येक दिवस एकच सदरा वापरीत होतो, हे सत्य आहे. गोपाळरावांचीही आपल्यावर छाप असावी, या दृष्टीने म्युनिसिपालिटीच्या दिव्याच्या आसपास आपले घर असावे, असा हट्ट आम्ही आमच्या वडिलांजवळ धरला होता, असे आम्हाला आठवते. परंतु म्युनिसिपालिटी आणि नगरपालिका यांत मूलतःच फार मोठा भेद असतो आणि ' दिवे लावणे ' इत्यादीसारखी कामे नगरपालिका केवळ लाक्षणिक अर्थाने करते, असे सांगून आमच्या वडिलांनी आमच्या उत्साहावर विरजण घातले होते.

पुढे आम्ही विनोदी लेखन करू लागलो आणि ते विनोदी म्हणून छापूनही येऊ लागले, त्यावरून आपण लिहीत असतो ते विनोदीच आहे, असे आपल्याशिवाय आणखी एकाचे तरी मत असावे, हे कळून चुकले. (आणि ही जरी चूक असली, तरी त्याच संपादकाने ती अनेकदा व इतर अनेकांनीही बऱ्याच वेळा केल्यामुळे बरोबरच आहे असे आम्ही समजून चुकलो !)

येथपर्यंत सर्व ठीक होते, पण नंतर काही दिवसांनी कोणातरी विद्वान साहित्यिकाने केलेल्या एका भाषणाचा रिपोर्ट आमच्या कानावर आला. त्या भाषणात ' विनोदी लेखक हे समाजसुधारकच असतात ', असा निर्वाळा त्यांनी देऊन टाकला

होता असे कळले. आता श्रीपाद कृष्ण वगैरे लेखकांनी (खरे म्हणजे आणखी कोणीच नाही) आपल्या विनोदी लेखांतून समाजावर कोरडे वगैरे ओढले आणि त्यामुळे तत्कालीन समाज सुधारायला बरीच मदत झाली, यासंबंधीची कुणकुण कॉलेजात असतानाच आमच्या कानावर आली होती हे खरे; परंतु श्रीपाद कृष्णां-सारख्या थोर विनोदी लेखकाने जे केले, तेच इतर सामान्यांनीही केले असेल; याची आम्हाला सुतराम कल्पनाच नव्हती, पण आता उपरिनिर्दिष्ट विद्वानांच्या मते इतरांच्याबरोबर सुधारकाचा बुक्का आम्हालाही लागतो, हे उघड झाले. आमची लहानपणची सुप्त महत्त्वाकांक्षा सफल झाली ती अशारीतीने.

'मी पंतप्रधान झालो तर–' या आम्ही बालपणी लिहिलेल्या निबंधात सुचवि-लेल्या सुधारणांपासून देश वाचला असला तरी 'मी सुधारक झालो तर–' या आमच्या तितक्याच गाजलेल्या निबंधात मांडलेल्या सुधारणांपासून वाचण्याची आता निदान महाराष्ट्राला तरी आशा नाही, हे कटू सत्य आम्हाला कळून चुकले. विनोदाचे अस्त्र वापरून आपण आता या महाराष्ट्राला काय करावे आणि करू नये असे आम्हाला होऊन गेले.

पण आमचे (आणि अखिल महाराष्ट्राचे) दुर्दैव असे की विनोदाच्या सहाय्याने सुधारणा घडवून आणणे नव्हेच, पण समाजावर नुसते कोरडे ओढणे हीसुद्धा पूर्वीच्या इतकी सोपी गोष्ट राहिली नाही. कोल्हटकर आणि गडकरी यांच्यावेळीसुद्धा ही फार सोपी गोष्ट होती. कोल्हटकरांनी 'शिमग्या' वर हल्ला चढविला आणि तेव्हा-पासून ही घाणेरडी चाल बंद पडली. आता प्रत्यक्ष शिमगा बंद झाला आणि जीव-नाच्या इतर क्षेत्रांत तो शिरला हे खरे आहे, पण कोल्हटकर त्याला जबाबदार नाहीत. 'श्रावणी 'वरील त्यांनी केलेल्या हल्ल्यामुळे लोक या चालीपासून आता इतके परावृत्त झाले आहेत की ते मोठ्या प्रेमाने गोमांससुद्धा सेवन करतील, पण गोमूत्राला स्पर्शही करणार नाहीत. निर्जळचा एकादशीवरील कोल्हटकरांच्या जळ-जळीत टीकेमुळे आजकाल कोणी साध्या एकादशीचेसुद्धा नावही काढीत नाहीत त्यांनी हजामतीची 'शास्त्र'शुद्ध मीमांसा केल्यापासून केशवपनाची चाल बंद पडली. चोरांच्या संमेलनावर त्यांनी केलेल्या मार्मिक टीकेपासून या लोकांनी कोठे संमेलन भरविल्याचे ऐकिवात नाही. अर्थात चोरी हा ज्यांचा फक्त जोडधंदाच असतो, अशा लोकांची सभा संमेलने सतत चालू असतात हे खरे, पण कोल्हटकरांचा हल्ला या लोकांवर नव्हता, हे येथे त्यांच्या टीकाकारांनी लक्षात घेतले पाहिजे.

गडकऱ्यांचे उदाहरणसुद्धा महत्त्वाचे आहे. दारूवरील त्यांच्या हल्ल्यामुळे तर खुद्द सरकारनेच दारूबंदीचे धोरण स्वीकारले. अर्थात त्यामुळे समाजात मद्यसेवन कमी होऊ लागले, हे खरे नसले तरी सुधाकर नावाचे वकील आजकाल मद्यपान करताना आढळत नाहीत आणि तळिराम नावाचे मद्यपी तर नुसते आढळतसुद्धा नाहीत, हे सत्य नजरेआड करता येण्यासारखे नाही.



" पु. ल. म्हणजे भयंकरच विनोदी बै."

कोल्हटकर आणि गडकरी या विनोदकारांनी सामाजिक सुधारणा येणेप्रमाणे चुटकीसरशा घडवून आणल्या खऱ्या, पण त्यांचे दिवस आता राहिलेले नाहीत.

याचे एक कारण म्हणजे विनोदाची वाढती लोकप्रियता. आजकाल विनोदी-वाङ्मय फार लेखक मोठ्या प्रमाणात लिहू लागले आहेत. एवढेच नव्हे, सरसकट सगळेच लोक ते आवडीने वाचू लागले आहेत. याचा एक घातक परिणाम म्हणजे विनोदी लेखनाचा लोक हसण्यापलीकडे स्वत:वर कसलाच परिणाम होऊ देत नाहीत.

विशाल महिलांचीच गोष्ट घ्या. आता पु. लं. नी या जमावावर जे विनोदी हल्ले केले, त्यांचा परिणाम काय झाला ?

" पु. ल. म्हणजे भयंकरच विनोदी बै, " असे म्हणून त्या पोटभर हसल्या आणि (अधिक) लठ्ठ झाल्या. लेखकाचा हल्ला आपल्यावर होता, हे संपूर्णपणे विसरून. 'तुझे आहे तुजपाशी'मुळे देशपांड्यांना अतिविशाल महिलांत लोकप्रियता लाभली आहे, हे नि:संशय, पण आपल्या मुख्य हेतूचे हे काय झाले, असे वाटून या विनोदी लेखकाला किती यातना होत असतील बरे ?

विनोद तेल्यातांबोळ्यांपर्यंतही पोचला, याबद्दल कोणत्याही विनोदी लेखकाला वाईट वाटत असेल असे नाही, पण तो शेवटी सगळाच हसण्यावारी जातो, याचे दु:ख त्या लेखकाला केवढे असते, याचा कोणी विचारच करीत नाही.

विनोदाचे शस्त्र वापरून पुण्याच्या एका रिक्षावाल्यात सुधारणा घडवून आणण्याच्या आमच्या एका विनोदी लेखक मित्राने केलेल्या प्रयत्नाचे काय झाले ? त्याच्या औपरोधिक बोलण्याला तो रिक्षावाला पोटभर हसलाच, पण शेवटी त्याने रिक्षाच्या आतल्या बाजूस ठळक अक्षरात लिहिलेल्या एका सुभाषिताकडे या विनोदी लेखकाचे लक्ष वेधले. 'शब्द हे दुधारी शस्त्र आहे, ते जपून वापरा.' असे ते दुधारी सुभाषित वाचल्याबरोबर आमच्या मित्राने आपले विनोदाचे अस्त्र खिशात टाकले आणि घरचा रस्ता सुधारला.

'एक्स्प्रेस' हसू आणणारे 'जंक्शन' विनोदी लेखक म्हणून मिरासदारांना

मोठा लौकिक मिळाला असेल, पण ज्या ग्रामीण मंडळींत त्यांच्या विनोदामुळे सुधारणा घडून यायला हवी होती, त्यांनी मिरासदारांच्या गप्पाटप्पा हृशावारी नेल्या. खरे म्हणजे गावाकडे हा माल पोचायच्या आतच शहरच्या पाव्हण्यांनी त्याची लुटालूट केली आणि गावापर्यंत काही पोचलेच नाही. ग्रामीण भाग त्यामुळे कोरडाच राहिला. तेथील निवांतपणा, आळस, उगाच भांडत बसायची सुरसुरी, शिवीगाळ, लफडी, पानतंबाखू, पिचकाऱ्या यांचे पीक सोळा आणेच येत राहिले. उलट जोंधळा, बाजरी यांचे काही आणे कमी झाले असतील! मिरासदारांच्या विनोदामुळे ग्रामीण मंडळी सुधारली नाहीच, उलट त्या लोकांच्यातली लबाडी, आळस, कावेबाजपणा, चुकारपणा इत्यादि नामांकित गुण वाढीलाच लागले असून, शहर भागांतही या गुणांची लागण झाली असावी, असा काही निरीक्षकांचा अंदाज आहे.

ग्रामीण मंडळींप्रमाणेच बालगोपाल मंडळीही बेरकी बनली आहे आणि विनोदामुळे तिच्यात काही सुधारणा घडवून आणण्याची अपेक्षा करणे इतका अडाणीपणा दुसरा कोणताच राहिला नाही. अभ्यासूवृत्ती, शिस्तप्रियता, उद्योगप्रियता यांच्यासारखे गुण आजकालच्या व्रात्य पोरात आणण्यासाठी आम्ही केलेले विनोदी प्रयत्न हास्यास्पद ठरले. कोणत्याही कामात आळस चांगला नाही. दीर्घोद्योग आणि चिकाटी हे गुण हवेत, म्हणून मुलांना आम्ही 'ससा आणि कासवा'ची सुप्रसिद्ध गोष्ट खुलवून सांगितली. गोष्ट ऐकताना पोरे भरपूर हसली, पोट धरधरून हसली, पण गोष्ट संपल्यावर जेव्हा आम्ही विचारले, 'बाळांनो, तुम्ही या गोष्टीपासून काय शिकलात बरे?' तेव्हा आलेली मासलेवाईक उत्तरे येणेप्रमाणे :—

१. गोष्ट 'टॉप' आहे.

२. कासवाने शर्यत जिंकली हे 'बंडल' आहे.

३. ससा वाटेत झोपला असणे शक्यच नाही.

४. सशाने शर्यतीत भाग घेण्यात चूक केली.

५. ही गोष्ट ऐकली आहे. 'संगम'ची गोष्ट सांगा.

'सिंह आणि उंदीर' या गोष्टीचे तात्पर्य या पोट्टयांनी सिंहाला बोलता येणे शक्य नाही, उंदराचे दात तोडण्याइतके मजबूत नसतात, उंदराला मराठी बोलता येत नाही, तुम्ही 'बंडले' मारता, अशा तऱ्हेचे अनेक फाटे फोडून हृशावारी नेले. इतर सगळ्या गोष्टींचा निकालही असाच, मात्र एवढे सगळे असूनही आम्ही हसविण्यासारख्या गोष्टी सांगतो, याबद्दल या वानरसेनेत मुळीच दुमत नव्हते.

ही आपली काही उदाहरणे झाली. परंतु सामाजिक दोषांवर विनोदी हल्ले चढविणाऱ्या लेखकांचा प्रत्येक आघाडीवर पराभवच झालेला आहे, हे करुण पण कठोर सत्य आहे. पु. लं. नी 'घरमालकास मानपत्र' दिले म्हणून कोणा घरमालकाचा हृदयपालट झाल्याचे ऐकिवात नाही. भारतीय रेल्वे आणि हिंदी सिनेमा यांवर

बुवांनी आपल्या विनोदी तोफांचा सतत भडिमार केला असला तरी रेल्वेचा रूळही वाकडा झालेला नाही, की ' सूर्याखालचे सर्व काही ' हिन्दी सिनेमात अडमडायचे थांबलेले नाही. खुद्द मंत्र्यांचे विनोदी टोमणेसुद्धा सरकारला बिलकुल लागलेले दिसत नाहीत.

पण या सगळ्या क्षेत्रांपेक्षाही सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने विनोदाचे अस्त्र कुठे लटके पडले असेल, ते कौटुंबिक आघाडीवर. या आघाडीवर तर विनोदी लेखकांचे पानपतच झाले आहे. वास्तविक ज्याला एका पु. लं. नी ' सौ ' फेर हल्ले असे म्हटले आहे, त्यांनी प्रत्येक विनोदी लेखकाने आपापल्या कुवतीप्रमाणे भाग घेतला असूनही इतके चौफेर अपयश आतापर्यंत कोणालाच कधीही मिळालेले नसेल. विनोदी लेखक झाला म्हणून काय झाले, शेवटी तो एक गरीब बिचारा नवरा असतो आणि या जातीचा प्रत्येक प्राणी हाडाचा भित्रा असतो. अर्थात हा स्वतःचा भित्रेपणा लक्षात घेऊन विनोदी लेखकांनी कौटुंबिक आघाडीवर उघडउघड युद्ध पुकारण्याऐवजी व्याजोक्ती, वक्रोक्ती, उपरोध, उपहास इत्यादि शेलकी अस्त्रे घेऊन गनिमी काव्याचा आधार घेतला हे खरे, पण तरीही शेवटी हाताला लागले ते अपयशच ! असल्या कुठल्याही काव्यामुळे गनीम जेरीला आल्याचे उदाहरण नाही. कोणीतरी म्हटल्याप्रमाणे बायकांच्या कटकट्या, बडबड्या, दुराग्रही, हेकेखोर, द्वेषी, कपटी, धूर्त, भांडखोर, कजाग, खर्चिक, स्तुतिप्रिय, पोशाखी, उथळ, अविचारी, अप्पलपोट्या, स्वार्थी, टीकाखोर, मतलबी, आततायी, बोलघेवड्या स्वभावाला कोणत्याही प्रकारची मुरड विनोदी लेखनामुळे पडली आहे, असे कुठलाही विनोदवीर छातीवर हात ठेवून सांगणे शक्य नाही.

कोल्हटकरांचे नशीब असे की त्यांना आपल्या विनोदाची फौज घेऊन या कौटुंबिक आघाडीला तोंडच द्यावे लागले नाही, कारण त्यावेळी या आघाडीवर संपूर्ण सामसूमच होती. त्यावेळी – गेले ते दिवस ! – कुटुंब पतीच्या अर्ध्या वचनात असे. चांगलेचुंगले करून त्यांना खाऊपिऊ घालण्यात धन्यता मानीत असे. ' तिकडून ' जेवायचे असताना पदर बांधून आणि हातात पंखा घेऊन अदबीने बाजूला कुटुंब उभ असे. जेवण होताच तोंड धुण्यासाठी गरम पाण्याचा तांब्या, हात पुसण्यासाठी पंचा, नंतर सेवन करण्यासाठी तांबूल सज्ज असत. ' तिकडे ' हपिसात जायचे असले म्हणजे कुटुंबाची केवढी धांदल. निऱ्या करून ठेवलेले स्वच्छ धोतर, गुंड्या जागेवर असलेला अंगरखा, उपरणे, रुमाल योग्य वेळी हातात देण्यासाठी केवढी तत्परता. सायंकाळी ' तिकडून ' हपिसातून घरी येणे होताच अशीच धावपळ. शंकररावांच्यासाठी त्यावेळी गरमागरम चहा, बदामाचा शिरा. ' इकडच्यांचे ' पाळे इत्यादि नामी पदार्थ तयार असत. नुसते बाहेर ' तिकडचेपाऊल वाजले की घरात शांतता पसरण्याचे ते दिवस. बुटाचे बंद सोडण्यापासून तो पाय, डोके चेपण्यासाठी त्यावेळी कुटुंबे भराभरा वाकत असत. बरे, एवढे सर्व करून 'बोलणे' अजीबात नाही. न बोलता,

मुकाटपणे सर्व व्यवहार. 'तिकडची' मर्जी, एकंदर रागरंग पाहून एखादा शब्द नम्र, हळू आवाजात टाकला टाकला, नाही नाही अशी स्थिती. डोळे वर करून पाहण्याची हिंमत नाही, कमाल म्हणजे कानांतल्या भिगबाळीच्या वर नाही. बरे, मर्यादा सुटत चालल्याची नुसती जाणीव झाल्यास 'तिकडून' नुसते खाकरणे झाले तरी आवाज बंद. 'कोठे जाणे होत आहे?", 'कधी परत येणे होईल?' असले अमर्याद बोलणे नाही. 'हपिसात रुपये किती मिळतात?', 'खर्च कुठे करणे झाले ?' असल्या नसत्या चवकशा तर नाहीतच, पण ' चाकरीसाठी कुठे जाणे होते ? ' असली फुकटची चवकशीसुद्धा नाही. पैसा फक्त देवापुढे ठेवतात एवढेच पैशासंबंधी ज्ञान. 'खर्च' या शब्दाचा तर अर्थसुद्धा तत्कालीन 'कुटुंबां'त माहीत नसावा.

कुठे गेली ती कुटुंबे आणि ते भाग्यशाली दिवस !

अशा त्या दिवसांत कौटुंबिक सुधारणेची समस्या कोल्हटकरांना कुठून सुचणार? त्यामुळे त्यांच्या काळात हा प्रश्न नव्हता, म्हणूनच केवळ त्यांना त्याबद्दलचे श्रेय द्यावयाचे तर द्यावयास हरकत नाही, पण आजच्या विनोदी लेखकांना जे जमत नाही, ते कोल्हटकरांना तरी जमले असते की नाही, याविषयी कसलीच खात्री देता येत नाही.

त्याच ऐश्वर्याच्या जुन्या काळात 'तिकडून' सुखात असताना सुधारकांनी कैवार घेण्यास सुरवात केली. 'पण लक्षात कोण घेतो?' मधील यमूचा यम होऊन त्याने 'तिकडचा' जो पाठलाग सुरू केला, तो आजतागायत थांबलेलाच नाही.

'सौ.' बाजारात जाते, ' 'सौ.' काटकसर करते, 'कुटुंब माहेरी जाते', 'कुटुंब' स्वैपाक करते', 'सौ.' 'महिलामंडळात जाते, ' 'सौ.' 'व्याख्यान'—असल्या मिळमिळीत विनोदाने आवश्यक ती सुधारणा घडून येणे नाही, हे नाकबूल करण्यातही अर्थ नाही.

पण चिंता करण्यासारखी गोष्ट म्हणजे असल्या विनोदाचा उलटा परिणामही होत असल्याचे दिसून येते. म्हणजे बायका असले लेख हसण्यावारीच नेतातच, पण पोरेसोरेही त्यांची तीच वासलात लावतात.

'सौ'चे व्याख्यान', हा आमच्या एका लेखकमित्राचा विनोदी लेख प्रसिद्ध झाला तेव्हाचाच प्रसंग :

काय क्लबातसुद्धा भाषण!...... (म्हणजे घरी चालतात ती पुरत नाहीत का ?) तुझे भाषण फक्त स्त्रियांना मर्यादित ठेवले तर पुरुषवर्गाचे केवढे नुकसान होईल ?...... तुझे एकटीचेच भाषण, मग इतर बायका तक्रार करणार नाहीत का ?...... वगैरे वगैरे मसाला घालून मित्राने हा लेख सजवला होता.

"चांगला आहे, पण तुमच्या विनोदात अलीकडे तोचतोचपणा फार यायला लागला आहे बरं का !" असे म्हणून लेखनविषयाने नाक मुरडलेच......

पण हे तेवढ्यावरच थांबले नाही.



" एखाद्या माणसाला किनई खरं बोललेलं आवडत नाही. "

लेखासोबत काढलेले भयंकर घाबरलेल्या, खांदे पडलेल्या बावळट कथानायकाचे जे चित्र होते, ते आपल्या वडिलांसमोर नाचवीत आमच्या मित्राचे चिरंजीव म्हणाले,

" बाबा, बाबा, हे पाहा. या माणसाचं चित्र कसं हुबेहुब तुमच्यासारखं आहे की नाही ! ......

आणि बाबांनी त्याला दटावून ' नाही, ' असे म्हटले तरी चिरंजीवांची मुळी खात्रीच झाली होती, त्याला काय करणार ? बाईसाहेबांना विचारून गप्प करण्यात काहीच अर्थ नव्हता, कारण त्या चित्राच्या हुबेहूबपणाबद्दल मूळ चित्र नेहमी पाहिल्यामुळे त्यांची खात्रीच होती.

हसत हसत बाईसाहेब एवढंच म्हणाल्या,

" वंड्या, उगाच चावटपणा करू नकोस हं. एखाद्या माणसाला किनई खरं बोललेलं आवडत नाही. "

– अशारीतीने आमच्या विनोदी मित्राचा " सौ. " वरील हल्ला हा एक निखालस फुसका बार ठरला.

सारांश एवढाच की समाजसुधारणेचे अस्त्र म्हणून सध्याच्या लेखकांचा विनोद हा अगदीच कुचकामी ठरला आहे. हसतखेळत सुधारणा घडवून आणताआणता विनोदी लेखकांवर आता रडकुंडीची पाळी आली आहे, परंतु स्त्रीशिक्षण, स्त्री-सुधारणा याबाबतीत आपण केलेली चूक लक्षात घेऊन जोपर्यंत परत दुसरे आगरकर किंवा कर्वे अवतार घेत नाहीत, तोपर्यंत शिळ्या विनोदाच्या कढीला परत-परत ऊत आणण्यापलीकडे अधिक काही करणे विनोदी लेखकांच्या हातात राहिले नाही. कोल्हटकर आणि गडकरी यांच्या मानाने तो फार थिटा पडतो, अशी टीकाही फारशी उपयुक्त ठरेल असे वाटत नाही.

★

पण सध्याच्या विनोदी लेखकांपुढे सामाजिक सुधारणेची एवढीच गंभीर समस्या नाही. ही फक्त एक झाली.

विनोदी आणि कारुण्य यांचे मिक्श्चर असावे की नाही आणि असल्यास कोणत्या प्रमाणात असावे, हाही एक महत्त्वाचाच प्रश्न. विनोदाने नुसत्याच गुदगुल्या कराव्या की सोबत चिमटेही काढावे, अशी ही गंभीर समस्या आहे. हास्याला कारुण्याची फोडणी असावी असा हा गहन प्रश्न आहे आणि यात प्रमाणाचे महत्त्वही तितकेच. चमचाभर कारुण्य पुरे की बादलीभर हवे, हे ठरविणेही वाटते तितके सोपे नाही, म्हणजे नुसत्याच आपल्या डोळ्याच्या कडा ओलसर व्हाव्या की सामुदायिक रडण्याचा आवाज थिएटरवर घुमून अश्रूंचे पाट वाहावेत आणि त्यातून पोहतपोहत बाहेर पडण्याचीच प्रेक्षकांवर पाळी यावी, यातले अधिक चांगले काय ?

काही विनोदी लेखक आणि टीकाकार यांच्या मते कारुण्याची झालर किंवा किनार अवश्य हवी. या पंथातल्या लोकांना झालरपंथी किंवा किनारेवाले असे म्हणता येईल. याउलट विनोद हा निर्भेळ असावा असे काहींचे मत. भेळीचे किंवा मिसळीचे तत्त्वज्ञान या लेखकांना मान्य नाही. या लेखकांना झालरविरोधी किंवा मिसळशत्रूंचा पंथ असे म्हणण्यास हरकत नाही. मानव जन्माला आल्यापासूनच रडत असतो आणि जीवनात एकंदर तो रडतोच जास्त, हे लक्षात घेऊन आपला विनोद त्याला ऐकवून केवळ हसतहसत घरी जाऊ न देता जाताजाता त्याच्या पोटात एक गुद्दा मारून त्याला रडवावेच असे बहुधा झालर—मत असावे. याउलट हसून हसून पोट दुखल्यावर जर रडू आले तरच रडू द्यावे, असे भेसळ शत्रूचे मत असावे. टीकाकारांनी गुद्दे मारण्याची नुसती सवयच नव्हे, तर आवडही असल्यामुळे झालरवाला विनोद त्यांना आवडावा, हे रास्तच आहे. टीकाकार लोकांच्या या आवडीमुळे झालरपंथ हा एकंदरीत जोरात दिसतो. याचा एक परिणाम म्हणजे विनोदाला चिकटविण्यासाठी आवश्यक अशा कारुण्यपूर्ण झालरींचे घाऊक उत्पादन. अर्थात यामुळे विनोदाचा मुद्दाही नाही आणि कारुण्याचा गुद्दाही नाही, अशी केविलवाणी परिस्थिती अनेकदा निर्माण होते, हे खरेच. परंतु त्यामुळेही विनोदी लेखकांपुढची समस्या सुटली, असा याचा अर्थ होत नाही. झालर असावी की नसावी, या पेचाने करावे की मरावे या पेचाप्रमाणे विनोदी लेखकाला आपल्या कैचीत पकडून हैराण केले आहे. याशिवाय विनोद आणि कारुण्याची झालर ही दोन्ही एकसंध असावीत की सुटीसुटी असावीत, हाही प्रश्नच आहे. एकसंध असली तर शेवटी रडण्यावाचून गत्यंतर राहणार नाही. झालर वेगळी करता येत असली तर ज्यांना रडणे आवडते (आणि रुमाल वगैरे असल्यामुळे शक्यही होते) अशांना मनसोक्त रडून घेता येईल. रडणे कंपल्सरी नसल्यामुळे इतरांचीही गैरसोय होणार नाही.

विनोदी लेखकाला डोकेदुखी निर्माण करील अशी आणखीही एक समस्या आहे आणि तिचा संबंध तर प्रत्यक्ष वाचकांच्या डोक्याशीच येतो. एका विनोदी

लेखकाचे मत असे की ज्याच्यावर विनोद करायचा, त्याला इजा होता कामा नये. म्हणजे अगदी नापित कर्मातली उपमाच द्यावयाची तर विनोदी लेखकाने खुशाल एखाद्याचे डोके गुळगुळीत करावे, फक्त या प्रकारात गिऱ्हाइकाच्या डोक्याला जखम मात्र होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. आता विनोदी लेख म्हणजे जर हजामत होत असेल, तर विनोदी लेखक म्हणजे कोण हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. दुसरी अधिक महत्त्वाची गोष्ट अशी की एखाद्याचे डोके नुसते गुळगुळीत करणे हेच (डोक्याचा प्रत्यक्ष टवका उडविला नसताही) जखम करण्याइतकेच घोर नाही काय ? कारण ज्याला आपल्या केसांना धक्काही लावून घेण्याची इच्छा नसते, त्याला फुकट हजामत झाल्याच्या आनंदाशिवाय यात आणखी आनंद कोणता ?

पण खरे म्हणजे बोलून चालून एकदा हा डोकी करण्याचा धंदा पत्करला, म्हणजे तो करताना एखाद्या कच्च्या डोक्याचा लहानसा टवका उडाला, तर त्याबद्दल खंत बाळगण्याचे कारणच काय ? डॉक्टरी धंद्यात प्रत्यही अनेक रोगी दगावत असता, केवळ विनोदी लेखकांच्या हस्तलाघवातील लहानसहान दोषांबद्दल त्यांना नावे ठेवण्याचे कारण काय ? प्राणावर आले होते, पण डोक्यावर निभावले, म्हणून खरे म्हणजे संबंधित इसमांनी समाधानच मानावयास नको का ?

हे कसेही असले तरी नुसतीच गुळगुळीत की एकदोन टवक्यांसह, या बाबतीतला निर्णय विनोदी लेखकांना अजून घेता आलेला नाही. यामुळे किंकर्तव्यमूढ झालेले अनेक लेखक शेवटी स्वतःवरच विनोदी हल्ले चढविण्यात गुंग झाले आहेत. दुसऱ्यावरील विनोद म्हणजे त्याची हजामत, हे आपण वर पाहिलेच, त्यावरून स्वतःवरील विनोद म्हणजे स्वतःचे काय हे सांगण्याची आवश्यकता नाही.

सामाजिक सुधारणेच्या आघाडीवर पराभूत झालेल्या विनोदी लेखकांची अशी ही शोकांतिका आहे. या पराभवाचे जे समर्थन विनोदी लेखक करीत असतात, त्याला 'काय करावं हो, टीकाकार आमच्याकडे लक्षच देत नाहीत !' या वाक्याची कारुण्याची झालर ते चिकटवीत असतातच. त्यामुळे या शोकांतिकेच्या कारुण्यात अधिक भर पडते की विनोदात हे ज्याचे त्यानेच ठरविलेले बरे ! ● ● ●


शास्त्रीय, सिने, नाट्य सर्वप्रकारचे संगीताचा दुर्मिळ संग्रह
पुण्यातील एकमेव रेकॉर्ड लायब्ररी

फ्रेंड्स म्युझिक सेंटर

१५२६ सदाशिव, पेरूगेट रस्ता, पुणे २. [ दूरध्वनि : ५५३०४ ]

● लाऊडस्पीकर, टेपरेकॉर्डिंगची कामे घेतली जातात.

● सिने प्रोजेक्टर, कॅमेरे इत्यादीची खात्रीपूर्वक दुरुस्ती.

# मला काय करायचाय विमा?

## मी तर शंभर वर्षं जगणार आहे...

तुम्ही शंभर वर्षं जगणार? वा! छान! फार आनंदाची गोष्ट. मग तुम्हांला तर विम्याची फारच गरज. हातपाय थकल्यावरहि नियमित उत्पन्न मिळण्याची व्यवस्था फक्त विम्याचा लहानसा हप्ता भरूनच करता येते. आजपासून नियमित बचत करा. म्हातारपणासाठीं चांगली सोय होईल आणि स्वतःचे हक्काचे उत्पन्न मिळूं लागेल. आणि समजा, भविष्य चुकले, अन् आधीच कांहीं बरेवाईट झाले, तरी विम्याची पूर्ण रक्कम ताबडतोब बायकामुलांना मिळेलच! आजच तुमच्या विमा एजंटाला भेटा. त्याचा सल्ला तुमच्या फार उपयोगी पडेल.

**आयुर्विम्याला** पर्याय नाहीं.



Pratibha-656

# राशिभविष्य हे थोतांड आहे काय ?

**श्री. के. केळकर**

" तुमचे ग्रह आमचा अंदाज ", " भविष्यवाणी ", " ग्रहांचा कानोसा ", " what the stars fore tell ", " Message of stars " ... " महिना कसा जाईल " " आठवडा कसा जाईल ", ' साप्ताहिक भविष्य ' आणि " आजचा दिवस " व त्याखालील शुभांक या शीर्षकाखालील मजकूर वाचून सामान्य वाचक गोंधळून जातो. राशिभविष्यातील विविधता, विचित्रता, भिन्नता आणि अंदाज यामुळे हे **थोतांड** आहे काय, असे सामान्य वाचकांस वाटू लागते. बहुतांशी वर्तमानपत्रांत, मासिकांत, साप्ताहिकांत, कोणकोणत्या तरी पद्धतीने प्रमुख जागी किंवा कोपऱ्यात सामान्य वाचकाला दिलासा– खरा किंवा खोटा– मिळण्यासाठी राशिभविष्याची तरतूद केलेली असते ! धन्यवाद त्या संपादकांना. परमेश्वरानंतर उठल्याबरोबर नमस्कार करण्यालायक, आदरणीय व वंदनीय अशी ही एकमेव व्यक्ती होय !

**भविष्यकालाची जिज्ञासा हेच तत्त्व !**

" सुखार्था: सर्व भूतानां मत: सर्वा: प्रवृत्तय: " या शास्त्रवचनाप्रमाणे सर्व मानवांना सुखाची इच्छा असते. सुखप्राप्तीच्या तृष्णेमुळे मानवाचे प्रयत्न सतत सुरू असतात. परंतु हे प्रयत्न संपूर्णत: फलद्रूप होणार आहेत की ते ' मृगजळ ' किंवा दिवास्वप्न ठरणार आहे याची कल्पना मानवाला क्वचितच असते. ते समजावून घेण्याचे साधन जर कोणते असेल तर भविष्यकाल वर्तविणारे ज्योतिषशास्त्र होय ! ! सर्वसंगपरित्याग केलेले व अरण्यात राहणाऱ्या मुनिजनांनासुद्धा आपली भविष्यस्थिती ज्योतिषांना विचारण्याची उत्सुकता होती, तर मग संसारांत गुरफटलेल्या, चित्रपटसृष्टीच्या तकलुपी जीवनात वावरणाऱ्या, सट्टेबाजारात हिंडणाऱ्या मुशाफिरांना व राजकारणातल्या अस्थिर जीवनात वावरणाऱ्या आजच्या मानवाची काय कथा ? सकृतदर्शनी माणसाला जे दिसणारे किंवा कळणारे नाही, त्याविषयी त्याला जिज्ञासा वाटणे यात काहीच गैर नाही. दैनंदिन अस्थिर जीवनात वावरणाऱ्या व्यक्तींना तर त्याची फारच गरज असते.



अरण्यांत राहणाऱ्या मुनिजनांना सुद्धा !

## शे. ६० टक्के लोक वर्तमानपत्रीय भविष्य वाचतात

या शास्त्राचा उपयोग अलीकडील काळात किती प्रमाणात केला जातो, हे अजमाविण्यासाठी मी "ग्रह नक्षत्र फलादेश संशोधन मंडळा"तर्फे १९६१ पुणे शहरातील काही पेठांतून चाचणी पाहणी (sample survey) केली होती. ज्या ज्या गोष्टींसाठी या शास्त्राचा उपयोग केला जातो, हे पाहत असताना वर्तमानपत्रीय राशिभविष्य किती कुटुंबात वाचले जाते, हे समजावून घेण्याचा प्रयत्न केला. चाचणी पाहणीत एकंदर १९७ म्हणजे सुमारे २०० कुटुंबे घेतली होती. त्यांपैकी ११४ चेवर कुटुंबांत म्हणजे ६० टक्क्यांचेदर मंडळी वर्तमानपत्रीय राशिभविष्य नियमित वाचतात, असे आढळून आले. अर्थात आगामीकाल समजावून घेण्याचाच त्यात उद्देश असतो. या ११४ कुटुंबांपैकी ६१ म्हणजे जवळजवळ ५० टक्के कुटुंबियांनी वाचून समाधान झाल्याची संमती दिली आहे. उरलेल्या ५३ कुटुंबियांनी ती गंमतीने वाचतो किंवा संपूर्णपणे समाधान होत नाही, असा निर्वाळा दिला आहे. अशिक्षित लोकांत तर साक्षराकडून राशिभविष्याचे सामुदायिक वाचन होत असल्याचे आढळून आले. महाराष्ट्राचे सांस्कृतिक केंद्र असलेल्या पुण्यासारख्या शहराची ही अवस्था तर इतर शहरांत व खेडोपाडी कमीजास्त प्रमाणात हीच स्थिती आढळून येईल, याबद्दल यत्किंचितही शंका नाही. या सर्व गोष्टी नमूद करण्याचा हेतू एवढाच की **वर्तमानपत्रीय राशीभविष्य वाचण्याचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणावर वाढत आहे; व ते बहुसंख्येने वाचले जात आहे.**

वर्तमानपत्रीय राशिभविष्याचा उगम केव्हा झाला व तो कशात आहे, याचा पत्ता लागणे अवघड व दुरापास्त काम आहे. राशिभविष्य हे गोचरीचे म्हणजे दैनंदिन किंवा चलित ग्रहस्थिती पाहून भविष्य सांगण्याचे एक अंग आहे. मूलत: गोचर ही

काही स्वतंत्र ज्योतिषपद्धती नाही. दशा, ताजिकची कुंडली किंवा डायरेक्शन पद्धती यांसारख्या एखाद्या प्रमुख पद्धतीला पोषक म्हणूनच ती वापरली जाते. स्वतंत्र पद्धत म्हणून ती वापरावयाची झाली तर समग्र जन्मकुंडलीवर तिचा प्रयोग करणे आवश्यक आहे. परंतु १२ ग्रहांपैकी केवळ एका चंद्रावर ती आधारली जाते. अत्यंत द्रुतगतीने जाणाऱ्या ग्रहांपैकी चंद्र हा एक ग्रह (पृथ्वीचा उपग्रह) आहे. या ग्रहाचा उपयोग करून एक दोन दिवसांचे अंतराने ढोबळ भविष्य करण्यात केला जातो. अनेकवेळा या पद्धतीने कलेल्या भविष्याची सत्यता येते व भोळ्या वाचकाला चमत्कार वाटतो. Popular Astrology किंवा **लोकरंजन म्हणून** हे ठीक आहे. वास्तविक चंद्रराशी विचारात घेऊन भविष्यकथनापेक्षा नक्षत्र, नक्षत्रचरण इत्यादीपर्यंत विचार केला तर काही सूक्ष्मता आढळेल. परंतु या गोष्टी नक्षत्र, नवमांश वगैरे सामान्य वाचकाला माहीत नसतात, म्हणून चंद्र राशीवरच भागवावे लागते. यातील ढोबळपणा टाळण्यासाठी सुज्ञ ज्योतिषी एक टीप देतो– " चंद्र किंवा लग्न बलवान असेल त्याप्रमाणे राशिगत फल पाहावे. " चंद्राचे ऐवजी कुंडलीतील लग्नस्थानाला महत्त्व देऊन गोचराचा चंद्रासहित विचार केलेला असतो एवढेच.

वर सांगितलेली झाली भारतीय पद्धती. पाश्चिमात्य किंवा सायन पद्धतीत जन्मरवीचा प्रामुख्याने विचार केला जातो. जन्मरवीच्या अंशाशी इतर गोचरी ग्रहाचे ग्रहयोग त्याला लावून, त्या अनुरोधाने फलित वर्तविलेले असते. बऱ्याचशा मंडळींना ही पद्धती ग्राह्य वाटते. इंग्रजी वर्तमानपत्रे व मासिकांतून या पद्धतीचा विशेष उपयोग करून राशिभविष्य केलेले असते.

वरील दोन्हीतिन्ही पद्धतींत बरेचसे शास्त्रीयत्व आहे. परंतु **खमंग साहित्यिक** फोडणी देऊन ' पान ' सजविण्याचा खाक्या मात्र सर्वस्वी अग्राह्य आहे. कारण त्यात २।४ ओळींच्या भविष्यकथनापेक्षा ज्ञानेश्वर, तुकाराम, रासदासादि संतांच्या ओव्यांनीच ती भरलेली असतात. अर्थात त्यामुळे संतवचने वाचली जाण्याचा आनंद होत असेल, तर खुशाल घ्यावा ! शास्त्र या दृष्टीने अग्राह्य व उपेक्षणीय आहे.

थोडक्यात रामशिविष्याचे मूळ किंवा उत्पत्ती सांगावयाची झाली तर, सर्व जगतातील मानवाचे ज्योतिषांनी, मॅगडुगल या मानसशास्त्रज्ञाने १४ सहज प्रवृत्ती instincts ठरविल्या, तद्वत १२ भाग किंवा बारा ढीग केले. ते भाग सोयीसाठी काही ज्योतिर्विदांनी, चंद्रावरून, लग्नावरून किंवा जन्मरवीवरून केले. उपमाच द्यावयाची झाली तर **राशिभविष्ये " तयार कपड्या "**सारखी **किंवा अॅनासिन " अॅस्पिरीन "**-सारख्या Standard Drugs प्रमाणे आहेत. तयार कपड्यांचे मोजमाप जसे सर्व साधारण असते, तद्वत राशिभविष्ये " ढोबळ " मानाची आहेत.

## थोतांड केव्हा व कसे निर्माण होते

वर वर्णन केलेल्या सर्व प्रकारांत कमीजास्त प्रमाणात शास्त्रीयता आहे, हे मला कबूल करावयास पाहिजे. अर्थात असे असताना त्याने **थोतांड** केव्हा व कसे निर्माण

होते हे शोधून काढणे प्राप्त आहे :(१) ज्योतिष लिहिणारा हा खराखुरा ज्योतिषीच नसतो. (२) चांगल्या ज्योतिषाला राशिभविष्य लिहिण्यास वर्तमानपत्रांत दिलेली जागा अतिशय अपूर्ण असते. (३) वाचकाचे अज्ञान. (४) भविष्य कथनाच्या अनेक पद्धती. वरील गोष्टींचा थोडक्यात परामर्ष घेऊ :–

(१) सिनेमाच्या मजकुराइतकीच किंवा नटनटीच्या एक दोन फोटोंइतकीच वर्तमानपत्रांत भविष्य छापण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्याशिवाय वर्तमानपत्रे अगर मासिके खपत नाहीत, असे म्हणण्यापेक्षा ज्योतिष किंवा राशि–भविष्यासाठीच ती प्रख्यात असतात. संपादकमहाशयांना ज्योतिषाचे किंवा ज्योतिषशास्त्राचे बेताचेच प्रेम असते. उत्तम ज्योतिषी मिळवावयाचा म्हणजे त्याचा मुशाहिरा परवडणारा नसतो. म्हणून सर्वसाधारण १२ राशींची व ग्रहांची तोंडओळख असणारा व लोकांची मनोवृत्ती जाणणारा मनुष्य परवडतो. त्यालाही प्रसिद्धीची हाव असते, कारण ज्योतिषाला मुशाहिऱ्यापेक्षा जाहिरात फुकट होण्याचे प्रेम असते आणि त्यामुळे गिऱ्हाइके वाढतात. या सर्व गोष्टींमुळे आकाशातले ग्रह आकाशातच राहतात आणि बारा राशींपुढे जो मजकूर येतो, तो कपोलकल्पित गोष्टींचाच ! अशी आहे परिस्थिती काही वर्तमानपत्रांतील राशिभविष्याची !!

(२) निष्णात ज्योतिषी उत्तम प्रकारे राशिभविष्य लिहील, यात शंका नाही. परंतु सशास्त्र लिहावयाचे म्हणजे शास्त्रीयता व थोडा पाल्हाळीकपणा आलाच. वर्तमानपत्रांत ठराविक स्तंभ या विषयाला दिलेले असतात. बिचारा ज्योतिषी जास्तीजास्त Compressed करून लिहिण्याच्या नादात, ग्रह मनात धरून भविष्य लिहीत असतो. या थोड्या मजकुरालासुद्धा काहीवेळा संपादकीयखात्यात काट–छाट केलेली आढळते. या सर्व गोष्टींमुळे ५।६ वाक्यांखेरीज काहीच मिळत नाही. याहीपेक्षा आणखी एक विनोदाची गोष्ट म्हणजे–वर्षभविष्य, महिनाभविष्य, साप्ताहिक भविष्य या सर्व गोष्टींना सारखीच मर्यादित जागा सपूर्त करण्यात येते. काहीवेळा वेळेवर भविष्य लिहून न आल्याने किंवा एखाद्या राशीचा मजकूर गहाळ झाल्याने पूर्वीच्या मजकुरांपैकी एखादा भाग घालून वेळ मारून नेण्यात येते.

## चाचणी पाहणी
## वर्तमानपत्रातील भविष्ये वाचणारी कुटुंबे

| पेठ | पाहणीतील कुटुंबे | राशिभविष्य वाचणारी | राशिभविष्य न वाचणारी | कुटुंबे समाधान होणारी | कुटुंबे असमाधान न होणारी |
|---|---|---|---|---|---|
| सदाशिव | ७७ | ४५ | ३२ | २२ | २३ |
| शनिवार | ५९ | ३० | २९ | २४ | ६ |
| बुधवार | ६१ | ३९ | २२ | १५ | २४ |
| | १९७ | ११४ | ८३ | ६१ | ५३ |



“ प्रवासास निघा. ”

“ प्रवास टाळा. ”


तिसरा प्रकार ‘ अज्ञानी ’ वाचकांचा. ‘ अज्ञानी ’ हा शब्द दोन तऱ्हांनी लक्षात घ्यावयास पाहिजे. पहिला प्रकार सुशिक्षित असून वेगवेगळ्या तिन्ही पद्धतींनी केलेली भविष्ये स्वतःला कशी उपयोगात आणावयाची ते माहीत नसते व दुसरा खरोखरीच ‘ अज्ञानी ’ म्हणजे पत्रिका किंवा रास समजण्यासाठी ज्या गोष्टींची आवश्यकता असते—जन्मवेळ, जन्मठिकाण-वगैरे नसणे. जन्म लग्न, जन्मरास किंवा जन्मरवी या तिन्ही पद्धतींनी राशिभविष्ये लिहिली जातात, हे मी वर विशद केले आहेच. सर्वसामान्य वाचक सुशिक्षित असूनसुद्धा या तीन वेगवेगळ्या गोष्टींची त्याला माहितीच नसते. जन्मलग्नाऐवजी तो राशीकडून भविष्य पाहतो किंवा चंद्र-राशीऐवजी जन्मरवीचे भविष्य बघतो. कशालाच काही पत्ता नसतो. भविष्यात लिहिलेले असते ता. २५ ला “ शुभवार्ता ऐकू येईल, ” किंवा “ प्रेमपत्र येईल. ” भविष्यावरील विश्वासाने किंवा अगतिक होऊन प्रेमाने भारावून गेलेली तरुण–तरुणी दिवसभर पत्राची वाट पाहात असतात. सर्व दिवसभर पोस्टमनची आशेने वाट पाहतात व दिवस संपल्यावर निराशेने ज्योतिषाला किंवा ज्योतिषशास्त्राला शाप देतात ! दुसऱ्या प्रकारात वाचक खरोखरीच अज्ञानी व मागासलेला असल्या-मुळे जन्मतारखेचा व जन्मवेळेचा पत्ता नसतो. आम्ही ज्योतिषी काय लवाड ! अवकहडा चक्राप्रमाणे त्यांची रास शोधून काढतो. उदा :—ना, नी, नू, ने म्हणजे वृश्चिक रास व अनुराधा नक्षत्र ! का, की— मृग नक्षत्र. मिथुन रास—रु, रे, री, तूळ रास-स्वाती नक्षत्र—थोडक्यात नारायण नावाच्या व्यक्तीने वृश्चिकरास, काशिना-

थाने मिथुन व " रेवती " किंवा " रूपाने " तूळ रास पाहून आपले समाधान करावयाचे !! इतकेच नव्हेतर या पद्धतीने लग्नादि सर्व कार्याचे प्रकार ठरत असतात. या पद्धतीने आकाशातील ग्रहांचा कोठे संबंध आणावयाचा व कोठे राशिभविष्य जमावयाचे. असे प्रकार पाहिले म्हणजे काही वेळा 'थोतांड' आहे असे वाटल्यास त्यात काय चूक आहे.

चौथा प्रकार शास्त्रपद्धतीचा. आस्तिक-नास्तिक, द्वैत–अद्वैत, हे जसे तत्त्वज्ञानात वाद आहेत, तद्वत सायन–निरयन हा आमच्यातील म्हणजे ज्योतिषशास्त्रातील वाद आहे. परंतु ह्या वादात मी फार खोल जाऊन आणखी एक गोंधळ निर्माण करत नाही. परंतु **पंचांगवाद** सर्वसाधारण ऐकून तरी वाचकांना माहीत असेल, तो म्हणजे जुने व नवे पंचांग किंवा टिळक पंचांग विरुद्ध जुने पंचांग किंवा शास्त्रीय भाषेत बोलावयाचे म्हणजे १९ अयनांश विरुद्ध २३ अयनांश ! या दोन्ही पंचांगांत फक्त ४ अंशांचा फरक असतो. एका पंचागांत चंद्र किंवा लग्न वृश्चिकेत संपता संपता असतो तर दुसऱ्याचा धनु राशीत ! भविष्य लिहिणारे टिळक पंचांगवादी तर काही जुने पंचागानुसारे ! एका भविष्यात लिहलेले असते प्रवासात उत्तम दिवस तर दुसऱ्याने लिहावे प्रवास टाळा. विनोदाने एकाने गोष्ट सांगितलेली आठवत आहे. " स्वराज्यात " वाचले, प्रवासास निघा. हे वाचून एक गृहस्थ स्टेशनवर जाण्यासाठी निघाला. वाटेत हॉटेलात चहा पीत असता 'प्रभात'–'भारत'–'सह्याद्री' दिसेल त्यात लिहिलेले होते– " प्रवास टाळा. " बिचाऱ्या प्रवाशांनी स्टेशनकडे निघालेली रिक्शा घराकडे परत फिरवली. याहीपेक्षा आणखी एक संवाद माझ्या कानावर आला तो तर फारच मजेदार आहे–मेषराशीला त्या दिवशी 'मनाविरुद्ध घटना घडतील,' असे ज्योतिषबुवांनी लिहिलेले होते. दिवसभर हे वाचून स्वारी गप्प होती. सायंकाळी जेवावयास बसल्यावर आमटीत मीठ जास्त झाल्यामुळे स्वारीची तब्येत बिघडली. मंडळीच्यावर (अर्धांगीवर) राग ! वायको चाणाक्ष–ती म्हणाली, " प्रभात' वाचलात ना ! त्यात लिहिलंच आहे ना, " मनाविरुद्ध घटना घडेल. " नवरोबाजी काय करणार ! काय हा भविष्याचा छंद की थोतांड.

वाचकहो ! हे लिहीत असताना ज्योतिषशास्त्राची हेटाळणी करण्याचा माझा हेतू नाही. मी या शास्त्राचा एक अभ्यासू आहे. लोकरंजनाच्या नावाखाली शास्त्राला कमीपणा येऊ नये, हा माझा उद्देश आहे. वरील गोष्टीला निव्वळ वाचक, ज्योतिषी किंवा वर्तमानपत्र-व्यवस्थापक हे एकमेव जबाबदार आहेत, असे नाही. त्यातील विसंवादी प्रकार कसे घडतात हे दाखवून देण्याचा माझा हेतू आहे. सुज्ञ मंडळी जरूर याचा विचार करतील अशी आशा आहे.

• • •



THE RISE AND FALL OF THE THIRD REICH
या WILLIAM L. SHIRAR
यांच्या पुस्तकावर आधारित लेखमाला

लेखांक अकरावा

# नाझी

## भस्मासुराचा उदयास्त

### रा. म. शास्त्री

ज्या भूभागावर रशियाला वर्चस्व हवे आहे, तो रशियाला देऊन, जर्मनीला ज्यावर तूर्त वर्चस्व हवे आहे, तो पोलंडचा पश्चिम भाग मिळविण्याचा प्रयत्न आता हिटलर करणार आहे, याचा अंदाज क्रेमलिनला आला. युद्धाची सर्व जबाबदारी जर्मनीवर टाकून पोलंडने लाटलेला प्रदेश पुन्हा मिळविण्याची संधी स्टॅलिन तरी कशी घालवील ! पोलंडच्या फाळणीचे कारस्थान रशिया–जर्मनीमध्ये शिजत होते. स्टॅलिन खूष होता. हिटलरहि खूष होता. शेरास सव्वाशेर भेटला होता—

**प्रिय मोलोटोव्ह**

—मी फ्यूररच्या वतीने भेट मागत असून, फ्यूररचे याविषयक (रूसो-जर्मन संधीविषयक) विचार मी स्वत: स्टॅलिनपुढे मांडू इच्छितो......

—रिबेन्ट्रॉप.

१५ ऑगस्टला रात्री ८ वाजता रशियातील जर्मन वकील शूलेनबर्ग याने मोलोटोव्ह यांना रिबेन्ट्रॉपचे वरील पत्र वाचून दाखवले. शूलेनबर्गने मोलोटोव्हशी झालेल्या भेटीचा वृत्तांत त्याच मध्यरात्री बर्लिनला या शब्दांत कळवला—

" ...जर्मनीच्या सूचनेचे मोलोटोव्हनी उत्साहाने स्वागत केले, परंतु आपण फारसे उत्सुक आहोत, हे दिसू नये, यासाठी त्यांनी पुढे असे सांगितले की अशी प्रत्यक्ष भेट होण्यापूर्वी पुरेशी तयारी पूर्वी झालेली असावी.'

कसली तयारी ? मोलोटोव्हने आपल्या बोलण्यात काही सूचक प्रश्न शूलेनबर्गला विचारले. दोन्ही देशांत अनाक्रमणाचा करार करावा, याकरिता जर्मनी उत्सुक आहे काय ? रशिया व जपान यांचे संबंध सुधारावे याकरता जर्मनी आपले वजन खर्च करील काय ? बाल्टिक राष्ट्रांना संयुक्त संरक्षण जाहीर करण्यास जर्मनी तयार आहे काय ?

म्हणजे अनाक्रमणाच्या कराराची पहिली सूतोवाच्यता रशियाने केली तर ! ही सूतोवाच्यता मोलोटोव्ह त्याचवेळी करीत होता की जेव्हा ब्रिटन–फ्रान्सची लष्करी शिष्टमंडळे मॉस्कोला पोचून चार दिवस उलटले होते. मोलोटोव्ह हा दुटप्पी धोरण अंमलात आणीत होता. एकीकडे ब्रिटन–फ्रान्सला त्याने मार्शल व्होरोशिलोव्हच्या दारात झुलत ठेवले होते व दुसरीकडे तो शूलेनबर्गच्या कानात आपल्या मागण्या सांगत होता.

१६ ऑगस्टला सकाळी ६ वाजून ४० मिनिटांनी रिबेन्ट्रॉपला मोलोटोव्ह–शूलेनबर्ग भेटीचा वृत्तांत मिळाला. त्याने लगेच ऑबरसाल्झबर्ग येथे जाऊन फ्यूररची भेट घेतली. दुपारपर्यंत मोलोटोव्हला काय कळवायचे, याचा खल झाला. शूलेनबर्गला १६ ऑगस्टलाच रात्री रिबेन्ट्रॉपचा संदेश मिळाला.

" जर्मनी पंचवीस वर्षांचा अनाक्रमणाचा करार करण्यास तयार आहे. बाल्टिक राष्ट्रांना संरक्षण–आश्वासन देण्याची सूचना स्वीकारार्ह आहे. रूसो–जपानी संबंधात सुधारणा व्हावी, यासाठी जपानवर असलेले आपले वजन जर्मनी खर्च करील."

" मी ऑगस्ट १८ नंतर केव्हाही विमानाने मॉस्कोला येण्यास तयार आहे. मी येण्यापूर्वी फ्यूररकडून संधी करण्याबाबतचे सर्वाधिकार घेऊनच येईन...व प्रसंग उद्‌भवलाच तर करारावर सही तिथेच करीन."

हा संदेश मोलोटोव्हला वाचून दाखवावा व यावर रशियन सरकारचे व स्टॅलिनचे मत अजमावावे, अशा सूचना शूलेनबर्गला मिळाल्या.

## मोलोटोव्हची थंड प्रतिक्रिया

१७ ऑगस्टला हिटलर व रिबेन्ट्रॉप ऑबरसाल्झबर्ग येथे शूलेनबर्गच्या प्रत्युत्तराची उत्सुकतेने वाट पाहत असताना तिकडे मॉस्कोत मोलोटोव्ह मात्र शूलेनबर्गचा अंत पाहात होता. एक लेखी उत्तर मोलोटोव्हने या नवीन प्रस्तावाकडे दुर्लक्ष करून शूलेनबर्गच्या हाती ठेवले. त्यात आतापावेतो जर्मनीने जी रशियाविरोधी कृत्ये केली, त्याचा पाढा वाचून पुढे असे म्हटले होते की......जर आता जर्मन सरकार पूर्वीचे धोरण बदलून सोविएट युनियनशी मैत्रीचा हात पुढे करीत असेल, तर

रशियादेखील आपले धोरण बदलून त्याला प्रतिसाद देईल. अर्थात पायरी–पायरीने या गोष्टी घडाव्या. प्रथम व्यापारी व परस्परांना तारण देणारा (Credit) करार व्हावा व नंतर अनाक्रमणाचा करार व्हावा.

रिबेन्ट्रॉपच्या भेटीविषयी मोलोटोव्हने एवढेच सांगितले की ही भेट घडून येण्यापूर्वी बरीच तयारी करावी लागेल.

मोलोटोव्हच्या या प्रतिक्रियेचा वृत्तांत १७ ऑगस्टला मध्यरात्री रिबेन्ट्रॉपला मिळताच त्याने १८ ऑगस्टला पहाटे ५–४५ ला पुन्हा शूलेनबर्गला तार दिली—

" I ask you to speak to M. Molotov as follows—

" German Polish relations are becomming acute from day to day. Incidents might occur any day that would make the outbreak of open conflict unavoidable. The Fuehrer considers necessary a previous clarification, to be able to take into account Russion interest in case of such a conflict."

" The trade agreement has been concluded in Berlin this very day & to attack second stage the German Foreign Minister proposed his immediate departure for Moscow."

" This time the ambassador must not take a " Russion No "—

[ मोलोटोव्ह यांच्या कानावर खालील गोष्टी घालाव्या.

जर्मन–पोलिश संबंध हे दिवसागणिक गंभीर होत आहेत. उघड संघर्ष केल्यावाचून गत्यंतर नाही. अशा घटना कधीही अपेक्षित आहेत. असा संघर्ष उडालाच तर पोलंडबाबत रशियन–अपेक्षा काय आहेत, यासंबंधी पूर्वखुलासा झालेला बरा, असे फ्यूररला वाटते.

व्यापारी करार बर्लिन येथे आजच पुरा होत आहे व दुसरे पाऊल टाकण्यासाठी जर्मन परराष्ट्रमंत्र्याची तावडतोब मॉस्कोला येण्याची इच्छा आहे.

काहीही करून यावेळी रशियाचा नकार येता कामा नये. ]

१९ ऑगस्ट महत्त्वाच्या निर्णयाचा दिवस होता. जर्मन पाणबुड्या व छोटी लढाऊ जहाजे यांना ब्रिटिश किनाऱ्याकडे निघण्याच्या आज्ञा रोखून धरण्यात आलेल्या होत्या. फक्त १३ दिवसांवर युद्धाचा मुहूर्त आला होता व मॉस्कोहून बातमी येताच या सर्व आज्ञा कार्यान्वित होणार होत्या. पोलंडवर हल्ला करणाऱ्या सैन्याला आपल्या जागा घेण्याच्या दृष्टीने अजून बरेच काम करावयाचे होते. थोडक्यात–सैन्य, आरमार, विमानदल सारे वाट पाहात होते की अजून आज्ञा कशा सुटत नाहीत. रिबेन्ट्रॉप व हिटलर अस्वस्थ होते. मॉस्कोहून येणाऱ्या उत्तराकडे डोळे लावून बसले होते.

### अचानक हृदयपालट

१९ ऑगस्टला सकाळी ' टास् ' या सोविएट वृत्तसंस्थेने बातमी दिली –

" अतिपूर्वेकडील प्रश्नावर सोविएट रशिया व ब्रिटिश-फ्रेंच लष्करी शिष्टमंडळाची बोलणी अडली आहेत, ही गोष्ट खरी नाही. जे मतभेद निर्माण झाले आहेत, ते फार निराळ्या प्रश्नावर. "

१९ ऑगस्टला सकाळी रिबेन्ट्रॉपने ही बातमी वाचून समाधान व्यक्त केले, की ब्रिटिश, फ्रेंच व रशिया यांच्यांत नवे मतभेद निर्माण झाले आहेत व श्वास टाकायला अजून जर्मनीला फुरसत आहे.

१९ ऑगस्टला सायंकाळी ७ वाजून १० मिनिटांनी मॉस्कोहून अपेक्षित गुप्त तारपत्र आले.

" The Soviet Govt. agrees to the Reich Foreign Minister coming to Moscow, one week after the announcement of the signature of the economic agreement. If the economic agreement is made public tomorrow, the Foreign Minister could arrive in Moscow on August 26 or 27 Molotov has handed me a draft of a non aggression pact—Schulenburg. "


[ " व्यापारी करारावर सही होताच एक आठवड्याने राईश परराष्ट्रमंत्र्याने मॉस्कोला यावे, या गोष्टीला सोविएट सरकारने मान्यता दिली आहे. जर आर्थिक-करार उद्या जाहीर करण्यात आला, तर राईश परराष्ट्रमंत्र्याने २६ किंवा २७ ऑगस्टला मॉस्कोला यावे. मोलोटोव्हने अनाक्रमणाच्या कराराचा एक मसुदा माझे हाती दिला आहे.–शूलेनबर्ग " ]

शूलेनबर्ग याने पाठोपाठ मॉस्कोत नेमके सर्व कसे कसे घडले, याचा वृत्तांत लिहून पाठवला. तो लिहितो —

" पहिल्या भेटीत मोलोटोव्ह काहीच प्रतिक्रिया व्यक्त करीना. रशियन सरकारचे मत जे सांगितले आहे, त्याहून अधिक सांगण्यासारखे काही नाही, असे तो म्हणाला व मुलाखत आटोपली. मध्ये फक्त अर्धा तास गेला व मला क्रेमलिन येथे ४-३० वाजता सायंकाळी पुन्हा भेटीचे निमंत्रण आले. मी जाताच या दुसऱ्या भेटीच्या सुरवातीलाच, मोलोटोव्हने मला निष्कारण तसदी दिल्याबद्दल खेद व्यक्त केला व सांगितले की त्याने जर्मन सरकारचे म्हणणे आमच्या सरकारला कळवले व अनाक्रमणाच्या कराराचा मसुदाही आणला आहे. हा अकस्मात हृदयपालट कसा झाला, याचे कारण मोलोटोव्हने सांगिनले नाही. परंतु माझ्या तर्काप्रमाणे स्टॅलिनने मध्ये पडून हे घडवले असावे.

" Molotov did not give reasons for his sudden change of mind. I assure that Stalin intervened."

शूलेनबर्गचा हा तर्क अगदी बरोबर होता. १९ ऑगस्टला सायंकाळी आपला रूसो–जर्मन कराराचा निर्णय स्टॅलिनने आपल्या पॉलिटब्यूरोपुढे ठेवला व तो



**स्टॅलिन–रिबेन्ट्रॉप : दोन टोके एकत्र आली !**

ठेवण्यापूर्वी तास–दीडतास म्हणजे तीन ते चारच्या दरम्यान त्याने तो मोलोटोव्हला सांगितला.

बरोबर तीन वर्षांनी म्हणजे ऑगस्ट १९४२ मध्ये मार्शल स्टॅलिनने आपण हा निर्णय का घेतला, याची कारणे एका भेटीत विन्स्टन चर्चिल यांना सांगितली. स्टॅलिन म्हणाला—

" We formed the impression that the British & French Govt. were not resolved to go to war, if Poland were attacked; but that they hoped that the diplomatic line up of Britain, France & Russia would deter Hitler. We were sure it would not! " How many Divisions– " Stalin had asked " Will France send against Germany ?" The answer was " About a hundred. " " How many will England send?" The answer was "Two & two more later." " Ah, two & two more latter, " Stalin had repeated. " Do you

know " he asked " How many Division we shall have to put on Russian front?" There was a pause. " More than three hundred! "

[ आमचा असा ग्रह झाला की ब्रिटिश व फ्रेंच सरकार यांचा पोलंडवर हल्ला झाला, तरी युद्ध करण्याचा निश्चय नाही. त्यांना असे वाटते आहे की ब्रिटन, फ्रान्स व रशिया यांच्यातील मैत्रीकरार होताच हिटलर शेपूट घालील. आमची खात्री होती की हिटलरबाबत हे चूक ठरेल. स्टॅलिनने विचारले होते—" फ्रान्स किती डिव्हिजन्स सैन्य जर्मनीविरुद्ध पाठवील ? " उत्तर आले—"सुमारे शंभर डिव्हिजन्स." मग त्याने विचारले होते—" इंग्लंड किती डिव्हिजन्स पाठवील ? " उत्तर आले—" प्रथम दोन व नंतर दोन ". " प्रथम दोन आणि नंतर दोन ! " स्टॅलिनने हे उत्तर तिरस्काराने पुन्हा उच्चारून म्हटले—" आम्हाला किती डिव्हिजन्स सैन्य रशियन आघाडीवर उभे करावे लागले असते, याची कल्पना आहे ? " किंचित थांबून स्टॅलिन म्हणाले—" ३०० डिव्हिजन्सहून अधिक......! " ]

स्टॅलिनचे हे त्या वेळचे मनोगत विन्स्टन चर्चिल यांनी नमूद केलेले आहे.

## हिटलरची त्वरा

तेव्हा १९ ऑगस्टला शूलेनबर्गने पाठवलेल्या तारपत्रात रिबेन्ट्रॉपने मॉस्कोला २६ किंवा २७ तारखेला यावे, असे सांगितले होते. २६–२७ म्हणजे फार उशीर होणार होता, कारण १ सप्टेंबर ही पोलंडवरील हल्ल्याची तारीख फिरविण्यास हिटलर तयार नव्हता. या अखेरच्या महत्त्वाच्या प्रसंगी स्वत: हिटलर मध्ये पडला. त्याने रविवारी २० ऑगस्ट १९३९ ला स्टॅलिनला सायंकाळी ६–४५ ला तारपत्र धाडले —

बर्लिन

मा. स्टॅलिन, मॉस्को — २० ऑगस्ट, १९३९

जो नवीन व्यापारी करार झाला आहे, त्याचे मी अंतःकरणपूर्वक स्वागत करतो.

तुम्ही जो अनाक्रमणाच्या कराराचा मसुदा मोलोटोव्हमार्फत धाडला, तो मी स्वीकारला आहे आणि मला असे वाटते की त्याच्याशी जो प्रश्न निगडित आहे, त्याबद्दल खुलासा त्वरेने होणे जरूर आहे.

वेळ जाऊ नये म्हणून माझ्या मते मी असे सुचवितो, की माझ्या परराष्ट्रमंत्र्याचे मंगळवारी दिनांक २२ ला व उशिरात उशिरा बुधवारी २३ ऑगस्टला तुम्ही मॉस्कोत स्वागत करावे. त्यांना अनाक्रमणाचा करार करण्याचे सर्वाधिकार मी देत असून, सर्व तपशीलही तेच ठरवू शकतील. आंतरराष्ट्रीय परिस्थिती गंभीर असल्यामुळे माझ्या परराष्ट्रमंत्र्याला मॉस्कोत एक–दोन दिवसांपेक्षा अधिक काळ थांबता येणे शक्य होणार नाही. तुमचे त्वरित उत्तर आल्यास आनंद होईल.

—अॅडॉल्फ हिटलर.

२१ ऑगस्टला रात्री ९ वाजून ३५ मिनिटांनी स्टॅलिनचे उत्तर गुप्ततारेने हिटलरला मिळाले. या पत्रात स्टॅलिन लिहितो—

मॉस्को

२१–८–३९

जर्मन राईश चॅन्सेलर अॅ. हिटलर यांसी,

तुमच्या पत्राबद्दल अभारी आहे. मला आशा आहे की रूसो-जर्मन अनाक्रमणाच्या करारामुळे आपल्या दोन्ही देशांच्या राजकीय संबंधात निश्चित बदल घडून येईल. दोन्ही देशांतील जनतेला शांतता हवी आहे. अनाक्रमणाच्या कराराला जर्मन सरकारने मान्यता दिल्यामुळे, आपल्या दोन्ही देशांतील राजकीय तेढ संपून, शांतता निर्माण होऊन, परस्परसहाय्याला वाट मोकळी होईल.

सोविएट सरकारने मला तुम्हाला असे कळविण्यास सांगितले आहे की रिबेन्ट्रॉप यांनी २३ ऑगस्टला मॉस्को भेटीस यावे.

—जोसेफ स्टॅलिन.

हिटलरला हे तारपत्र मिळताच रात्री ११ वाजता जर्मन रेडिओ केंद्रावरून सुरू असलेला संगीताचा कार्यक्रम थांबवून हे महत्त्वाचे निवेदन जाहीर करण्यात आले—

"The Reich Govt. & the Soviet Govt. have agreed to conclude a pact of non–aggression with each other. The Reich Minister for Foreign affairs will arrive in Moscow on Wednesday August 23 for the conclusion of the negotations."

[ " राईश सरकार व सोविएट सरकार यांनी अनाक्रमणाचा करार करण्याचे योजिले आहे. जर्मन परराष्ट्रमंत्री याबाबतीतची बोलणी करण्यासाठी बुधवारी दि. २३ ऑगस्टला मॉस्कोला जात आहेत. " ]

हिटलरने स्वत: हे जर्मन रेडिओवरील निवेदन रात्री अकरा वाजून काही मिनिटांतच ऐकले.

## व्होराशिलॉव्ह आणि ब्रिटिश-फ्रेंच शिष्टमंडळ

मागे तसाच सोडलेला ब्रिटिश-फ्रेंच लष्करी शिष्टमंडळाचा धागा आता पुन्हा उचलू.

११ ऑगस्टला ब्रिटिश मंडळाचे नेते स्ट्रँग हे मॉस्कोत लवाजम्यासह दाखल झाले होते. आल्याबरोबर पहिल्याच भेटीत ब्रिटिश व फ्रेंच शिष्टमंडळाच्या नेत्यांनी एक गोष्ट स्पष्ट केली की " लष्करी सहाय्य कोणत्या तत्त्वावर व्हावे, ते ठरवण्याकरता आम्ही बोलणी करणार आहोत. तपशील ठरवणे आमच्या हाती नाही— " मार्शल व्होराशिलॉव्ह यांना तत्त्वात फारसा रस नव्हता. तुम्हाला जर्मनीच्या विरुद्ध रशियन रक्त हवे आहे व ते आम्ही देऊ. परंतु नेमके ब्रिटिश व फ्रेंच-जर्मनीशी कुठे कुठे लढणार ते सांगा— असा रशियन मार्शलचा आग्रह होता.

त्याने स्पष्टपणे सांगितल—

" We are not gathered here to make abstract declarations but to work out a complete military convention."

[ " आपण येथे केवळ ढोबळ विधाने करण्यासाठी जमलेले नसून, लष्करी आराखडा पूर्णत: तयार करण्यासाठी जमलो आहोत. " ]

मार्शल व्होराशिलोव्हने चमत्कारिक प्रश्न उपस्थित केले —

(१) पोलंड नक्की काय करणार आहे ?

(२) फ्रेंच सैन्याच्या मदतीला किती ब्रिटिश सैन्य युद्ध सुरू होताच फ्रान्समध्ये उतरणार आहे ?

(३) बेल्जमबाबत काय विचार ठरवला आहे ?

या सर्व प्रश्नांना समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत, हे स्टॅलिनने चर्चिल यांना सांगितले ते वर आलेच आहे. १४ ऑगस्टला मार्शल व्होराशिलोव्हने मुख्य प्रश्न विचारला—

" Do the British & French General's staff think that the Red Army can move across Poland to make contact with the enemy?"

[ ब्रिटिश व फ्रेंच जनरल स्टॉफला असे वाटते का, की लाल सैन्याला पोलंड-मधून शत्रूशी सामोरे जाता येईल ? ]

या एका प्रश्नावर वाटाघाटी उभ्या राहणार की कोसळणार, हे ठरणार होते. या प्रश्नावर ब्रिटिश व फ्रेंच शिष्टमंडळाला अशी सूचना होती —

' जर रशियन शिष्टमंडळाने असा प्रश्न विचारला, तर या बाबतीत निश्चित उत्तर न देता, या प्रश्नावर पुन्हा आपापल्या सरकारशी विचारविनिमयासाठी वेळ मागून घ्यावा– '

यावर स्ट्रँग व फ्रेंच शिष्टमंडळ प्रमुख जनरल डोमेन्क (Donmenc) यांनी सांगितले –

" पोलंड हे स्वतंत्र राष्ट्र आहे. तेव्हा यासंबंधी रशियाने पोलंडशी वाटाघाटी कराव्या. शिवाय हा राजकीय स्वरूपाचा प्रश्न आहे. "

यावर मार्शल व्होराशिलोव्हने उद्गार काढले —

" मग या वाटाघाटी पुढे चालू ठेवण्यात अर्थ नाही. कारण या निश्चित फसवणाऱ्या साहसात सहभागी होण्याचा सल्ला आम्ही आमच्या सरकारला देऊ शकत नाही. "

## पोलंडची आढ्यता

१४ ऑगस्टला बैठक अशी संपली. लंडन-पॅरिस येथे शिष्टमंडळाच्या पुढे आलेल्या प्रश्नाला काय उत्तर द्यावे, याबाबत काय सल्ला द्यावा, याची धावपळ सुरू झाली. १५ ऑगस्ट–१६ ऑगस्ट–१७ ऑगस्ट...संपला. स्ट्रँग व जनरल डोमेन्क वाट पाहात

होते. अखेर ब्रिटिश-फ्रेंचांच्या वॉर्सात चाललेल्या खटपटीला पोलिश परराष्ट्रमंत्री बेक् याने आढ्यतेखोरपणे उत्तर दिले—

" The Russians are of no military value & no benefit is to be gained by Red Army operating in Poland."

[ रशियनांचा लष्करीदृष्टचा फारसा उपयोग नाही. लाल सैन्याला पोलंडमध्ये वावरू देण्यात काहीच फायदा नाही. ]

या उत्तराने फ्रेंच परराष्ट्रमंत्री बॉनेट (Bonnet) याचे पित्त खवळले. पोलंडच्या या मूर्खपणामुळे रशियाचे सहकार्य दूर जात आहे, हे त्याच्या ध्यानात आले व तो म्हणाला —

" पोलंडच्या या नकारामुळे रशियाशी चाललेल्या वाटाघाटी फिसकटल्या, तर तो मोठाच घात ठरणार आहे. पोलंडला टाकोटाक कुणी मदत करू शकत असेल, तर तो फक्त रशियाच. अशा परिस्थितीत इंग्लंड-फ्रान्सला पोलंडच्या मदतीला जाणे कसे शक्य होईल ?"

अशा परिस्थितीत ब्रिटिश-फ्रेंचांनी पोलंडला स्पष्ट सांगणे भाग होते की " रशियन सैन्याची मदत तुम्ही नाकारीत असाल, तर तुमच्या मदतीला येण्यास आम्ही बांधलेले नाही, बॉनेट याने हीच भूमिका घेतली, परंतु लंडनमध्ये चेंबर्लेन व हॅलिफेक्स यांना ही एकांतिक भूमिका पसंत नव्हती.

वस्तुत: बॉनेट याची भूमिकाच बरोबर होती व यावेळी चेंबर्लेन यांनी या भूमिकेचा पाठपुरावा केला असता तर ? आक्रमणाच्या भीतीपायी पोलंडने रशियन सैन्याला आपल्या भूमीवर येऊ दिले असते ? की यापेक्षा सरळ डँझिग व कॉरडॉर जर्मनीला दिला असता ? पोलंडचा रशियाद्वेष इतका पराकोटीला गेलेला होता की बहुधा पोलंडने जर्मनीला डँझिग क कॉरिडॉर देऊन......पुनश्च चेंबर्लेन यांना लाजेने मान खाली घालावयास लावली असती. याच भीतीपोटी चेंबर्लेन व हॅलिफेक्स हे अशी सक्ती पोलंडवर करू इच्छित नव्हते. त्यांनी पुन:पुन्हा बेक्ची मनधरणी करण्यात १९ ऑगस्ट घालवला. २० ऑगस्टला बेक्ने पुन्हा स्पष्ट सांगितले—

" In no case would the admission of Soviet troops into Poland be agreed to."

[ काय वाटेल ते झाले तरी रशियन सैन्याला पोलंडमध्ये प्रवेश करू देण्याची परवानगी आम्ही देणार नाही. ]

### वाटाघाटी बारगळल्या

पोलंड अशा घमेंडीत असतानाच २१ ऑगस्टला स्टॅलिनने हिटलरला प्रतिसाद दिला.

" रिबेन्ट्रॉपला पाठवा. अनाक्रमणाचा करार करू."

रिबेन्टॉपचे निमंत्रण ज्या दिवशी रवाना झाले व ज्या रात्री बर्लिन रेडिओवरून

घोषणाही झाली की '२३ ऑगस्टला रिबेन्ट्रॉप मॉस्कोला जात आहे—' त्याच दिवशी फ्रेंच सरकारने आपल्या शिष्टमंडळाला कळवले —

" French agreed in Principle to the passage of Soviet troops through Poland if the Germans attacked."

[ " जर पोलंडवर जर्मनीने हल्ला केला, तर सोविएट सैन्याने पोलंडमध्ये घुसावे, याला तत्त्वत: आमची मान्यता आहे. " ]

२१ ऑगस्टला मार्शल व्होराशिलोव्हला स्टॅलिनने गुप्त सूचना दिली असली पाहिजे की रूसो–जर्मन कराराची शक्यता असल्यामुळे लष्करी वाटाघाटी फिसकटवून मोकळे व्हा! कारण जेव्हा २१ ऑगस्टला फ्रेंच लष्करी मंडळाने आपल्या सरकारचा वरील निर्णय सांगितला, तेव्हा मार्शल व्होराशिलोव्हने विचारले —

" पण पोलंडच्या मान्यतेचे काय ? इंग्लंडचा विचार काय आहे ?"

याच दिवशी मार्शल व्होराशिलोव्हने वाटाघाटी काही काळ तहकूब कराव्या, अशी सूचना मांडली. ही मांडताना मार्शल व्होराशिलोव्हने असा आव आणला की स्टॅलिन–हिटलर यांच्या पत्रापत्रीचे आपल्याला काहीच ठाऊक नाही. त्याने वाटाघाटी तहकूब करण्यासाठी कारण असे दिले की–" तुम्ही पोलंडकडून रशियन फौजांना पोलिश भूमीवर येण्याची संमती आणीपर्यंत या वाटाघाटी पुढे चालवण्यात अर्थ नाही." मार्शल व्होराशिलोव्हचे हे म्हणणे संपूर्णत: खरे असले, तरी वाटाघाटी फिसकटविण्याच्या उद्योगाला तो या वेळी लागला होता, ही गोष्ट स्पष्ट आहे.

२२, २३, २४ ऑगस्टला मॉस्कोत नेमके काय घडत आहे, याचाच उलगडा ब्रिटिश व फ्रेंच लष्करी शिष्टमंडळांना होत नव्हता. २५ ऑगस्टला दुपारी एक वाजता मार्शल व्होराशिलोव्हने या शिष्टमंडळांना स्पष्टपणे सांगितले —


" In view of the changed political situation no useful purpose will be served in continuing the conversations. "

[ " आता बदललेल्या राजकीय परिस्थितीत आपल्या वाटाघाटी पुढे चालवण्यात काही अर्थ उरलेला नाही. " ]

### तीन दिवसांतील उलथापालथ

मधल्या तीन दिवसांत केवढी आश्चर्यजनक प्रचंड उलथापालथ रिबेन्ट्रॉप-स्टॅलिनने केली होती! जगाला हादरा देणाऱ्या हा रूसो–जर्मन करार घडला. त्या तीन दिवसांची हकीकत आता पाहू —

रिबेन्ट्रॉप दि. २२ ऑगस्टला विमानाने मॉस्कोला येण्यासाठी निघाला. करार करण्याचे सर्वाधिकार घेऊनच तो येत होता. त्या रात्री तो इस्ट प्राशियातील कोईन्सबर्ग येथे राहिला. रात्रभर त्याचे बर्लिन व बर्चेसगार्टन येथे टेलिफोनवरून बोलणे चालू होते. तो रात्रभर स्टॅलिन व मोलोटोव्हशी करावयाच्या बोलण्याचे टाचण करीत होता.



**अनाक्रमणाच्या करारावरील सहीशिक्के**

२३ ऑगस्टला दुपारी मॉस्कोच्या विमानतळावर दोन मोठी कॉनडॉर वाहतूक विमाने रिबेन्ट्रॉप व त्याचा लवाजमा घेऊन उतरली. घाईघाईने जेवण उरकून रिबेन्ट्रॉप पहिल्या भेटीसाठी क्रेमलिनमध्य दाखल झाला. पहिली भेट तीन तास चालू होती. या वाटाघाटीत अनाक्रमणाचा करार उघडरीतीने करावा व जर्मनप्रभावळीखाली जाणारे पोलंडचे भूभाग व रशियन प्रभावळीखाली जाणारे पोलंडचे भूभाग यांसंबंधी गुप्त करार व्हावा, असे ठरले. म्हणजे मुख्य चर्चा झाली ती पोलंड कसा वाटून घ्यावा यावर ! या बाबतीत रिबेन्ट्रॉपने स्टॅलिनला हवे होते, ते सर्व देऊन टाकले.

दुपारी बैठक त्याच दिवशी सायंकाळी झाली. अनाक्रमणाचा करार व गुप्तसंधी ही दोन्ही याच बैठकीत चर्चिली जाऊन त्यावर सह्याही झाल्या. यातील 'गुप्त-संधी' (Secret Protocol)चा मसुदा हा युद्ध संपल्यानंतर जर्मन कागदपत्रांतून दोस्तांच्या हाती पडला.

जो अनाक्रमणाचा करार (Non Aggression Treaty) उघडपणे करण्यात आला, त्यात म्हटले होते ते असे—

(१) रशिया व जर्मनी हे परस्परांवर आक्रमण करणार नाहीत, अशी परस्परांस हमी देत आहेत.

(२) जर कुणा तृतीय शक्तीने रशिया किंवा जर्मनीबरोबर युद्ध सुरू केले, तर त्या शक्तीला हल्ला न झालेल्या राष्ट्राने कसलीही मदत देता कामा नये.

(३) रशिया किंवा जर्मनी यांनी अशा कोणत्याही राष्ट्रगटात सामील होता कामा नये, की ज्या गटाचा उद्देश करार करणाऱ्या या राष्ट्रांपैकी एकाच्या विरुद्ध असेल.

या करारानेच हिटलरला नेमके हवे होते ते मिळाले. जर जर्मनीने पोलंडवर हल्ला केला व जर्मनीविरुद्ध ब्रिटन, फ्रान्स यांनी युद्ध पुकारले, तर या तहान्वये रशिया त्या युद्धात पडणार नाही, इतकेच नव्हे तर त्या राष्ट्रांना कसली मदतही करणार नाही, असे अभिवचन स्टॅलिनकडून हिटलरने मिळवले होते.

## गुप्त संधीचे कारस्थान

याकरिता हिटलरने जी किंमत रशियाला दिली, ती सर्व मात्र 'गुप्त-संधी'त समाविष्ट केलेली होती. या संधीत खालील कलमे होती. त्यांची भाषा मोठी उद्बोधक आहे !

(1) In the event of a territorial & political transformation in the territories belonging to the Baltic states (Finland, Estonia, Latavia, Lithuania) the northern frontier–Lithuania–shall represent the sphere of interest both of Germany & U. S. S. R.

(2) In the event of a territorial & political transformation of the territories belonging to Polish state, the spheres of interest of both Germany & U. S. S. R. shall be bounded approximatery by the line of the rivers Nareu, Vistula & San. The question whether the interest of both parties make the maintanance of an Independent Polish state appear desirable & how the frontier of this state should be drawn, can be definitely determined only in the course of further political developments. In any case both Govt.s will resolve this question by means of a friendly understanding.

(3) Where South–Eastern Europe is concerned the Russion side interest in Bessarabia is emphasised. On the German side complete disinterstedness is proclaimed in regard to that territory.

(4) This protocal will be treated by both parties as strictly secret

[ (१) बाल्टिक राष्ट्रांच्या (फिन्लंड, अॅस्टोनिया, लाटेव्हिया, लिथुयानिया) प्रदेशांच्या बाबतीत जर प्रादेशिक व राजकीय स्वरूपाचे बदल करण्याचा प्रसंग निर्माण झाला, तर लिथुयानियाची उत्तर सरहद्द ही रशिया व जर्मनी यांच्या प्रभावळीखाली कोणता प्रदेश यावा, याची सीमारेषा राहील.

(२) जर पोलंड या राष्ट्राच्या प्रदेशाच्या बाबतीत — प्रादेशिक व राजकीय स्वरूपाचे बदल करण्याचा प्रसंग आला, तर रशिया व जर्मनी यांच्या आधिपत्याखाली कोणता प्रदेश यावा, याची सर्वसाधारण सीमारेषा ही नॅरु, व्हिस्तुला व सॅन या नद्यांना जोडणारी रेषा असेल. स्वतंत्र असे पोलंडचे राष्ट्र म्हणून अस्तित्व जर्मनी व रशिया या दोघांच्या हिताचे आहे किंवा नाही व या देशाच्या सीमारेषा प्रत्यक्ष कशा असाव्या, याचा निश्चित विचार यापुढील राजकीय घटनांच्या संबंधात करावा लागणार आहे. काही झाले तरी हा विचार दोन्ही सरकारे मित्रत्वाच्या भावनेने करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

(३) बेसा-बेरीया या भूभागावर रशियन आधिपत्य असावे. या भूभागाच्या बाबतीत जर्मनीला कसलीही अपेक्षा नाही. (हा भाग यावेळी रुमानियाचा प्रांत होता.)

(४) ही संधी दोन्ही राष्ट्रांनी अत्यंत गुप्त राखावी.]

## आणि अखेरचे सुरापान

क्रेमलिनमध्ये पोलंडच्या पाठीत खंजिर खुपसण्याचे हे कारस्थान उरकून स्टॅलिन व रिबेन्ट्रॉप मोकळे झाले, तेव्हा मध्यरात्र उलटलेली होती. नंतरच्या काही वेळात परस्परांना सदिच्छा व्यक्त करीत सुरापानाचा समारंभ सुरू झाला. यावेळी काय संभाषणे झाली, याचा तपशील जर्मन कागदपत्रांतून उपलब्ध झालेला आहे.

स्टॅलिन बोलण्याच्या ओघात म्हणाला —

" मॉस्कोत सध्या असलेल्या ब्रिटिश लष्करी शिष्टमंडळाला नेमके काय हवे आहे, ते त्यांनी आजतागायत सोविएट सरकारला सांगितलेले नाही. "

यावर रिबेन्ट्रॉपने उद्गार काढले —

" इंग्लंड स्वत: कमकुवत आहे. परंतु त्यांचे जगातले मोठेपण टिकावे — यासाठी ते इतर राष्ट्रांना लढाई करावयास लावीत असतात. "

" जर जगात आज इंग्लंडचे वर्चस्व असले, तर जी राष्ट्रे इंग्लंडच्या थापांनी फसतात, त्यांचा मूर्खपणा त्याला कारणीभूत आहे. "

यानंतर हास्यविनोद सुरूच झाले. मार्शल स्टॅलिनने मग समोरचा मद्यचषक उचलून एकदम म्हटले —

" I know how much the German nation love the Fuehrer. I should therefore like to drink to his health."

[ जर्मन राष्ट्राचे आपल्या फ्यूररवर किती प्रेम आहे, हे मी जाणतो. मी त्याला आरोग्य चिंतितो. ]

रिबेन्ट्रापने नंतर स्टॅलिनचे आरोग्य चिंतले. सुरापान आनंदांत पार पडले.

२४ ऑगस्टला रिबेन्ट्रॉपने बर्लिनला प्रयाण केले. रिबेन्ट्रॉप गेल्यानंतर २४ तासांनी मार्शल व्होरोशिलोव्हने २५ ऑगस्टला पूर्वी सांगितल्याप्रमाणे ब्रिटिश व फ्रेंच लष्करी शिष्टमंडळाच्या हातावर वाटाण्याच्या अक्षता दिल्या.

### स्टॅलिनकृत समर्थन

रूसो-जर्मन अनाक्रमणाचा करार प्रसिद्ध होताच, जगाला आणि ब्रिटन-फ्रान्सला हादरा बसला. दोघांची मॉस्कोतील लष्करी शिष्टमंडळे तोंडात मारल्या-प्रमाणे मॉस्कोतून पळाली. जगातल्या सर्व दलितांचा उद्धार करण्याची भाषा तोंडात घोळवणाऱ्या मार्शल स्टॅलिनने बगलेतली सुरी अशी अचानक बाहेर काढताच, मी मी म्हणणाऱ्या राजकीय टीकाकारांना भोवळ आली.

दोन वर्षांनी जेव्हा अनाक्रमणाचा करार पायदळी तुडवून जर्मन फौजांचे लोंढे रशियात घुसले, तेव्हा स्टॅलिनने ब्रिटिश-फ्रेंचांना अंधारात ठेवून जर्मनीशी केलेल्या या अनाक्रमणाच्या कराराचे समर्थनच केले. ३ जुलै १९४१ रशियन जनतेला उद्देशून केलेल्या भाषणात मार्शल स्टॅलिनने सांगितले —

" अनाक्रमणाचा करार करून आम्ही आपल्या देशासाठी दीड वर्षाचा शांततेचा काल उपलब्ध करून घेतला. या कालात जर फॅसिस्ट जर्मनीने हल्ला केलाच, तर त्याच्या प्रतिकाराची तयारी करता आली; हा आपल्या देशाचा फायदा झालेला असून जर्मनीचाच तोटा झाला आहे. "

स्टॅलिनच्या या मखलाशीत कितपत तथ्य आहे ? या गुप्त व अशुभ करारामुळे रशियाला थोडा कालावधी मिळाला, इतकेच नव्हे तर त्यावेळी असलेल्या रशियन सरहद्दीच्या फारच पुढे त्यांना जर्मनांना अंगावर घेता आले. जर्मनीशी लढण्याकरता त्यांना बाल्टिक राष्ट्रे व फिनलंड यांचे तळ वापरता आले. सर्वांत महत्त्वाचा फायदा हा झाला की जेव्हा रशियावर जर्मनीने प्रथम हल्ला केला, तेव्हा दोस्त राष्ट्रे त्यापूर्वीच युद्धात गोवली गेलेली असल्यामुळे लढाईचा सर्व भार एकट्या रशियावर पडला नाही.

रशियाने प्रसिद्ध केलेल्या " History of Diplomacy " या पुस्तकात या प्रमुख फायद्याचे गुणगान केलेले आहे.

### फक्त स्वदेशहिताचीच दृष्टी

परंतु ही सर्व रशियन नाण्याची फक्त प्रदर्शनाची बाजू झाली. हे नाणेच मुळात बद्दू आहे ! कसे ते पाहा–जेव्हा हिटलरने आपला मोर्चा रशियाकडे वळवला, तेव्हा युरोपातून पोलंड–फ्रान्सचा निकाल लागून ब्रिटिश सैन्य युरोपातून पळून गेलेले होते व हिटलरला सर्व युरोपातील उत्पादन उपलब्ध झालेले होते. १९४१-४२-४३ ही तीन वर्षे युरोपात ब्रिटन-फ्रान्सची दुसरी आघाडी नाही, म्हणून रशियन हुकूमशहा बोंबलत होता. ३९-४० साली ही दुसरी आघाडी अस्तित्वात होती. पोलंडच्या

पाठीत वार न करता रशियाने त्याचवेळी पोलंडला पाठिंबा दिला असता, तर पोलंडचा खिमा पंधरा दिवसांत उडता ना ! इतकेच नव्हे तर रशिया-ब्रिटन–फ्रान्स या तिघांशी एकदम लढावे लागेल या भीतीने हिटलरची पोलंडवर हल्ला करण्याची छातीच झाली नसती. तेव्हा स्टॅलिनची मखलाशी मुळीच खरी नाही.

स्टॅलिनच्या कृत्याचे समर्थन एकाच निकषावर होऊ शकते. स्वदेशाचा नागडा स्वार्थ ! ! स्वतःच्या देशाचेच फक्त हित ! मग ते साधताना इतरांचा बळी गेला तरी त्याची पर्वा नाही. याच दृष्टिकोनातून स्टॅलिनच्या कृत्याचे समर्थन होऊ शकेल, असे चर्चिल यांनी म्हणून ठेवले आहे. चर्चिल लिहितात—

" Cold blooded as Stalin's move was in making a deal with Hitler, it was also at the moment realistic in a high degree. Stalin's primary consideration was his nations security. "

[ " स्टॅलिनने हिटलरशी केलेली सौदेबाजी हे निर्घृण कृत्य असले, तरी त्या विवक्षित क्षणी तेच अत्यंत स्वाभाविक होते. स्टॅलिनपुढे सर्व प्रथम विचार एकच होता– आपल्या देशाचे संरक्षण ! " ]

आपल्या देशाच्या संरक्षणव्यवस्थेचा अटळ भाग म्हणून लाटविया, एस्टोनिया, फिनलंड, बेसारेबिया या सरहद्दीलगतच्या छोट्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा ग्रास ! मग हा तर सर्वच झोंडशाहीचा सिद्धांत आहे. हा तर साधा क्रूर व्यवहार आहे. साम्राज्य टिकावे म्हणून ब्रिटन-फ्रान्स लढणार होते–साम्राज्य उत्पन्न व्हावे म्हणून जर्मनी लढणार होता—याच गडबडीत आपली कातडी बचावून शिवाय अधिक प्रदेश बळकावता यावा म्हणून रशियाने हिटलरशी सौदेबाजी केली !

रूसो–जर्मन कराराच्या दणक्याखाली जग हादरू लागताच हिटलरच्या मनात आशा निर्माण झाली, की ही बातमी पोचताच सूर्याने धुके पांगावे त्याप्रमाणे इंग्लंडच्या पंतप्रधानाची कंबरच खचेल व पोलंडच्या प्रश्नावर युद्ध पेटवण्याचे विचार त्याच्या डोक्यातून निघून जातील. हिटलरच्या दुर्दैवाने आणि जगाच्या सुदैवाने चेंबर्लेन यांनी सर्व धोका पत्करून हिटलरला पत्राने लेखी कळवले–

" रूसो-जर्मन करारामुळे पोलंडबाबत ब्रिटन आपले कर्तव्य करणार नाही या भ्रमात राहू नका ! "

२३ ऑगस्टला हे पत्र ब्रिटिश वकील हेंडरसन यानी हिटलरच्या हाती दिले.

१ सप्टेंबरला युद्धच पेटले. शांततेचे हे शेवटचे सात दिवस लंडन-पॅरिस–रोम–बर्लिन-वॉर्सा आणि मॉस्को या ठिकाणी काय काय घडत होते याचा वृत्तांत पुढील अंकी.

[ अपूर्ण ]

# राजेमास्तर

## मुंबई ते पुणे — एक टीकाप्रवास

### ● मुंबई

—सुरेश गजेन्द्रगडकर.

विलेपार्ले म्युझिक सर्कलच्या नाटयशाखेने पहिले नाटक सादर केले–ते श्री. ना. पेंडशांचे " राजेमास्तर. " आणि प्रथमच सांगून टाकले पाहिजे की नाटक अतिशय व्यवस्थितपणे सादर केले गेले आणि मुंबईच्या नाटयप्रेमी लोकांसमोर एक आदर्श प्रयोग, एक आदर्श संस्था येत आहे, याची जाणीव झाली.

पेंडशांनी 'हद्दपार' या त्यांच्याच कादंबरीच्या कथानकावरून हे नाटक लिहिले आहे. तेव्हा नाटक व कादंबरी याची तुलना करण्याचा मोह होणे साहजिक आहे आणि आनंदाची गोष्ट अशी की कादंबरीशी ते प्रामाणिक राहिले आहेत. इतकेच नव्हे, तर इतर कादंबरीच्या केलेल्या नाटकांतून कमी प्रसंग समोर घडतात व बरेच नाटक संवादातून कळते. तसे इथे घडत नाही. घटना समोर घडतात आणि संवादातून कथानक पुढे सरकते. कुठेही कंटाळवाणे होत नाही. उत्सुकता कायम ताणलेली राहते.

'नाटक' म्हणूनही (कादंबरीचा विचारही न करता) 'राजेमास्तर' यशस्वी साहित्य आहे. आजकालच्या मेलोड्रॅमॅटिक नाटकातून काव्यात्म वाक्यांची पेरणी भरपूर आढळते.

टाळयांच्या, हशाच्या वाक्याप्रमाणेच हुंदक्यांची वाक्येही ठरलेली असतात. त्यामुळे वाक्यांचा फाफटपसारा वाढत असतो, परंतु पेंडशांच्या संवादाचे नेमकेपण व इतर नाटकांच्या तुलनेने हे नाटक वर आणते. कुठेही जादा वाक्ये नाहीत. नाटकाचा किंवा त्यातल्या पात्रांचा तोल बिघडू न देता, समर्थ व परिणामकारक परंतु अत्यंत मोजक्या शब्दांत त्यांनी संवाद लिहिले आहेत. हा त्यांचा असाधारण संयम उल्लेखनीय आहे. ह्या नाटकातील प्रसंगाचे रेखन अत्यंत कलात्मक झाले आहे.

कथानक अत्यंत साधे व सरळ आहे. एका निष्ठावान चारित्र्यशील शिक्षकाच्या आयुष्याचे चित्रण आहे. त्यातला संघर्ष आहे तो विचारांचा. नवमतवादी सुधारकी विचाराच्या राजेमास्तरांचे भोवतालच्या परिस्थितीशी जुळत नाही, परंतु म्हणून ते आपले म्हणणे सत्य असल्याने त्यास सोडून जात नाहीत. ('राजवाडयाच्या वास्तूने न्यायाशी व सत्याशी कधीही प्रतारणा केली नाही.')

नाटकाची मांडणी मोठी विचारपूर्वक केलेली आहे. पहिल्या अंकात राजेमास्तर, त्यांची पत्नी व जुनी म्हातारी मोलकरीण म्हांबरी या राजेवाडयावरील पात्रांचे स्वभावदर्शन घडवले आहे. दुसऱ्या अंकात गावांत चाललेली खलवते, घडामोडी, ती क्षुद्र मनोवृत्तीची माणसे, त्यांचे स्वार्थ यांची ओळख करून दिली आहे आणि त्या पार्श्वभूमीवर त्यांनी राजेमास्तरांचा झालेला मानसिक छळ दाखविला आहे, तिसऱ्या व चौथ्या अंकात.

कोकणची पार्श्वभूमी असल्याने पेंडशांनी संवाद, व्यक्तिरेखा अत्यंत जिवंत समोर आणल्या आहेत, यात तसे विशेष नाही. परंतु कलावंतांनी इतके समजून काम केले आहे, की समोर घडत असलेले नाटक आहे, हे अंक संपल्यानंतरच लक्षात येते. अभिनयाबाबत बोलायचे तर सौ. सुनीता देशपांडे ह्यांनी केलेली म्हांबरीची भूमिका ही सर्वोत्कृष्ट म्हटली पाहिजे. त्या भूमिकेला त्यांनी आगळच महत्त्व प्राप्त करून दिले आहे. सरळ मनाची, गावातल्या सर्व घटनांची माहिती असलेली, अधिक न बोलणारी, परंतु सत्य सांगायचे वेळेस न घाबरता बोलणारी, अतिशय प्रेमळ अशी मोलकरीण सौ. सुनीताबाईंनी विलक्षण जोमाने पुढे उभी केली आहे. चेहऱ्यावरचे भाव सहज बदलत होते. दुःखाच्या प्रसंगाचे वेळी अकृत्रिम अश्रू डोळयांत तरळत आणि चेहऱ्यावर असणारे गूढ वाटण्याजोगे हास्य तर म्हांबरीची कायमची आठवण मनात ठेवील.

तडफदार, करारी, परंतु शाळा, तिथली मुले यांवर जिवापाड प्रेम करणारा; कठोर पण तितकाच सहृदय राजेमास्तर चंद्रकांत गोखल्यांनी समोर व्यवस्थित उभा केला आहे. आपले चुकले हे कबूल करताना असलेला ओशाळलेला चेहरा, काशाला लागलंय् कळल्यावर धावत निघताना घाबराघुबरा चेहरा आणि तेव्हाच पत्नीला 'बापाच्या वेळी बाप आणि मास्तरच्या वेळी मास्तर,' असे बजावून सांगताना होणारा फत्तरी चेहरा, सारे नैसर्गिक वाटावे इतक्या सहजतेने गोखल्यांनी अभिनय केला. चटकन भडकून जाऊन होणारी त्यांची हालचालही या दृष्टीने बघण्याजोगी होती.

सौ. सुमती जोगळेकर यांनी शिक्षकाच्या पत्नीची होणारी दुहेरी ओढाताण फार चांगली दाखवली आहे. आईचे मन असल्याने, स्त्रीमन असल्याने जुन्या ( 'कोयती' सारख्या ) समजुतींना चिकटून बसते व दुसरीकडे नवऱ्याच्या वागण्यामुळे, त्याला मिळणाऱ्या मानामुळे त्याचेही खरे वाटते. बुद्धीला झेपत नाही, मनात गोंधळ उत्पन्न होतो, अशावेळी समजुतीवर विश्वास बसावा म्हणून की काय, पुत्रवियोगाचे दुःख ! या तिसऱ्या अंकात गोखले व सौ. जोगळेकर यांनी त्यांना झालेले दुःख केवळ मुकेपणाने बोलके केले आहे. ( म्हांबरीचे हातवारे जमेस धरून ! )

लहानसहान कामांत मधू कदम, मनोहर रेगे यांचा आवर्जून उल्लेख केला

पाहिजे. कुठेही नवशिकेपणा नव्हता. मधू कदमांनी ' वाऱ्यावरच्या वराती 'पासूनच आपले रंगभूमीवरले स्थान निश्चित केले म्हणा. श्रीकांत मोघे व दत्ता भट ह्या Veteran नटांनी मात्र थोडी निराशाच केली. मोघे जरा भडक काम करतात आणि भटांचे काम तसे चांगले झाले तरी अजून ' मी जिंकलो, मी हरलो ' तून ते बाहेर आलेले दिसत नाहीत.

ह्या सर्व नटांनी इतके चांगले टीमवर्क केले, यामागे समोर अभिनय करताना कुठेही खटकले नाही, यामागे मोठी तपश्चर्या रमाकांत देशपांडे यांची आहे आणि एका प्रभावी दिग्दर्शकाची बीजे त्यांच्यात आहेत, हे पुन्हा जाणवले. नेपथ्यरचना मनात भरण्याजोगी होती. वसंत देसाई यांच्या पार्श्वसंगीतात मात्र काहीच विशेष वाटले नाही.

या नाटकात एक दोन घटना खटकतात. निर्मल (मोघे) राजेमास्तरांच्या पत्नीच्या पाया पडतो. ते दृश्य काढून टाकल्यास चालण्याजोगे आहे. तसेच त्या आधी तो देवळापाशी मास्तरांना दिलेल्या निरोपप्रसंगाचे काव्यात्म वर्णन करतो, त्यातला जादा भाग कापल्यास बरे वाटेल.

शोकमय नाटक असले तरी भावनाविवशता कुठेही नसल्यामुळे दुःखी नाटक पाहूनही प्रेक्षक मुसमुसत बाहेर पडत नाही. तो विचार करत बाहेर पडतो. यातले दुःख एका माणसाचे नाही, त्या तीन तासांतले नाही. ते एक चिरंतन दुःख आहे. डोळ्यांत आसवं मघूनच तरारतील, परंतु आपण तिथेच थांबत नाही. मला वाटते एका अर्थाने हे नाटक FOR ADULTS ONLY होते. (वयाने नव्हे !)

## • पुणे

*—सुधीर दामले*

एखाद्या गाजलेल्या कादंबरीवरून नाटक सादर केले गेले म्हणजे प्रेक्षक एका वेगळ्याच भावनेने आणि दृष्टिकोनातून प्रयोगाला हजर राहतात. अर्थात कादंबरी वाचून आलेले त्या कादंबरीतून उठावदार झालेली पात्रे, प्रसंग प्रत्यक्षात रंगभूमीवर कसे दिसतील, याबद्दलचे एक कुतूहल तर असतेच, पण ही कथा रंगभूमीवर आणण्यात लेखकाने त्यात कोणते नावीन्य ओतले आहे, ती पात्रे, ते प्रसंग किती प्रभावीपणे सादर केले आहेत, याविषयीही फार मोठे आकर्षण असते.

पण सत्यच सांगायचे तर ' राजेमास्तर ' या नाटकाने याबाबतीत निराशा केली. त्यातील व्यक्ती, प्रसंग कादंबरीइतके प्रभावीपणे मनावर ठसले नाहीत. ' हद्दपार ' वाचून राजेमास्तरांविषयी जी एक आपुलकीची भावना निर्माण झाली, ती नाटकाच्या प्रयोगातून साधली नाही. नाटकाचे सर्वांत मोठे अपयश कोणते असेल, तर ते हेच !

कादंबरी लिहिताना राजेमास्तर याच व्यक्तिरेखवर लेखकाने आपले सारे लक्ष केंद्रित करून त्यांच्या विविध स्वभाववैशिष्ट्यांची ओळख पटविण्याचा आटो-



सुनीता देशपांडे, सुमती गुप्ते : ह्या दोघींनी 'राजेमास्तरांना' जणू 'हद्दपारच' केले !

काट प्रयत्न केला आहे आणि त्याबाबतीत लेखक चांगलाच यशस्वी झाला; म्हणून एक यशस्वी व्यक्तिचित्रणात्मक कादंबरी म्हणून तिचा विशेष गवगवा झाला. नाटकाचे नाव लक्षात घेता पेंडसे यांना याच व्यक्तीवर, तिच्या वैशिष्ट्यावर आपले सारे लक्ष केंद्रित करायचे आहे, असे दिसून येते; पण प्रत्यक्षात मात्र ही गोष्ट साधण्यात लेखकाचे प्रयत्न फारच अपुरे पडले आहेत. नाटकातील राजेमास्तर ठसठशीत प्रमाणात पुढे उभे राहण्याऐवजी अन्य पात्रेच प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतात, हे अपयश लक्षात घेण्यासारखे नाही का ?

राजेमास्तर म्हणजे एक आदर्श गुरुजी, प्रेमळ पिता आणि पती, विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन कार्य करणारी बाणेदार, निस्पृह व्यक्ती आहे, हे निरनिराळ्या प्रसंगांतून–तुटकपणे का होईना पण–उत्तम तऱ्हेने साधले आहे. पण या नाटकात फक्त करारी आणि ध्येयवादी राजेमास्तरच डोळ्यापुढे येतात. काही प्रसंगांत मास्तरांच्या अन्य वैशिष्ट्यांची ओळख करून द्यावी, असा लेखकाचा हेतू आहे, पण तो कमी पडला आहे. राजेमास्तरांच्या केवळ एकाच वैशिष्ट्यावर जोर दिला गेल्याने कळतनकळत नाटकातील अन्य पात्रांनी डोके वर काढले आहे आणि म्हणूनच राजेमास्तर काहीसे निष्प्रभ आणि निस्तेज बनले. नाटकाच्या सुरवातीपासूनच बाणेदार व करारी मास्तरांचे चित्रण करण्यात लेखक इतका मग्न आणि दंग

होऊन गला आहे, की नकळत त्याचे इतर वैशिष्टयांकडे दुर्लक्ष झाले आहे. राजेमास्तरांच्या प्रवेशाचाच प्रसंग पाहा ! नन्नू तापाने आजारी आहे, असे त्यांच्या प्रवेशाआधी बराच वेळ सांगण्यात आले आहे. तो त्यांची सारखी आठवणही काढीत आहे, असे कळते. पण राजेमास्तर प्रवेश करतात तेच मुळी स्वत:च्या कार्यातच मग्न होऊन ! दिपोटीशी त्यांचा झालेला खटका सांगण्यात ते इतके दंग होतात की स्वत:चा मुलगा आजारी आहे, याचे त्यांना भानही राहात नाही. मास्तरांचा स्वभाव लक्षात घेता ते स्वत:विषयी इतके बोलतील ही गोष्ट संभवत नाही. शिवाय यामुळे मास्तर एक प्रेमळ पिताही आहेत ही गोष्टही त्यामुळेच व्यक्त होत नाही. वास्तविक घरी येताच ते जर क्षणभर नन्नूला पाहून बाहेर येते, तर त्या लहानशा प्रसंगाने एक वेगळा स्वभावविशेष व्यक्त झाला असता, पण पेंडसे यांचे त्याकडे नकळत दुर्लक्ष झाले. अपेक्षांना पहिला तडा गेला तो प्रथमत: याचवेळी ! दुसऱ्या अंकातही राजेमास्तरांच्या स्वभावातील कोणताही नवा विशेष उभा केलेला नाही. पहिल्या अंकातील राजेमास्तरच इथे दिसतात. शिवाय मास्तरांची उपस्थितीही दुसऱ्या अंकात फारच अल्पवेळ आहे. यामुळे या अंकातही राजेमास्तरांची व्यक्तिरेखा मनाला भिडत नाही. अपेक्षांना दुसऱ्यांदा तडा गेला. देवळातील पारावरील ब्राह्मणांचा प्रवेश अधिक उठावदार झाल्यानेही राजेमास्तरांकडे नकळत दुर्लक्ष झाले. तिसऱ्या अंकातील निम्म्यापेक्षा अधिक वेळ लक्ष्मीचे चित्रण करण्यात लेखक मग्न झाला आहे. तिच्या मनातील द्वंद्व आणि वादळ रेखाटण्यात लेखकाचे श्रम कारणी पडले. वस्तुत: ही गोष्ट अनावश्यक होती असे नाही, पण त्यावर विशेष जोर दिला गेल्याने अंकाच्या उत्तरार्धात एक आदर्श शिक्षक म्हणून राजेमास्तर उभे करण्याचा प्रयत्न निष्प्रभ ठरला. लक्ष्मीच्या चित्रणाच्या प्रभावापुढे मास्तरांचा हा विशेष लक्षातही येत नाही. या अंकातील मास्तरांचा प्रवेशच अधिक प्रभावीपणे रंगवायला हवा होता, पण इथेही तोल चुकला. अपेक्षांना तडा गेला. नाही म्हणायला चौथ्या अंकातच काय तो राजेमास्तरांच्या स्वभावातील वैशिष्टय-निस्पृही बाणेदारपणा चांगल्यात-हेने उभा केला आहे. तीनही अंकांत विविध वैशिष्टयांवर हे असेच लक्ष दिले गेले असते, तर राजेमास्तर कायमचे स्मरणात राहिले असते, पण ते साधले नाही एवढे खरे ! कादंबरीपेक्षा नाटकाचा शेवट अधिक चांगला असूनही पहिल्या तीनही अंकांमुळे त्याचीही पकड मनावर बसत नाही आणि म्हणूनच नाटक संपवून बाहेर पडताना राजेमास्तर सोडून अन्य पात्रे आणि प्रसंग यावरच प्रेक्षक चर्चा करू लागतो. लेखकाला खरोखरच हेच अपेक्षित होते काय ? कादंबरीवाचकाला तरी हे अपेक्षित नव्हते.

मग नाटकातून दिसले काय, तर अन्य पात्रे-विशेषत: लक्ष्मीचीच व्यक्तिरेखा अधिक लक्षात राहिली. नाटकात लक्ष्मीला महत्व आहे, ही गोष्ट एकदम मान्य ! पण किती प्रमाणात ? तिथेही तोल चुकला. लक्ष्मीही मास्तरांच्या व्यक्तित्वाला

पूरक म्हणून किंवा एकवेळ तितकीच महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणून उभी राहायला पाहिजे. तेच तिचे स्थान आहे. राजेमास्तरांपेक्षा तिचे महत्त्व कदापी वाढता कामा नये, पण हीच गोष्ट नाटकातून घडत गेली. लक्ष्मीची व्यक्तिरेखा रंगविताना लेखक फारच रंगून गेला आहे. म्हांबरीच्या बाबतीतही थोडेफार असेच दिसते. तिचेही अस्तित्व स्वतंत्रपणे जाणवले आणि नकळत राजेमास्तर निष्प्रभ ठरत गेले. या व्यक्तिरेखांवर अकारण जोर दिला गेला, तर सोन्याबापूंसारखी महत्त्वाची व्यक्ती आणि जी प्रभावीपणे रंगविली असती तर राजेमास्तरांचे चित्रण उठावदार झाले असते; ती रंगविण्यात मात्र लेखक कमी पडला. इतका निष्प्रभ खलनायक दुसरा कोणीही नसेल. कोणी म्हणेल, खलनायक रंगविण्याची परंपरागत रूढी मोडण्याचा पेंडसे यांनी हा प्रयत्न केला आहे. तसा प्रयत्न जरूर करावा—पण या नाटकात तो करायला नको होता. त्या परंपरागत रूढींना धरूनच जर सोन्याबापू रंगविले असते, तर राजेमास्तरांचे चित्रण उठावदार होण्यात सहजगत्या मदत झाली असती. पण पेंडसे यांचे वेगळेपण या नाटकात चांगलेच भोवले. राजेमास्तर निष्प्रभच ठरले. उपकथानकाचा नायक निर्मल तेंडुलकर याचीही व्यक्तिरेखा पकड घेत नाही. अपरिहार्यपणे नाटकाचे नायक राजेमास्तर फिके पडले.

प्रयोगाबाबत काय ? चंद्रकान्त गोखले राजेमास्तर म्हणून शोभून दिसले. त्यांनी आपल्याकडून जीव ओतून काम करण्याचा प्रयत्न केला. क्वचितप्रसंगी त्यांच्या कामात तरुणाच्या हालचाली दिसल्या हाच बारीक दोष ! सुमती गुप्ते यांची लक्ष्मीची भूमिका स्मरणीय व्हावी, अशीच आहे. त्या भूमिकेला त्या अनुरूप दिसल्या. त्यांनी अभिनयही नेटका आणि जाणीवपूर्वक केला. सौ. सुनीता देशपांडे यांच्या म्हांबरीच्या कामात त्यांनी जरूर ते वय फारच कौशल्याने व्यक्त केले. त्यात एकदाही तरुण स्त्रीची लकब दिसली नाही, ही गोष्ट मुद्दाम सांगाविशी वाटते. अर्थात त्यांच्या कामात एक उणीव आढळलीच ! काही प्रसंगांतून त्यानी डोळ्यातून पाणी काढायला हवे होते. त्या बाबतीत मात्र जरूर तेवढा परिणाम झाला नाही. श्रीकान्त मोघे यांनी निर्मलच्या कामात मात्र निराशा केली. दत्ता भट यांनी सोन्याबापूंचे काम नीटसपणे केले.

नाटकात उभा केलेला राजेवाडा आणि देवळाचा पार या गोष्टी पूर्णपणे कोकणातील वाटल्या नाहीत. त्यात देशावरील खेड्याचीच छाप अधिक्याने दिसली. या गोष्टीचाही नकळत परिणाम नाटकाच्या रंगतीत झाला. दीपयोजना मात्र वैशिष्टयसंपन्न वाटते. ● ● ●

क्रीडा

# मिलरच्या मौजा

१९५५ साली ऑस्ट्रेलियाचा बलाढ्य संघ वेस्टइंडिजच्या दौऱ्यावर होता, तेव्हाची गोष्ट आहे. बार्बोडस येथील एका कसोटी सामन्याच्या पहिल्याच डावात मिलरच्या १४० धावा होऊन त्याची दुसऱ्या शतकाची घोडदौड चाललेली होती आणि चहापानापूर्वीचे शेवटचे षटक होते. तेवढ्यात एका चेंडूवर मिलरने यष्टीरक्षकाच्या हाती झेल दिला व पंचाच्या निर्णयाची वाट न पाहता तो तंबूकडे परतू लागला. तेवढ्यात स्लिपमध्ये असलेल्या वॉलकॉट व विक्सने त्याला अडविले व म्हटले, "अरे चाललास कुठे ? पंचाने तुला अजून बाद केलेले नाही." मिलरने मागे वळून पाहिले, तो खरोखरच पंच चहापानाची वेळ झाली, म्हणून स्टंप्सवरील बेल्स काढण्यासाठी म्हणून खाली वाकला होता. परंतु आपण खरे बाद झालो असल्याची त्याची पूर्ण खात्री झाली होती, म्हणून त्याने पंचाच्या निर्णयाची वाट न पाहताच स्वत:ला बाद करून घेतले.

त्याच दिवशी संध्याकाळी खेळ संपल्यावर मिलरची त्या पंचाशी–इरिक ली याच्याशी गाठ पडली. इरिक त्याला म्हणाला, "त्या चेंडूचा तुझ्या बॅटला स्पर्श झाला नसावा असे मला वाटले. मी तुला संशयाचा फायदा नक्कीच दिला असता. थँक्यू फॉर गोईंग."

आणि आता दुसऱ्या डावात काय गंमत झाली पाहा. अट्‌किन्सचा एक चेंडू मिलर खेळत असताना त्याच्या पॅडवर तो बसला. अट्‌किन्सला क्षणभर तो एल्. बी. डब्ल्यू. झाला असावा असे वाटले. म्हणून त्याने अपिल करण्यासाठी, हाऊझ......! असा सवालही केला. परंतु तो चेंडू ऑफ साइडकडून वळला असल्याचे त्याच्या लक्षात येताच त्याने आपले अपिल तोंडातल्या तोंडात गिळले. मिलरच्या दुर्दैवाने ते अर्धवट केलेले अपिल पंचाला पुरेसे होते. त्याने झटकन बोट वर केले व मिलर बाद झाला आणि गंमत म्हणजे त्याही वेळी पंच इरिकच होता व तरीही तोंडावाटे एक अक्षर न उच्चारताच मिलर तंबूकडे परतला.

१९५३ साली ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर गेला असताना एक असाच मजेदार प्रसंग घडला.

केंटचा डग्लस राइट या गोलंदाजाची ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी मनापासून प्रसंशा केली होती. एवढेच नव्हे तर त्याच्या गोलंदाजीतील किमया

पाहून किथ मिलरने " इंग्लंडला डग्लस खात्रीने उपयोगी पडेल, " असे उघड प्रशस्तिपत्रहि दिले.

डग्लस राइट हा केंटचा खेळाडू असून मंदगती गोलंदाज होता. दुसरे म्हणजे त्याच्या गोलंदाजीत चमक होती, किमया होती. राइट हा उत्कृष्टपणे मंदगती गोलंदाजी करीत असला, तरी त्याच्या गोलंदाजीवर भरपूर धावाही काढता येत असत आणि ज्याअर्थी ऑस्ट्रेलियन खेळाडू डग्लस राइटच्या गोलंदाजीची तोंडभर स्तुती करतात, त्याअर्थी त्याची गोलंदाजी चांगलीच झोडपून इंग्लंडच्या विरुद्ध ऑस्ट्रेलियनांचा धावांचा प्रचंड डोंगर उभारण्याचा तर हा नामी डाव नसेल ना? असा निवडसमितीला संशय आला. या संशयपिशाचाने ग्रासलेल्या इंग्लंडच्या निवडसमितीने सामन्यासाठी डग्लस राइटला कायमचे वगळले !

**—प्रभाकर चेंदवणकर**




" दहा पैशाच्या चहात ' ओढलेले विडीचे थोटूक ' सापडेल नाहीतर काय ' न ओढलेला चिरूट ' मिळेल ? "



# भगवतीचरण वर्माजींचे 'पुण्य' आणि नडियादवाला यांचे 'पाप'

# चित्रलेखा

**चित्रलेखा व 'हमाम सोप'**

चित्रलेखा ही कादंबरी तुम्ही वाचली आहे का? नाही. तुम्ही हिंदी याने राष्ट्रभाषेच्या परीक्षा दिलेल्या दिसत नाहीत. भगवतीचरण वर्मा यांचा हा प्रख्यात उपन्यास तुम्ही एकदा वाचलात तर सहसा विसरणार नाही. या कादंबरीवर हिंदी निर्माते पुन:पुन्हा चित्रपट काढण्याच्या मोहात पडतात, ते काही उगीच नाही. याचे मुख्य कारण म्हणजे हिंदी चित्रपटांत नाचगाणी असावीच लागतात हे. चित्रलेखा ही चंद्रगुप्त मौर्याच्या काळातील एक कलावंतीण. नृत्य-गायन हा जीवनधर्म मानून त्या अनुषंगाने इमानी जीवन जगणारी, पापपुण्याचा विचारसुद्धा मनाला न शिवलेली एक 'साध्वी' स्त्री. अशी नायिका उपलब्ध असताना हिंदी चित्रपटनिर्माते या कादंबरीकडे वळले नाहीत तरच नवल!

फार वर्षांपूर्वी केदार शर्मा यांनीच या कादंबरीवरील चित्रपट दिग्दर्शित केला होता. चित्रलेखा झाल्या होत्या मेहताब. (राणी नसलेल्या झाशीतील 'झासी की रानी') आणि बीजगुप्त या पाटलीपुत्र सरदाराची भूमिका नांद्रेकर यांनी केली होती. आता मेहताब ही काही नर्तिकेच्या भूमिकेला योग्य होती काय? नव्हतीच. हा अनुभव जमेला असूनही केदार शर्मांनी पुन्हा जेव्हा या कादंबरीवर 'हात टाकण्याचे' ठरवले, तेव्हा नायिकेचे काम दिले मीनाकुमारीला. गंमत आहे की नाही? एखादी कॉलेजकन्यका नायिका असली की आशा पारेख किंवा वैजयंतीमालेसारख्या नटीला काम आणि नाचांचा धुमधडाका आणि नर्तिकेचे काम असले की मीनाकुमारीला निमंत्रण.

मूळ कादंबरीचे चित्रपटात काय केले आहे हे सांगणे म्हणजे शाईचा आणि काळाचा अपव्यय ! तेव्हा फक्त चित्रपटात काय पाहिले तेवढेच सांगून मोकळे व्हावे हे चांगले !

मुंबईतला सगळा जव्हेरीबाजार. रस्त्यावर दीडदोन रुपयाला मिळणाऱ्या शंकराच्या गळ्यात पार्वतीस्तन अडकवलेल्या मातीच्या चित्रापासून तो अजंठा-वेरूळमधील उत्कृष्ट चित्रांवरून तयार केलेल्या भित्तीचित्रांपर्यंत सर्व शिल्पे, आठवले शहाडे आदि सर्व कापडदुकानांतील भरजरी शालू-पैठण्या हे सर्व सामान जयपूरच्या राजवाड्यात आणले आणि मीनाकुमारीसहित, रुपया नाईटवर काम करणाऱ्या एक्स्ट्रांमधून सात-आठ सुस्तनी निवडून त्यांना वस्त्रप्रावरणांचे खोगीर घालून (मुख्य भाग अर्थात उघडे टाकून) या राजवाड्यात नाचागायला लावले, तर जी 'मज्जा' वाटल, ती या चित्रपटभर वाटू शकते. हा चित्रलेखेच्या घराचा सेट. बीजगुप्ताचे घर म्हणजे सामंताचे घर. याचा विवाह झालेला नसल्यामुळे घरात दासींचा सुकाळ असतो. त्या फक्त अधूनमधून बीजगुप्ताला मद्याचे चषक भरून देण्याचे काम करताना दिसतात.

यशोधरा ही बीजगुप्ताची वाग्दत्त वधू. ही एका सामंताचीच कन्या असल्यामुळे हिलाही दासी वगैरे असतातच. ही तिन्ही घरातील दासी मंडळी तिन्ही घरांत जे चाळे करतात, ते सर्व एकाच प्रकारचे असल्यामुळे काही काळाने आपण कुणाच्या घरातील प्रसंग पाहत आहोत, हेच प्रेक्षकाला कळत नाही व तो त्या दासींत जेवढे पाहण्यासारखे असते ते पाहात राहतो.

मीनाकुमारीला नाचता येत नाही. त्यामुळे पहिला जो नाच-कार्यक्रम होतो, तो तीन नर्तिका मुखवटे घालून करतात. या तिघींतील चित्रलेखा कोण हे बीजगुप्तच फक्त नेमके ओळखू शकतो. म्हणजे तो एका नर्तिकेच्या तोंडावरील मुखवटा उचलतो आणि गारुड्याच्या टोपलीत सापाचे थंड वेटोळे सापडावे, त्याप्रमाणे मीनाकुमारी याने चित्रलेखा प्रेक्षकांना दिसते. Love at first dance सुरू होते. बीजगुप्त रात्रं-दिवस चित्रलेखेच्या सहवासात काढू लागतो.

हा बीजगुप्त कोण ? नागीन पाहिला आहे का तुम्ही नागीन ? प्रदीपकुमारला ओळखत असाल. समजा, हमाम साबणाची वडी सतत चाळीस वर्षे वाढत वाढत मोठी झाली तर कशी दिसेल ? तसे हे प्रदीपकुमार चेहऱ्याने दिसतात. या साबणाच्या वडीवर सहा मिशा असतात. या बीजगुप्ताला दोन्ही कानांच्या खाली दोन इंच येतील एवढे कल्ले असतात आणि या कल्ल्यांची टोके पुन्हा विभागून वर उचल-लेली. यामुळे बीजगुप्ताचा चेहरा समोरून पाहा, उजवीकडून पाहा, डावीकडून पाहा; या वळवलेल्या मिशा आपल्या दिसतातच. असा हा बीजगुप्त साधारणपणे दीडदोन फुटांवरून चित्रलेखेच्या बाहुपाशात असल्यासारखा अभिनय करतो न् मद्य पितो.

चित्रलेखा व बीजगुप्त यांचे प्रणयकूजन चालू असताना अधूनमधून ती 'बिच्चारी' यशोधरा दिसते.

हे सगळे चालू असताना महमूद हा श्वेतांक या ब्रह्मचाऱ्याच्या भूमिकेत बीज-

गुप्ताचा गुरुबंधू म्हणून त्याच्या वाड्यात येतो. स्त्री म्हणजे मोह–पाप! तिच्यापासून दूर राहावे अशा वृत्तीचा हा ब्रह्मचारी. पाप म्हणजे काय याचा शोध लावण्याकरता बीजगप्ताकडे येतो व त्याची पत्रे चित्रलेखेला देण्यासाठी चित्रलेखेकडेही जातो. महमूद हा कसबी नट असल्यामुळे माफक वाह्यातपणा करून तो आपली भूमिका चांगली रंगवतो. दासींच्या घोळक्यात अंग चोरून बावळटासारखे फिरता फिरता तो खुद्द यशोधरेच्याच प्रेमात पडतो.

इतक्यात कुमारगिरी (अशोक कुमार) चित्रलेखा-बीजगुप्ताच्या संबंधाची चौकशी करण्याकरता अवतरतात. पूर्वाश्रमात त्यांचा चित्रलेखेशी संबंध आलेला असतो. परंतु तो वानप्रस्थाश्रमी होऊन आश्रमात कडक कर्मकांडात आयुष्य घालवीत असतो. तो येऊन चित्रलेखेला याची जाणीव देतो की 'आयुष्य क्षणभंगुर आहे. परमेश्वराची आठवण तरी तुला आहे का?' यावर चित्रलेखा सांगते, "माझी आठवण परमेश्वराने कधी ठेवली नाही आणि मला त्याची आठवण ठेवाविशी वाटत नाही." यशोधरेच्या दुःखाला आपण कारण आहोत, हें जेंव्हा चित्रलेखेला कळतें तेंव्हा ती आपला रंगमहाल सोडते व संन्यासिनी होऊन कुमारगिरीकडे येते.

कुमारगिरीने आतापर्यंत मोहाला दूर ठेवले होते, म्हणूनच केवळ आपण पापापासून दूर आहोत, याचा त्याला गर्व झालेला असतो. चित्रलेखेच्या सहवासात त्याची तपश्चर्या डगमगू लागते. तो मोहवश होतो. चित्रलेखा त्याला सांगते,

"माझी आसक्ती तुझ्यासारख्याला वाटावी यात पाप आहे. कारण या गोष्टीची तुला लाज वाटत आहे. बीजगुप्ताला केल्या गोष्टीचा पश्चात्ताप नाही, म्हणून त्याच्या-माझ्या संबंधात पाप नव्हते."


चित्रलेखा संन्यासिनी होताच विरहाने व्याकुळ झालेला बीजगुप्त आपले सर्व ऐश्वर्य श्वेतांकला देऊन, त्याला यशोधरेशी लग्न करायला सांगून कुमारगिरीकडे येण्यास निघतो. बीजगुप्त पोहोचतो. तेव्हा कुमारगिरी हा मोहवश होऊन बेहोश झालेल्या चित्रलेखेशी पापाचरण करण्याच्या तयारीत असतो. कुमारगिरीनेच चित्रलेखेला सांगितलेले असते की बीजगुप्त व यशोधरा यांचा विवाह झाला आहे.

बीजगुप्त खुलासा करतो, की विवाह श्वेतांक-यशोधरा याचा झाला आहे. कुमारगिरी आत्मघात करून घेतो. बीजगुप्त-चित्रलेखेचे मीलन होते.

चित्रपटातील गाणी बरी वाटतात. 'इस्टमन कलर' चित्रपट असल्यामुळे रंगपंचमीही चांगली आहे. परंतु एवढ्याकरता चित्रपट पाहण्यापेक्षा वर्माजींची कादंबरी वाचून दोन तास अधिक चांगले जातील.

— महेश

• • •




मी या अंकापासून महिन्यातून दोनवेळा आपल्या घरीच मुक्काम करणार आहे.

यापूर्वी आपली केवळ गाठभेटच होत असे. एखाद्या जवळपासच्या फिरत्या वाचनालयातून आपण मला घरी नेत होता, १२ दिवस ठेवून परत करीत होतात.

मला हे जाणेयेणे मुळीच आवडत नव्हते. पण काय करणार? माझी किंमतच आपल्याला परवडत नव्हती. दोघांचाही नाईलाज होता.

आता मात्र तोहि प्रश्न सुटला आहे. पंचवीस पैसे काय? जातायेता, हसत, आपण कुठेहि, कशासाठीहि खर्च करीत असता.

'मुक्काम' म्हटल्यावर घाबरू नका. हल्लीची जागेची अडचण माझ्या ध्यानात आहे. म्हणून मी आकारहि सुटसुटीत घेतला आहे. शेल्फवर, टेबलावर, ऑफिस बॅगमध्ये किंवा खिशातदेखील माझी सहज सोय होऊन जाईल.

माझे येण्याचे तीन मार्ग आहेत. फिरत्या वाचनालयातून तुम्ही मला चार आणे देऊन घरी नेऊ शकता किंवा कोपऱ्यावरच्या एखाद्या वृत्तपत्रविक्रेत्याकडून चार आण्यात खरेदी करू शकता. नाहीतर सर्वात सोपा उपाय आपल्या घरी वर्तमानपत्र टाकणाऱ्या मुलाला मला आणायला सांगा.

लक्षात ठेवा ! यापुढे माझे मूल्य केवळ पंचवीस पैसे ! !

**माणूस**

MANOOS (Fortnightly): 26 Jan. 1965 : 25 Paise : Regd. No. B 9304


# स्वस्तिकचा माल आता निर्यातही होऊ लागला

'स्वस्तिक'ची काही 'विशेष' उत्पादने

गम बूटस्

卐

प्रेशर होजेस

卐

वॉटर होज पाईप्स्

卐

ग्लोव्हज

卐

इरेझर्स

卐

ऑईल सील्स

देशाच्या संरक्षणाच्या कामी उपयोगी पडणाऱ्या वस्तूंचे प्रमुख उत्पादक

## स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि.

स्वस्तिक गृह, खडकी, पुणे ३.

फोन : ५५२०१-२-३


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**